मनुष्याणाम् वृत्तीरर्थः।

# अर्थसंवाद

भारतीय सौर अश्विन – पौष १९३३

ऑक्टोबर-डिसेंबर २०११/खंड ३५, अंक ३


- अर्थतज्ज्ञ डॉ.श्री.आ.देशपांडे-एक कृतार्थ जीवन
- स्थलांतरीत श्रमिकांचे आर्थिक अध्ययन
- आदिवासी विकास: एक दुसरी बाजू
- आदिवासी विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका
- पेठ तालुक्यातील आदिवासी विकास योजनांचा अभ्यास
- आर्थिक वृध्दी व रोजगारातील बदल:एक तौलनिक अभ्यास
- [illegible]ुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची कामगिरी
- [illegible]: एक दिशा दर्शन
- [illegible]चे सामाजिक आर्थिक परिणाम
- [illegible].बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीतून श्रमिक कल्याण
- ग्राहक हितसंवर्धनार्थ ग्राहक न्यायमंचाची भूमिका
- मह[illegible]तील स्त्रियांचे विवाहवय, प्रसुती निर्देशक व साक्षरता
- [illegible] श[illegible] वाट पाहे




## मराठी अर्थशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष



श्री. श्री.आ.देशपांडे



श्री. शशिकांत गंधे



श्री. भ.ग.बापट



श्री. स.ह.देशपांडे

यांना मराठी अर्थशास्त्र परिषद परिवारातर्फे
भावपूर्ण श्रध्दांजली!

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये। शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

National Research Journal मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

www.marthpari.org

ऑक्टोबर-डिसेंबर २०११/खंड ३५, अंक ३

प्रमुख संपादक
अविनाश रामलाल निकम

सहाय्यक संपादक
शंकर सुदामराव पवार

सल्लागार मंडळ
(२००९-१२)
लालासाहेब घाटगे
मोहन चौधरी
संतोष कदम
शिवाजी अंभोरे

संपादकीय पत्रव्यवहार
डॉ.अविनाश रामलाल निकम
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार.
मोबा: ९८२२६६५१४१

*लेखातील मते लेखकांचीच*

## अ नु क्र म


- **अविनाश रामलाल निकम**, शहादा
  संपादकीय संवाद........................................२०९
- **दि. व्यं. जहागिरदार**, अमरावती
  अर्थतज्ज्ञ डॉ.श्री.आ.देशपांडे-एक कृतार्थ जीवन.............२११
- **संजय तळतकर**, बीड; **रामकृष्ण सोळुंके**, औरंगाबाद
  स्थलांतरीत श्रमिकांचे आर्थिक अध्ययन.....................२१३
- **मारोती तेगमपुरे**, जालना
  आदिवासी विकास: एक दुसरी बाजू ........................२२३
- **एस. के. पगार**, नाशिक
  आदिवासी विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका......२२७
- **डी. आर. बच्छाव**, नाशिक
  पेठ तालुक्यातील आदिवासी विकास योजनांचा अभ्यास....२३४
- **डी. जी. धट**, कुरुंदवाड
  आर्थिक वृध्दी व रोजगारातील बदल:एक तौलनिक अभ्यास..२४२
- **सुभाष पाटील**, पुणे
  पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची कामगिरी .........२४९
- **राहूल शं. म्होपरे**, कोल्हापूर
  भारतातील जमीन सुधारणा: एक दिशा दर्शन...................२६०
- **डॉ.श्रीराम दे. जोशी**, जळगाव; **विनोद झा. मोरे**, यावल
  औष्णिक विद्युत केंद्राचे सामाजिक आर्थिक परिणाम .........२६८
- **एस.एस.नाईक**, अमरावती
  डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीतून श्रमिक कल्याण.....२७५
- **मुलाणी एम. यू.**, बारामती
  ग्राहक हितसंवर्धनार्थ ग्राहक न्यायमंचाची भूमिका............२८३
- **दीपक एम. भारती**, बीड; **विजय एन.मोपाळे**, परभणी
  महाराष्ट्रातील स्त्रियांचे विवाहवय, प्रसुती निर्देशक व साक्षरता..२९२
- **ज.फा.पाटील**, कोल्हापूर
  अर्थ शब्दांची वाट पाहे .......................................३०६

## मराठी अर्थशास्त्र परिषद
## कार्यकारी मंडळ २०११-१२

अध्यक्ष
आप्पासाहेब गोविंद पुजारी (मंगळवेढा)

कार्याध्यक्ष
दिलीप खंडेराव पाटील (सांगली)

कार्यवाह खजिनदार
अनिल बाबुराव सूर्यवंशी (बार्शी)

प्रमुख संपादक-अर्थसंवाद
अविनाश रामलाल निकम (शहादा)

विश्वस्त
चारुदत्त गोखले (जळगाव)
ज.फा. पाटील (कोल्हापूर)
मधुकर शिंदे (इस्लामपूर)

सदस्य
रामकृष्ण टाले (नागपूर)
विकास सुकाळे (नांदेड)
ज्ञानोबा मोरे (उस्मानाबाद)
महंमद रफिक मुलाणी (बारामती)
तानाजी भोसले (सांगली)
श्रीरंग मंडले (सिंधुदुर्ग)
श्रीराम जोशी (जळगाव)
सुरेश ढाके (डोंगरकठोरे)
हरिहर तिवारी (वाशीम)
हसीम वलांडकर (वाळवा)
बाळासाहेब माने (इस्लामपूर)
विकास सुकाळे (स्थानिक कार्यवाह)



अक्षर रचना:
सुनील भांडारकर, शहादा.
मुद्रणालय:
सातपुडा ऑफसेट, जळगाव.



● कार्यालयीन पत्रव्यवहार:
(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक: अनिल बाबुराव सूर्यवंशी
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गोदाई, शिवशक्ती मैदानाजवळ, शिवाजीनगर,
बार्शी - ४१३ ४११, जि. सोलापूर.
दूरध्वनी: ०२१८४-२२४२१४,
भ्रमणध्वनी: ८८०५६९१४०६


● वर्गणी:

▪ परिषदेचे सदस्य:

आजीव सदस्य: रु.२०००/- (एकरकमी)
साधारण सदस्य: रु.३००/- (वार्षिक)

▪ संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:

शैक्षणिक संस्था: रु.१०००/-(त्रैवार्षिक)
व्यावसायिक संस्था:रु.१०००/-(त्रैवार्षिक)
ग्रंथालये: रु.१५००/-(पंचवार्षिक)

▪ वर्षगणना: १ एप्रिल ते ३१ मार्च

▪ संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.

▪ कृपया आजीव सदस्य वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.

▪ अर्थसंवादची वर्गणी ***मराठी अर्थशास्त्र परिषद*** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच प्रमुख संपादकाकडे पाठवावी.

▪ **मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.**


● अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:

१) भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, दिल्ली.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

*टिप:* म.रा.सा.सं.मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय संवादः सामान्यांचा 'बजेट' !

**" नेमेचि येतो मग पावसाळा"**

या उक्तीनुसार दर वर्षी २८ फेब्रुवारी रोजी भारतीय संसदेत केन्द्रीय अर्थमंत्री अर्थसंकल्प सादर करतात. पण या वर्षी पावसाळा जरा दोन आठवडे उशिराने आला. मला म्हणायचं आहे की अर्थसंकल्प पंधरा दिवस उशिरा सादर झाला. अलीकडे दृक्‌श्राव्य प्रसारमाध्यमांमध्ये अर्थसंकल्पापूर्वी चर्चा पहायला मिळते. यातून बजेट कसा येणार याविषयी जनसामान्यांत कुतुहल निर्माण होते. अर्थसंकल्पानंतरही चर्चा, मते, विश्लेषण सुरूच असते. या वर्षी रेल्वे बजेट तिकीट दरवाढीचा प्रस्ताव रेल्वेमंत्र्यांनी सादर केल्यानंतर त्यांना घरी जावं लागलं. रेल्वेच्या आर्थिक स्थितीशी कोणा राजकारण्याला काही 'घेणं-देणं' नाही हे आपण पाहिलं.

"आयकरमुक्त उत्पन्नाची मर्यादा या वर्षी कितीनं वाढेल?" या पगारदारांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर केन्द्रीय अर्थसंकल्पानं दिलं नाही. विकासदर सुस्तावला आहे. औद्योगिक क्षेत्राची कामगिरी खूप चांगली नाही. वित्तीय तूट प्रचंड झाली आहे. महागाईचा प्रश्न गंभीर रूप धारण करतोय. अशा संकटाच्या वेळी आलेल्या केन्द्रीय अर्थसंकल्पानं सेवाकराचं जाळं विस्तृत करून दरवाढ केली. अर्थसंकल्पातील चांगल्या बाबींचं सत्ताधारी पक्षाकडून गुणगान गायलं जातं. सत्ताधाऱ्यांना तो नेहमीच प्रगतीपथाकडे नेणारा, धाडसी पावले उचलणारा, पायाभूत क्षेत्राचा विकास करणारा वाटतो. तर विरोधी पक्षाला सामान्यपणे तो दिशाहीन, आर्थिक विषमता वाढवणारा, तूटीला आमंत्रण देणारा, महागाईला आमंत्रण देणारा एकंदरीत नकारात्मक वाटतो. बजेट तसा राज्यांचाही असतो. बजेट सादर झाला म्हणजे 'काय स्वस्त होणार?' आणि 'काय महागणार?' हे सामान्य माणूस पहातो. नव्हे त्यानं ते पहायलाच हवं कारण सामान्य माणसाचंही आपलं वैयक्तिक बजेट असतं. आपल्या उत्पन्न खर्चाची ताळमेळ बसवण्यासाठी त्याला कसरत करावी लागते. प्रत्येकाला मूलभूत गरजा पूर्ण करायच्या आहेत. त्यामुळे मिळालेलं उत्पन्न आपल्या गरजा भागविण्यासाठी खर्च केलं जातं. उत्पन्न जसजसं वाढत जातं त्यापेक्षा अधिक वेगानं गरजा भागविण्याचा खर्च वाढत जातो असा अनेकांचा अनुभव आहे. 'उत्पन्न जितकं जास्त तितकाच खर्चही जास्त' हे समीकरण होऊन बसलं आहे. वाढती महागाई हे खर्च वाढीचं एकमेव कारण सांगितलं जातं. पण तेच एक कारण नसतं. इतरही कारणं आहेत. खर्चाचं प्रमाण जितकं वाढतं तितकी उत्पन्नात वाढ होत नाही, हा ही अनेकांचा अनुभव आहे. परिस्थिती बदलते आहे. आज भडकलेल्या महागाईने सामान्य माणूस त्रस्त आहे. घरगुती गॅस, केरोसीन, पेट्रोल, डिझेल दरवाढीची त्याच्यावर टांगती तलवार आहे. जीवनावश्यक वस्तू, भाजीपाला, अन्न-धान्याच्या भाववाढीचे चटके बसत आहेत. अन्न-धान्यावरील सबसिडीवर होणारा सरकारी खर्च दुप्पट-तिपटीनं वाढला तरी भ्रष्ट सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे सर्वसामान्य माणसाची महागाईशी सुरू असलेली झुंज अद्याप संपुष्टात आलेली नाही.

तुमची आयकरमुक्त उत्पन्न मर्यादा किती वाढली - घटली याच्याशी काही घेणं-देणं नाही असाही मोठा वर्ग देशात आहे. त्याचं उत्पन्नच कधी त्या मर्यादेपलीकडे जाता जात नाही. त्यांना अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तूट, भांडवली तूट, संहिता विधेयक, केन्द्रीय उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर यांसारख्या अर्थशास्त्रीय शब्दांशी काहीच संबंध नसतो असा कोट्यवधी लोकांचा वर्ग या देशात

आहे. यामध्ये शेतमजूर, सालदार, अत्यल्प उत्पन्न गटातील कामगार वर्ग, किरकोळ भाजीपाला विक्रेते, दुकानांवर काम करणारा नोकरवर्ग, रिक्षाचालक, दूध ब्रेड अथवा वर्तमानपत्र सायकल वरून वाटप करणारा वर्ग, रद्दी भंगार व्यवसाय करणारे, घरगुती उपकरणे दुरुस्त करणारे फिरते व्यावसायिक, ग्रामीण भागात विविध वस्तू विक्री करणारे फिरते विक्रेते असा मोठा वर्ग समाविष्ट आहे. या वर्गाला आपल्या उत्पन्न-खर्चाची ताळमेळ बसवणं अत्यंत कठिण होतय. वाढत्या गरजा, वाढती महागाई आणि मर्यादित रोजंदारी (उत्पन्न) यांचा ताळमेळ घालता घालता त्यांचा प्रत्येक दिवस चिंतेत जातो आहे. त्यांच्या बजेटमधील उत्पन्न बाजू स्थिर झाली असून खर्चाची बाजू मात्र विस्तारते आहे.

दोन-तीन वर्षांपूर्वीचा हा प्रसंग आहे, मी जळगावला एका मेडिकल जनरल स्टोअर्समध्ये खरेदीसाठी गेलेलो होतो. तेथे एक ५०-५२ वर्षांचा व्यक्ती आला. त्याने दुकानदाराला डॉक्टरांनी दिलेली औषधांची यादी दिली आणि विचारलं..... "या औषधी किती रुपयांपर्यंत येतील?" दुकानदारानं कॅल्क्युलेटरवर झटपट हिशोब केला "साधारण साडेचारशे रुपये लागतील" असे सांगितले. त्यावर तो (आजारी) व्यक्ती चेहऱ्यावर ओढून ताणून स्मितहास्य आणून म्हणाला, "किरकोळ थंडी तॉप आहे. आपोआप चालला जाईल" बोलणं झाल्यावर तो निघून गेला. त्याचा चेहराच सांगत होता की, औषधी घेण्यासाठी पुरेसा पैसा त्याच्याकडे नव्हता. हा अतिसामान्य भारतीय माणसाचा प्रश्न आहे. त्याचं बजेट केव्हाच विस्कळीत झालं आहे. अशा विस्कळीत झालेल्या कोट्यवधी बजेटची तूट केन्द्रीय अर्थसंकल्पाच्या तूटीपेक्षा कदाचित जास्त असावी. सरकार सारखे स्वत:चं उत्पन्न ठरविण्याची साधने या सामान्य लोकांकडे नाहीत. जेव्हा या कोट्यवधी सामान्यांचे बजेट शिलकी होईल त्यावेळी आपण स्वाभिमानानं म्हणू की, "भारतीय अर्थव्यवस्थेनं केलेला आर्थिक विकास खऱ्या अर्थानं सामान्य माणसापर्यंत पोहोचला आहे."

***अर्थसंवाद* विषयी.....**

या अंकात विविध विषयांवरील शोधनिबंधाचा समावेश केला आहे. *अर्थ शब्दांची वाट पाहे* हा नियमित येणारा स्तंभ देखील आहे. परंतु या अंकापासून सलगपणे चार अंकात अर्थतज्ज्ञ डॉ. ज. फा. पाटील हे *अर्थ शब्दांची वाट पाहे* लिहिणार आहेत. त्यानंतर पुढील वर्षी डॉ.शि.ना.माने हे हा स्तंभ लिहितील. *अर्थ शब्दांची वाट पाहे* या लोकप्रिय स्तंभाच्या माध्यमातून दोन अर्थतज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळावे यासाठी आपण हा प्रयत्न करीत आहोत. या अंकामध्ये जाहिरात प्राप्त करून देण्यास परिषदेचे स्थानिक कार्यवाह डॉ.विकास सुकाळे यांचं सहकार्य लाभलं. जाहिरातीसाठी अंकांना विलंब होऊ नये याची काळजी आपण सर्व घेऊ या! सदर अंकातील सहभागी लेखकांचे आभार. *अर्थसंवाद*चा हा अंक वाचक स्वीकारतील, अशी अपेक्षा आहे.

***मराठी अर्थशास्त्र परिषदेविषयी......***

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे नवनियुक्त अध्यक्ष डॉ.कैलास पाटील व नवनियुक्त कार्याध्यक्ष प्रा.चारुदत्त गोखले यांनी १ एप्रिलपासून कार्यभार स्वीकारला आहे. त्यांना त्यांच्या यशस्वी कारकीर्दीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**- अविनाश रामलाल निकम, प्रमुख संपादक, 'अर्थसंवाद'**

# अर्थतज्ज्ञ डॉ. श्री. आ. देशपांडे: एक कृतार्थ जीवन

दि. व्यं. जहागिरदार, अमरावती
माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद,
अध्यक्ष, कौटिल्य ज्ञान प्रबोधिनी.
(भ्रमणध्वनी: ९८२२९२२९५१)

डॉ. श्रीधर आत्माराम देशपांडे यांचा जन्म साकोली येथे ३ ऑक्टोबर १९२४ रोजी झाला. जुन्या मॉरीस कॉलेजमधून अर्थशास्त्रात एम.ए. केल्यावर ते नागपूर येथे खाजगी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झालेत. तेथे अनेक वर्षे अध्यापन आणि संशोधनपर कार्य केल्यानंतर ते नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागात १९६९ पासून कार्यरत झाले. इ.स.१९७४ मध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातून सेवानिवृत्त झाले. त्यांनी पीएच्.डी. साठी विदर्भातील धान गिरण्यांचा अभ्यास केला होता. विशेष म्हणजे विद्यापीठातर्फे तो प्रबंध प्रसिध्द झाला होता. पीएच्.डी.चे मार्गदर्शक म्हणून त्यांनी अनेकांना कुशल मार्गदर्शन केले होते. १९६९ या वर्षात ते पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत सिनिअर रिसर्च फेलो होते. आपल्या प्रदीर्घ प्राध्यापकी जीवनात व सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व प्रादेशिक परिषदांना हजर राहून आपल्या विद्वत्तेची छाप पाडली होती. न्युझिलंड, ऑस्ट्रेलिया इत्यादी देशात त्यांनी आंतरराष्ट्रीय अधिवेशनांमध्येही भाग घेऊन महत्त्वाचे विचार मांडले होते.

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि डॉ. श्री.आ.देशपांडे यांचा प्रदीर्घ काळ व घनिष्ट संबंध होता. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे दुसरे अधिवेशन १९७८ मध्ये प्रा.वि.म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे भरले होते. नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित केलेले हे अधिवेशन डॉ.देशपांडे यांनी नागपूर परिसरातील प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या सहकार्याने अत्यंत यशस्वीपणे संपन्न केले. विशेष म्हणजे तिसऱ्या अधिवेशनासाठी अध्यक्ष म्हणून त्यांची अविरोध निवड झाली. औरंगाबादला विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे आयोजित ऑक्टोबर १९७९ मधील अधिवेशनासाठी त्यांनी *ग्रामीण विकासाच्या समस्या* हा विषय निवडला होता. ग्रामीण विकासाचे भिन्न आयाम, त्यातील समस्या व त्या दूर करण्याचे उपाय याविषयी त्यांच्या विचाराद्वारे व्यावहारिक प्रश्नावरील त्यांची पकड तसेच विद्वत्ता देखील प्रकट झाली. परिषदेच्या अनेक चर्चासत्रांचे त्यांनी सूत्र-संचालन केले. तसेच चर्चासत्रात काही मुद्यांवर उद्बोधनही केले. परिषदेच्या विविध अधिवेशनांना उपस्थित राहणे त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भागच झाला होता. त्यामध्ये त्यांना निर्भेळ आनंद मिळत होता. अगदी २००९ च्या बारामती येथील ३३व्या वार्षिक अधिवेशनाला देखील ते उपस्थित होते. अमरावती येथे झालेल्या परिषदेच्या

अधिवेशन प्रसंगी त्यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजकांनी त्यांचा सत्कारही केला होता. त्यानिमित्त त्यांनी अर्थसंवादला रु.५००० ची देणगी दिली होती. परिषदेच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग असे. तसेच परिषदेच्या घटना दुरुस्तीच्या कामातही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती.

विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची स्थापना व पुढील वाटचालीत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या परिषदेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. मुद्रा, वित्त, अधिकोषण, भारताचे विविध आर्थिक प्रश्न आणि असमतोल विकास हे त्यांच्या संशोधनाचे प्रमुख विषय होते. या विषयावर त्यांनी पाठ्यपुस्तके लिहिलीत. तत्कालीन आर्थिक विषयांवर त्यांनी वृत्तपत्रांतून लिखाणही केले. महाराष्ट्रात जवळपास ५० वर्षांपूर्वी अर्थशास्त्रावर पुस्तक लिहिणाऱ्या पिढीचे ते महत्त्वाचे शिलेदार होते. त्यांची अनेक पुस्तके संपूर्ण महाराष्ट्रभर प्राध्यापक व विद्यार्थी उपयोगात आणत असतात.

डॉ. देशपांडे यांनी शासनाने नियुक्त केलेल्या अनेक समित्यांवर कार्य केले. विशेषत: दांडेकर समितीचे ते सदस्य होते. डॉ.माधवराव चितळेंच्या अध्यक्षतेखालील दुसऱ्या सिंचन आयोगावरही शासनाने त्यांची नियुक्ती केली होती. विदर्भ वैधानिक विकास मंडळावर तज्ज्ञ सदस्य म्हणूनही त्यांनी कार्य केले. महाराष्ट्राच्या आर्थिक विकास प्रक्रियेच्या अध्ययनात व त्यावरील चर्चेत दांडेकर समितीच्या अहवालाचा आणि प्रादेशिक अनुशेषाच्या प्रश्नाचा वारंवार उल्लेख होतो. विशेषत: अनुशेष दूर करण्याची उपाय योजना व त्याची कार्यवाही हे तर विशेष चर्चेचे मुद्दे असतात. या अहवालात डॉ. देशपांडे आणि बी.जी.दवे यांनी सादर केलेली पूरक टीप महत्त्वाची ठरली. या टिपेत त्यांनी प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी समितीने स्वीकारलेला दृष्टिकोन मान्य केला. तथापि समितीने सूचविलेली उपाययोजना अधिक प्रभावी व्हावी म्हणून विदर्भ, मराठवाडा, कोकण व उर्वरित महाराष्ट्र या विभागांसाठी स्वतंत्र मंडळे करण्याचे सूचविले. अशी मंडळे स्थापन व्हावीत अशी विदर्भ, मराठवाड्यातील जनतेची मागणी होती. दांडेकर समितीने त्यांचा मताचा आदर करून ही सूचना मात्र अमान्य केली. पुढील काळात जनमताचा रेटा लक्षात घेऊन राज्य शासनाने राष्ट्रपतींना ही मंडळे स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार ११ एप्रिल १९९४ रोजी राष्ट्रपतींनी या मंडळांच्या स्थापनेस मंजुरी दिली. या प्रमाणे डॉ. देशपांडे आणि दवे यांची उपाययोजना प्रत्यक्षात आली.

डॉ. देशपांडे यांनी विदर्भातील प्राध्यापक संघटनेचे काही काळ नेतृत्व केले. नागपूर विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे ते अधिष्ठाता होते. तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवरही त्यांनी प्रभावी कार्य केले होते. इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन या संस्थेच्या नागपूर शाखेचे ते अध्यक्ष होते. डॉ. देशपांडे समाधानी व समर्पित जीवन जगले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या इतिहासात डॉ. देशपांडे व त्यांचे पुत्र डॉ.विनायक देशपांडे हे पितापुत्र दोघेही अध्यक्ष होण्याचा योग घडून आला.

अखेरीस आपल्या घरीच पलंगावरून पडल्याचे निमित्त झाले आणि एका सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञाची, चांगल्या लोकप्रिय शिक्षकाची, विविध प्रश्नांवर आपली भूमिका प्रखरपणे मांडणाऱ्या एका शांत, संयमी व कुटुंबवत्सल प्राध्यापकाची ४ मार्च २०१२ रोजी जीवनज्योत मालवली. मराठी अर्थशास्त्र परिषद व मी डॉ. श्री. आ. देशपांडे यांना विनम्र श्रध्दांजली अर्पण करतो.

# स्थलांतरीत श्रमिकांचे आर्थिक अध्ययन

**संजय तळतकर, बीड,**
सहाय्यक प्राध्यापक, जयभवानी महिला कला महाविद्यालय, गेवराई
(आजीव सभासद क्र. ११५५)
**रामकृष्ण सोळुंके, औरंगाबाद,**
विभाग प्रमुख, अर्थशास्त्र विभाग,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ.
(आजीव सभासद क्र. ८१६)

---

**प्रस्तावना:**

स्थलांतर हा लोकसंख्येच्या आकारात व रचनेत बदल घडवून आणणारा महत्त्वाचा घटक आहे. अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथ याने मानवाच्या गतीक्षमतेविषयी असे म्हटले आहे की, उत्पादनाच्या चार घटकांपैकी श्रमशक्ती या घटकाची गतिक्षमता जास्त आहे. पूर्वीच्या काळात कमी प्रमाणात व्यक्ती नैसर्गिक आपत्तीमुळे तसेच उद्योगधंद्यांच्या किंवा व्यापाराच्या निमित्ताने आपले वास्तव्याचे ठिकाण सोडून परगावी, परप्रांती किंवा परदेशात जात असत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आणि विशेषत: आर्थिक नियोजनाची सुरुवात झाल्यापासून भारतामध्ये ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे किंवा ज्या ठिकाणी काम मिळेल अशा ठिकाणी स्थलांतर करणे नित्याचे झाले आहे. लोकसंख्येतील जलद गतीने होणारी वाढ व दर माणसी जमिनीच्या उपलब्धतेत होणारी घट यामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्यामुळे अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातून नागरी भागाकडे विविध कारणांमुळे स्थलांतर घडून येत आहे.

भारतासारख्या लोकशाहीप्रधान शासन प्रणाली असणाऱ्या देशात लोकांना हवे तेथे राहण्याचे व हव्या त्या प्रांतात काम करण्याचे स्वातंत्र्य आहे. सर्वसाधारणपणे स्थलांतर करण्याची प्रवृत्ती ही सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय घटकांनी प्रभावित असते. आधुनिक काळात वाहतुक व दळणवळणाच्या क्षेत्रातील क्रांतीमुळे जग अतिशय लहान झाले आहे. देशातल्या देशात स्थलांतर करणाऱ्या व्यक्तींची संख्याही खूप वाढत आहे. विकसनशील देशामध्ये ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग झाला आहे. स्थलांतर

ही एक अशी घटना आहे की ज्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. भारतामध्ये श्रमिकांची स्थिती नैसर्गिक आपत्ती, बेकारी, दारिद्र्य इत्यादीमुळे हलाखीची बनली आहे. म्हणून आपल्या उदरनिर्वाहासाठी शहरी भागाकडे किंवा काम उपलब्ध असणाऱ्या ठिकाणी त्यांना स्थलांतर करावे लागते.

## स्थलांतराची कारणे:

स्थलांतर ही प्रक्रिया अनेक घटकांशी निगडित असते. त्यामध्ये मानवी वृत्ती, भौगोलिक घटक, नैसर्गिक घटक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय घटकांचा समावेश होतो. स्थलांतर ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ती अनेक घटकांवर अवलंबून असते. वाढती लोकसंख्या हे भारतातील श्रमिकांच्या स्थलांतराचे प्रमुख कारण आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ग्रामीण भागातील हस्तउद्योग व बलुतेदारी पध्दतीचा झालेला ऱ्हास यामुळे देखील बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर निर्माण झाला आहे. परिणामी बेरोजगार लोक ग्रामीण भागातून शहराकडे किंवा रोजगार मिळणाऱ्या ठिकाणाकडे स्थलांतरीत होऊ लागले आहेत.

वाढती लोकसंख्या आणि वारसा हक्काचे कायदे यामुळे शेतीचे लहान भाग होत गेले. जमिनीचे विभाजन हे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसते. त्यातून दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, इत्यादी समस्या उद्‌भवतात आणि त्यामुळे शहराकडे किंवा कामाच्या ठिकाणी स्थलांतर होते.

## अध्ययन विषयाची निवड:

स्थलांतर ही प्रक्रिया मानवाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनात बदल घडवून आणणारी महत्त्वाची घटना आहे. मानवी स्थलांतर हे शक्यतो आर्थिक प्राप्तीसाठी म्हणजे रोजगाराच्या प्राप्तीसाठी जास्त प्रमाणात होते. रोजगार उपलब्ध होत नसेल तर त्याला आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी इतरत्र स्थलांतरीत व्हावे लागते.

काही वेळा स्थलांतर हे कायमचे असते तर बऱ्याच अंशी स्थलांतर हे तात्पुरत्या स्वरुपाचे म्हणजेच हंगामी असते. महाराष्ट्रातील बीड जिल्हा हा राज्याला उसतोड आणि इतर स्वरुपाच्या श्रमिकांचा पुरवठा करणारा जिल्हा आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखान्यांच्या ऊस तोडणीसाठी बीड जिल्ह्यातील श्रमिक हे सर्वात जास्त आहेत. सर्वसाधारणपणे बीड जिल्ह्यामध्ये ऊसतोडणी श्रमिकाकडे जास्त लक्ष वेधले जाते. मात्र पाहणीत असे आढळून आले आहे की, जिल्ह्यातील श्रमिक ऊसतोडणीसाठीच जात नाहीत तर त्याचप्रमाणे विटभट्टी, बांधकाम, दगडकाम, दुकाने इत्यादी क्षेत्रात मजुरीसाठी अनेक कुटुंबे स्थलांतरीत झाले आहेत.

बीड जिल्ह्यामध्ये अनेक श्रमिकांना स्वतःच्या मालकीची शेती नाही. ज्यांना जमीन आहे ते अल्पभूधारक आहेत. मोठ्या प्रमाणावर शेती पावसावर म्हणजेच निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. बीड जिल्ह्यातील आष्टी, पाटोदा यासारखे तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. त्यामुळे लोक ऊसतोडणीसाठी जास्त प्रमाणात स्थलांतर करतात. त्या पाठोपाठ वीटभट्टी, दगडकाम, बांधकाम, शहरातील व्यावसायीक दुकाने उदा. कापड दुकान, किराणा, स्टेशनरी, ऑटोमोबाईल सारख्या दुकानात काम करण्यासाठी त्यांना स्थलांतर करावे लागते. अभ्यासाचा हेतू स्थलांतर करणाऱ्या श्रमिकांच्या संबंधीचे वास्तव शोधणे हा होता. त्यासाठी बीड जिल्ह्यातील

स्थलांतरीत श्रमिकांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा चिकित्सक अभ्यास करताना पुढील उद्दिष्ट्ये होती.

### अध्ययनाची उद्दिष्ट्ये:

१. स्थलांतरीत श्रमिकांना मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करणे.

२. स्थलांतरीत श्रमिकांचा उपभोग व त्यावर होणारा खर्च याची माहिती घेणे.

३. स्थलांतरामुळे रोजगारात झालेला बदल याचा अभ्यास करणे.

४. स्थलांतरीत श्रमिकांच्या कर्जबाजारीपणाचा अभ्यास करणे.

५. बीड जिल्ह्यातून स्थलांतरीत झालेल्या श्रमिकांना राहणीमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाय योजना सुचविणे.

### संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आधार सामग्री आणि दुय्यम आधार सामग्री अशा दोन्ही प्रकारच्या सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक सामग्रीचा मुख्य आधार घेतला होता. त्यासाठी अनुसूचीद्वारे स्थलांतरीत श्रमिकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या होत्या. मुलाखतीसाठी बीड जिल्ह्यातील गेवराई, माजलगाव, बीड, आष्टी, अंबेजोगाई, परळी, धारूर, केज आणि पाटोदा या नऊ तालुक्यांची निवड करण्यात आली. तालुक्यातील श्रमिक निवडण्यासाठी त्या तालुक्यातील सर्वात मोठ्या महसूल विभागाची निवड केली. महसूल विभागातील गावे निवडण्यासाठी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. निवडलेल्या महसूल गावांमध्ये एकूण ३०० गावे होती. अशा प्रकारे ३० गावे निवडण्यात आली. या प्रत्येक गावामधील साधारणपणे दहा ते बारा कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. ज्यामध्ये ऊसतोड, विटानिर्मिती क्षेत्र, बांधकाम व्यवसाय आणि इतर क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी श्रमिकांनी स्थलांतर केले होते. अशा प्रकारच्या एकूण ३५० कुटुंबांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन प्राथमिक सामग्री संकलित करण्यात आली.

### स्थलांतरीत श्रमिकांच्या आर्थिक समस्या:

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांचे आर्थिक समस्यांचे अध्ययन करताना एकूण ३५० कुटुंबांची नमुना निवड करून पाहणी करण्यात आली होती. स्थलांतरीत श्रमिकांच्या कुटुंबांची पाहणी करीत असताना कुटुंबाचे राहणीमान, दारिद्र्य, शिक्षण, व्यवसाय, स्थलांतराचे क्षेत्र इत्यादी निर्देशक समोर ठेऊन अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. या नमुना पाहणीमध्ये असे दिसून आले की, जिल्ह्यातील बहुतांशी स्थलांतरीत कुटुंबे अतिशय निम्न स्तरावरील जीवन जगत होते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास स्थलांतरीत श्रमिकांचे राहणीमान अतिशय निकृष्ट दर्जाचे होते. बहुतांश कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत असताना दिसून आली. प्रस्तुत लेखामध्ये अभ्यासाची उद्दिष्ट्ये आणि संशोधन पध्दती विचारात घेऊन स्थलांतरीत श्रमिकांच्या आर्थिक स्थितीचे चिकित्सक अध्ययन करण्यात आले.

### विविध व्यवसायात श्रमिकांचे झालेले स्थलांतर:

बीड जिल्ह्यातील श्रमिक रोजगार मिळविण्यासाठी आणि आपल्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून स्थलांतर करतात. स्थलांतर करताना ज्या क्षेत्रात जास्त वेतन मिळेल अशा क्षेत्राची निवड

करतात. ज्या श्रमिकांना शारीरिक अंगमेहनतीची कामे जमत नाहीत असे श्रमिक इतर व्यवसायातील कामाकडे वळतात. बीड जिल्ह्यातून श्रमिकांचे स्थलांतर विविध व्यवसायात रोजगार प्राप्तीसाठी झालेले आहे. हे तक्ता क्र.१ वरून स्पष्ट होते.

बीड जिल्ह्यातून बांधकाम व्यवसायात सर्वात जास्त श्रमिकांनी स्थलांतर केलेले होते. त्या पाठोपाठ ऊसतोडणी व्यवसायात स्थलांतर करणाऱ्यांची होती. स्थलांतराचे सर्वात कमी प्रमाण विटनिर्मिती क्षेत्रात दिसून आले. शहरांचा होत असलेला जलद विकास आणि घरांची वाढती संख्या इत्यादींमुळे बांधकाम क्षेत्रात श्रमिकांची मागणी वाढत आहे. तसेच या व्यवसायात रोजगार अधिक प्रमाणात मिळतो त्यामुळे अनेक श्रमिक बांधकाम व्यवसायात काम करण्यास उत्सुक आहेत. इतर व्यवसायात काम करण्यामध्ये खाणकाम (दगडकाम) असे व्यवसाय आहेत. यामध्ये विशेष बाब अशी आढळून आली की, दगडकाम करणाऱ्यामध्ये वडार या जातीचाच प्रामुख्याने समवेश होता. जिल्ह्याच्या बाहेर स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त तर त्या पाठोपाठ तालुक्याच्या ठिकाणी स्थलांतर आणि नंतर जिल्ह्याच्या ठिकाणी स्थलांतर केलेले आढळते.

तक्ता क्र.१

स्थलांतरीतांचे व्यवसाय क्षेत्र

| अ.क्र. | व्यवसायाचा प्रकार | स्थलांतरीत कुटुंबांची संख्या | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ऊस तोडणीसाठी | ११९ | ३४.०० |
| २. | बांधकाम व्यवसायासाठी | १२३ | ३५.१४ |
| ३. | विट निर्मितीसाठी | २७ | ०७.७१ |
| ४. | इतर व्यवसायासाठी | ८१ | २३.१५ |
| | **एकूण** | ३५० | १०० |

*स्रोत : प्रत्यक्ष नमुना पाहणी*

इतर राज्यात रोजगारासाठी स्थलांतर करणाऱ्यांची संख्या सर्वात कमी असली तरी सुध्दा रोजगार मिळवण्यासाठी राज्याबाहेरही स्थलांतर करण्याची श्रमिकांची तयारी होती असे आढळून आले.

## श्रमिकांच्या स्थलांतराचा प्रकार:

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांचा अभ्यास करण्यासाठी ३५० श्रमिक कुटुंबांची पाहणी केली असता, श्रमिकांनी तात्पुरते, हंगामी आणि काही श्रमिकांनी कायम स्थलांतर केलेले दिसून आले. ऊसतोडणी आणि विटनिर्मिती या क्षेत्रात रोजगार मिळविण्यासाठी केलेले स्थलांतर हे बहुतांशी हंगामी स्वरुपाचे स्थलांतर होते. बांधकाम व इतर व्यवसायात काम करणाऱ्या श्रमिकांनी तात्पुरते आणि कायमचे स्थलांतर केलेले दिसून येते.

सर्वात जास्त स्थलांतर हे हंगामी स्वरुपाचे असून ते ६०.२९ % तर कायम स्वरुपाचे स्थलांतर

हे सर्वात कमी असून त्याचे प्रमाण १७.५७% होते. यामध्ये ऊसतोडणी, विटनिर्मिती, दगडकाम (खाणकाम) करण्यासाठी गेलेल्या श्रमिकांचे प्रमाण जास्त होते. तर शहरामध्ये किराणा, कापड, स्टेशनरी, ऑटोमोबाईल, इत्यादी दुकानात आणि शहरात बांधकाम क्षेत्रात काम करण्यासाठी आलेले श्रमिकांचे तात्पुरते स्थलांतर झालेले होते.

## स्थलांतरीत श्रमिकांची आर्थिक स्थिती:

बीड जिल्ह्यातील ३५० स्थलांतरीत कुटुंबांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन अनुसुचीद्वारे त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात आला. श्रमिकांचे राहणीमान, दारिद्र्य, उत्पन्न, खर्च, उपभोग वस्तू, चैनीच्या वस्तू, कर्जबाजारीपणा, त्यांच्याकडे असलेले पशूधन, शेती, शेती अवजारे इत्यादी घटकांची दखल घेण्यात आली होती.

## राहणीमान पाहणी व निष्कर्ष:

कौटुंबिक राहणीमानाच्या संदर्भात अर्नेस्ट एंजेल, यांनी पाहणी करून काही स्थूल निष्कर्ष काढले. त्याला कौटुंबिक अर्थसंकल्प विषयक एंजेलचा नियम असे म्हटले जाते. गरीब कुटुंबाच्या उत्पन्नाचा मोठा भाग अन्न, वस्त्र, निवारा, दिवाबत्ती यासारख्या आवश्यक घटकावर खर्च होतो. उर्वरित उत्पन्नापैकी बराचसा भाग परिपोषक वस्तूंवर व थोडासा भाग चैनीच्या वस्तूंवर खर्च होतो. आवश्यक तेव्हा चैनीच्या वस्तूंवर खर्च कमी केला जातो. काटकसर करण्याची वेळ आल्यास प्रथम चैनीच्या वस्तूंवर कात्री चालविली जाते. अशा कुटुंबाचे उत्पन्न वाढू लागल्यास प्रथम आवश्यक वस्तूवरील खर्च वाढत जातो. श्रीमंत कुटुंबात आवश्यक वस्तू आणि परिपोषक वस्तू यांच्या सेवनात सर्व गुणात्मक सुधारणा सतत होतच असतात. त्यावरचा खर्च फारसा वाढत नाही. चैनीच्या वस्तू व सेवा यावरचा खर्च मात्र मोठा असतो. वरील पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांचे राहणीमान तपासण्याचा प्रयत्न केला असता असे दिसून आले की, जिल्ह्यातील बहुतांश स्थलांतरीत श्रमीकांची कुटुंबे ही तांदुळ, दूध, बिस्किट, पाव, मिठाई, टुथपेस्ट, दंतमंजन सौंदर्य प्रसाधने, वीज, वर्तमानपत्रे या आवश्यक व परिपोषक उपयोग्य वस्तूंपासून वंचित असलेले दिसून आले. बीड जिल्ह्यातील ३५० स्थलांतरीत कुटुंबांपैकी तांदळाचा उपभोग न घेणारी ९८ (२६.२८ %) कुटुंबे होती. दूध व दुधाच्या पदार्थाचा उपभोग न घेणारी ५७ (१६.२८ %) कुटुंबे होती. बिस्किट, पाव आणि मिठाई यांचा उपभोग न घेणारी १९२ (५४.८५ %) कुटुंबे होती. मांस, अंडी यांचा उपभोग न घेणारी १५ (४.२८ %) कुटुंबे होती. टूथपेस्ट व दंतमंजन यांचा उपभोग न घेणारी ५० (१४.२८%) कुटुंबे होती. सौंदर्य प्रसाधनाचा वापर न करणारी १९० (५४.२८%) कुटुंबे होती. वर्तमानपत्रे न वाचणारी २९७ (८४.८५%) कुटुंबे होती, केसांचे तेल व शॅम्पू यांचा उपयोग न घेणारी १० (२.८५%) कुटुंबे होती. तर घरात विजेचा वापर न करणारी किंवा घरात वीज मिटर नसलेली ३२० (९१.४३%) कुटुंबे होती. थोडक्यात असे की बहुतांश कुटुंबे परिपोषक आहारापासून वंचित होती. सर्वात महत्त्वाचे असे की ८४.८५% कुटुंबे वर्तमानपत्राचे वाचन करीत नव्हती. तर ९१.४३% कुटुंबांच्या घरात वीज उपलब्ध नव्हती. त्यांना रॉकेल, चिमण्या, कंदिलाचा आधार घ्यावा लागतो.

## चैनीच्या वस्तूंचा उपभोग न घेणारी कुटुंबे:

वस्तूंच्या उपभोगावरून व्यक्तीच्या राहणीमानाचा अंदाज करता येतो. चैनीच्या वस्तू वापरांच्या संदर्भात बीड जिल्ह्यातील ३५० कुटुंबांची नमुना पाहणी केली असता बीड

जिल्ह्यातील ३५० श्रमिकांच्या कुटुंबांपैकी ३१९ (९१.१४%) कुटुंबांकडे रेडिओ, २९८ (८५.१४५%) कुटुंबांकडे टीव्ही, व्हीसीडी, ३३९ (९६.८६%) कुटुंबांकडे पंखा, ११६ (३३.१४) कुटुंबांकडे घड्याळ ९१ (२६.०० टक्के) कुटुंबांकडे टेप रेकॉर्डर, ३०४ (८६.८५%), सायकल २७१ (७७.१४%), खुर्च्या-टेबल २९३(८३.७१%), पलंग १०९ (३१.१४%), मोटार सायकल व लुना ३२८ (९३.७१%) कुटुंबांची या वस्तूंचा उपभोग घेण्याची क्षमता नव्हती.

## बीड जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील स्थलांतरीत कुटुंबे:

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत ३५० कुटुंबांच्या दारिद्र्याची स्थिती तक्ता क्र.२ वरून स्पष्ट होते. तक्त्यावरून असे दिसून येते की, ५ ते १० हजार एवढे उत्पन्न असणारी कुटुंबे १९ (५.४२%), १० ते २० हजार एवढे उत्पन्न असणारी कुटुंबे २६२ (७४.८६%), २० ते ३० हजार एवढे उत्पन्न गटात मोडणारी ६४(१८.२८%) कुटुंबे होती, फक्त तीन कुटुंबांचे उत्पन्न ३० ते ४० हजार रुपये तर २ कुटुंबांचे उत्पन्न ४० ते ५० हजार रुपये होते. त्यांची टक्केवारी अनुक्रमे ०.८५ % व ०.५७ % एवढी होती. ५० हजारापेक्षा जास्त उत्पन्न असलेले फारसे कुटुंब आढळून आले नाही.

थोडक्यात असे सांगता येईल की स्थलांतरीत कुटुंबांमध्ये १० ते २० हजार रुपये उत्पन्न असणाऱ्यांची संख्या सर्वात जास्त होती ज्याचे प्रमाण ७४.८६ % एवढे होते. याचाच अर्थ असा होतो की, केन्द्रशासनाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना १९९७-९८ या मार्गदर्शक सूचना तत्त्वानुसार बीड जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील स्थलांतरीत कुटुंबांची संख्या २८१ होती. ज्याचे प्रमाण ८०.२८ % एवढे होते.

## उपभोग खर्च:

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत कुटुंबाचा उपभोगावरील वार्षिक सरासरी खर्च किती आहे याचाही मागोवा घेण्यात आला. वार्षिक उपभोग खर्च हा निर्देशक मानून ३५० स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांची पाहणी केली असता असे दिसून आले की बहुतांशी स्थलांतरीत श्रमिकांचा उपभोगावरील खर्च हा अतिशय कमी होता हे खालील तक्त्यावरून सांगता येईल.

तक्ता क्र. ३ वरून असे स्पष्ट होते की ० ते ५ हजार रुपये वार्षिक खर्च असणारी ४.५७% कुटुंबे होती. २५ हजार ते ३० हजार रुपये वार्षिक उपभोग खर्च करणाऱ्या कुटुंबांची संख्या सर्वात कमी ज्याचे प्रमाण ०.८६ % होते.

यावरून आपणास असे स्पष्ट करता येते की, केंद्रशासनाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची गणना १९९७-९८ या मार्गदर्शक सुचना तत्त्वानुसार ज्या कुटुंबाचा वार्षिक उपभोग खर्च २०००० रुपयांपेक्षा कमी आहेते कुटुंब दारिद्र्य रेषेखालील समजावे. या तत्त्वाला आधारभूत मानून बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांपैकी ९६.५७ % कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील जीवन जगत होती.

## निवाऱ्याची स्थिती:

बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांच्या राहत्या घराची स्थिती पाहण्यासाठी जिल्ह्यातील ३५० स्थलांतरीत श्रमिकांच्या घराची पाहणी केली असता असे दिसून आले की २८८ (८२.२८%) स्थलांतरीत कुटुंबांकडे कच्च्या स्वरूपाची घरे होती. तर ६२ स्थलांतरीत कुटुंबांकडे म्हणजेच १७.७२ % कुटुंबांकडे पक्की घरे होती.

दारिद्र्याचा एक महत्त्वाचा निकष म्हणजे शौचालय होय. शौचालय असणारे फक्त १६ कुटुंबे आढळून आली. ज्याचे प्रमाण फक्त ४.५७ %

तक्ता क्र.२

स्थलांतरीत कुटुंबांचे उत्पन्न (वार्षिक उत्पन्न रुपयांमध्ये)

| अ.क्र. | स्थलांतरीत कुटुंबाचे उत्पन्न | कुटुंबांची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १. | ५ ते १० हजार रुपये | १९ | ५.४२ |
| २. | १० ते २० हजार रुपये | २६२ | ७४.८६ |
| ३. | २० ते ३० हजार रुपये | ६४ | १८.२८ |
| ४. | ३० ते ४० हजार रुपये | ०३ | ०.८५ |
| ५. | ४० ते ५० हजार रुपये | ०२ | ०.५७ |
| ६. | ५० हजारापेक्षा जास्त | १९ | ५.४२ |
| | एकूण | ३५० | १०० |

होते. ३५० स्थलांतरीत कुटुंबांपैकी ३३४ (९१.४३%) कुटुंबांकडे शौचालय नाही.

## शेतजमिनीची मालकी व त्या संबंधीची स्थिती:

बीड जिल्ह्यातील ६४ % स्थलांतरीत कुटुंबाकडे स्वतःची शेत जमीन नाही. ज्या कुटुंबांना जमीन नाही, त्यांचे प्रमाण अत्यल्प होते. २९.१४ टक्के श्रमिक हे अल्प भूधारक होते. ४ एकरपेक्षा जास्त जमीन असलेल्या श्रमिक कुटुंबांचे प्रमाण १०.८६ % होते. मात्र वेळी-अवेळी पडणारा पाऊस निसर्गावर अवलंबून असणारी शेती यामुळे होणारे उत्पादन अल्प होते. याच कारणामुळे रोजगारासाठी श्रमिकांना स्थलांतर करावे लागते. यावरून आपणास असे म्हणता येईल की सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्यास ज्यांच्याकडे जमीन आहे असे श्रमिक स्वतःच्या शेतीत काम करतील.

तक्ता क्र. ३

स्थलांतरीत श्रमिकांचा सरासरी वार्षिक उपयोग खर्च

| अ.क्र. | स्थलांतरीत कुटुंबाचे उत्पन्न | कुटुंबांची संख्या | प्रतिशत |
|---|---|---|---|
| १. | रु.५००० पर्यंत | १६ | ४.५७ |
| २. | रु.५००० ते १०००० | २७५ | ७८.५७ |
| ३. | रु.१०००० ते १५००० | ३२ | ९.१४ |
| ४. | रु.१५००० ते २०००० | १५ | ४.२९ |
| ५. | रु.२०००० ते २५००० | ९ | २.५७ |
| ६. | रु.२५०००.० ते ३०००० | ३ | ०.८६ |
| ७. | रु.३०००० ते ३५००० | ० | ० |
| | एकूण | ३५० | १०० |

त्यांना रोजगार मिळेल. रोजगार मिळविण्यासाठी स्थलांतर करण्याची गरज भासणार नाही.

## स्थलांतरीत श्रमिकांच्या कर्जबाजारीपणाची स्थिती:

प्रत्यक्ष सर्वेक्षणानुसार स्थलांतरीत श्रमिकांच्या कर्जाच्या स्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, कर्जाच्या स्त्रोतामध्ये सावकाराकडून कर्ज घेणाऱ्या स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांची संख्या ४७ होती. ती इतर स्त्रोतांपेक्षा सर्वात जास्त होती. एकूण ३५० श्रमिक कुटुंबांपैकी १३२ कुटुंबांनी कर्ज घेतल्याचे दिसून येते. सावकाराकडून घेतलेल्या कर्जावर दर महिन्याला ५% व्याज द्यावे लागते. त्याचे दरसाल दर शेकडा प्रमाण ६०% होते. सावकाराच्या व्याजाचे दर सर्वात जास्त होते. मुकादमाकडून घेतलेल्या कर्जाच्या व्याजाचा दर सावकारासारखाच होता. मात्र मुकादमाकडून कर्ज घेणाऱ्या कुटुंबांची संख्या फक्त दोन होती. गावातील प्राथमिक सेवा सहकारी कृषि पतपुरवठा संस्थेकडून २८ स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांनी कर्ज घेतले. त्याचा व्याजाचा दर दरसाल दर शेकडा १५% होता. पतसंस्थेकडून कर्ज घेणाऱ्या स्थलांतरीत कुटुंबांची संख्या ११ होती हे कर्ज त्यांनी दर दरसाल दर शेकडा १६% व्याजदराने घेतले होते. राष्ट्रीयीकृत बँक व ग्रामीण बँकांकडून कर्ज घेणाऱ्यांची संख्या अनुक्रमे १३ व १४ होती. या बँकांचा व्याजदर सर्वात कमी म्हणजे दर दरसाल दर शेकडा १२% एवढा होता. मित्र व नातेवाईकांकडून कर्ज घेणाऱ्या स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांची संख्या अनुक्रमे ९ व ८ होती. त्यांचा व्याज दर, दर दरसाल दर शेकडा अनुक्रमे ४८ % व ३६ % होता.

स्थलांतरीत श्रमिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांना कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी पुढे येणे गरजेचे आहे.

## कर्जबाजारीपणाची कारणे:

बीड जिल्ह्यातील ३५० स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांची पाहणी केली असता १३२ श्रमिकांनी कर्ज घेतल्याचे दिसून आले. घेतलेले कर्ज अनेक कारणांसाठी असून ते अनुत्पादक कार्यासाठी वापरलेले दिसून आले.

अभ्यासावरून असे दिसते की, स्थलांतरीत झालेल्या श्रमिकांनी शेतीच्या मशागतीसाठी म्हणजे बी-बियाणे, खते, औषधी, इत्यादींसाठी कर्ज काढले होते, ज्याचे प्रमाण एकूण कर्जाच्या २१.९७% एवढे होते. दैनंदिन गरजा भागविण्यासाठी स्थलांतरीत ०७ (५.३०%) श्रमिक कुटुंबांनी कर्ज घेतले होते. विवाह करण्यासाठी ७२ कुटुंबांनी कर्ज घेतल्याचे दिसून आले. ज्याचे प्रमाण ५४.५५% होते. हे कर्ज मात्र मुलींच्या लग्नाकरिता काढलेले दिसून आले. धामिक विधीसाठी कर्ज घेणारे फक्त एकच कुटुंब दिसून आले. वैद्यकिय खर्चासाठी ०७ (५.३०%) श्रमिक कुटुंबांनी कर्ज काढले होते. वाहन खरेदीसाठी (दुचाकी) ०३ (२.२७%) श्रमिक कुटुंबांनी कर्ज काढले होते. जमीन खरेदीसाठी ११ (८.३४%) स्थलांतरीत श्रमिक कुटुंबांनी कर्ज काढले होते. शिक्षणासाठी कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण १.५२% होते.

## स्थलांतराविषयी श्रमिकांची भूमिका:

बीड जिल्ह्यातून स्थलांतरीत झालेल्या ३५० कुटुंबांचा अभ्यास केला असता स्थलांतराविषयी श्रमिकांच्या भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्याबाबतची भूमिका तक्ता क्र.४ वरून लक्षात येते. तक्ता ४ चे अध्ययन केले असता स्थलांतरीत श्रमिकांची

**तक्ता क्र. ४**

**श्रमिकांची भूमिका**

| अ. क्र. | भूमिका | एकूण कुटुंबे | भूमिका मांडणारी कुटुंबे | प्रतिशत |
|---|---|---|---|---|
| १ | स्थलांतराची स्थिती येऊ नये | ३५० | २७९ | ७९.७१ |
| २ | स्थलांतर विशिष्ट काळासाठी मर्यादित असावे | ३५० | ११२ | ३२.०० |
| ३ | स्थलांतर योग्य आहे | ३५० | ७१ | २०.२८ |
| ४ | स्थलांतरामुळे कार्यकुशलता वाढीस लागते | ३५० | १२४ | ३५.४२ |
| ५ | उत्पन्न/रोजगारवाढीमुळे स्थलांतर आवश्यक आहे | ३५० | ३२७ | ९३.४२ |

*आधार : प्रत्यक्ष नमुना पाहणी*

स्थलांतराविषयीची असलेली भूमिका लक्षात येते. स्थलांतराची स्थिती निर्माण होऊ नये असे २७९ (७९.७१%) श्रमिक कुटुंबांनी सांगितले. म्हणजेच स्थलांतराची स्थिती येऊ नये असे बहुतांश श्रमिकांचे मत होते. यावरून आपणास असे म्हणता येते की स्थलांतर करण्याची श्रमिकांची अजिबात इच्छा नाही. परंतु स्थानिक ठिकाणी रोजगार मिळत नसल्यामुळे किंबहुना रोजगार मिळत असला तरी मजुरी कमी मिळते. मजुरीचे पैसे एकदम उचल म्हणून मिळत नाही, इतर पर्यायी व्यवसाय नाहीत. अशा विविध कारणांमुळे श्रमिकांना स्थलांतर करावे लागते. श्रमिकांचे होणारे स्थलांतर ऐच्छिक नाही. स्थानिक ठिकाणी पुरेसे उत्पन्न व रोजगार उपलब्ध झाल्यास स्थलांतराचे प्रमाण कमी होऊ शकते.

स्थलांतर हे विशिष्ट काळासाठी असावे असे ११२(३२%) श्रमिकांचे मत होते. स्थलांतर विशिष्ट कालावधीसाठी असावे म्हणजेच स्थलांतरामुळे श्रमिकांच्या जीवनावर, आरोग्यावर, शेतीच्या मशागतीवर, मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होऊ नये असे श्रमिकांना वाटते. स्थलांतर योग्यआहे असे मत ७१ (२०.२८%) श्रमिकांनी व्यक्त केले. स्थलांतर योग्य आहे कारण त्यामुळे उत्पन्नात वाढ होते, रोजगार मिळतो, कौटुंबिक गरजा भागविता येतात इत्यादीसाठी काही श्रमिकांना स्थलांतर हाच पर्याय वाटतो.

स्थलांतरामुळे कार्यकुशलता वाढीस लागते. पारंपरिक व्यवसाय करून ते वेगवेगळ्या व्यवसायात काम करतात. स्थलांतरापूर्वी श्रमिक फक्त मजुरी व शेती करीत. स्थलांतरामुळे उसतोडणी, वीट निर्मिती, खाणीत काम करणे, शहरातील विविध दुकानात काम करण्याची संधी श्रमिकांना स्थलांतरामुळे मिळाली. यामुळे त्या त्या क्षेत्रात कामाची कुशलता वाढीस लागते असे मत ३५.४२% श्रमिकांनी व्यक्त केले.

स्थलांतरापूर्वी बऱ्याच श्रमिकांना रोजगार मिळत नव्हता. ज्यांना रोजगार मिळत होता तो ही अल्प प्रमाणात मिळत होता. रोजगारात वाढ होते. तसेच उत्पन्नातही वाढ होते. त्यासाठी स्थलांतर आवश्यक आहे असे ९३.४२% श्रमिकांचे मत होते.

थोडक्यात असे म्हणता येते की, स्थलांतराच्या भूमिकेविषयी श्रमिकांच्या वेगवेगळ्या भूमिका आहेत. उदरनिर्वाह आणि

रोजगार मिळविण्यासाठी श्रमिकांना स्थलांतर करावे लागते. स्थलांतर हा कोणत्याही देशातील किंवा प्रदेशातील लोकसंख्येचा आकार आणि रचनेत महत्त्वाचा बदल घडवून आणणारा घटक आहे. विशेषत: विकसनशील देशात ग्रामीण भागातून नागरी किंवा शहरी भागाकडे होणारे स्थलांतर हा आर्थिक विकासाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग असतो. बीड जिल्ह्यातील स्थलांतरीत श्रमिकांचे अध्ययन हे प्रातिनिधीक स्वरुपाचे आहे. स्थलांतरामुळे श्रमिकांच्या रोजगारीच्या समस्येची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने स्थलांतरामुळे श्रमिकांच्या रोजगारीच्या समस्येची गुंतागुंत काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली असली तरी स्थलांतरीत श्रमिकांचे राहणीमान, आर्थिक शोषण, कर्जबाजारीपणा इत्यादी गंभीर स्वरुपाचे प्रश्न त्यातूनच निर्माण झालेले आहेत. त्यासाठी ग्रामीण औद्योगिकीकरण या बाबींवर भर देण्यात आला तर निश्चितच श्रमिकांचे मोठ्या प्रमाणावर होणारे स्थलांतर थांबविता येईल. वाढत्या नागरीकरणामुळे वाढते गुन्हेगारीकरण, बकाल वस्त्यांची वाढती संख्या, प्रदुषण, शिक्षण, आरोग्य, वाहतुक व्यवस्थेवर पडणारा ताण यासारख्या ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत त्यांची उकल करण्यासाठी ग्रामीण भागातून नागरी भागाकडे होणारे श्रमिकांचे स्थलांतर थांबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## संदर्भ:


१. कानीटकर तारा व कुलकर्णी सुमती: *लोकसंख्याशास्त्र*, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, श्रीविद्या प्रकाशन,पुणे.

२. जोशी के.जी.: *मायग्रेशन ॲण्ड मोबॅलिटी*, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर, १९८९

३. कौर गुरिन्दर: *मायग्रेशन जिऑग्राफी*, अनमोल पब्लिकेशन प्रा.लि., न्यू दिल्ली.

४. कांबळे एन.डी.: *मायग्रन्टस् इन इंडियन मेट्रोपोलिज*, अप्पल पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली.

५. संजय भा. तळतकर: *बीड जिल्ह्यातील श्रमिकांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास* (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पीएच्.डी. पदवीसाठी सादर केलेला अप्रकाशित प्रबंध, जानेवारी २००७.


-*-

# आदिवासी विकास : एक दुसरी बाजू

**मारोती तेगमपुरे,** जालना
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड.
(आजीव सभासद क्र.१२९५)
(भ्रमणध्वनी:९४२३९९३१३७)

१९४७ मध्ये भारतास स्वांतत्र्य प्राप्त झाले, स्वातंत्र्य प्राप्ती नंतर देशाच्या विकासासाठी वेगवेगळी व्यूहरचना केली जाऊ लागली, देशातील दलित, वंचित, शोषित घटकाकडे जाणीवपूर्वक लक्ष देण्याची तत्कालीन धोरणकर्त्यांने मनाशी खुणगाठ बांधली. देशातील वंचितांचा नियोजनबध्द विकास घडवून आणण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला गेला. शासन आणि खाजगी क्षेत्र एकाच वेळेस हातात हात घालून प्रगतीची पायवाट' चालू लागले. देशातील सर्व घटकाच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात येऊ लागले. त्या अनुषंगाने आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने १९५० मध्ये आदिवासींची वेगळी अशी ओळख व्हावी म्हणून त्यांचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत करण्यात आला.

तज्ज्ञांनी आदिवासी जमातीच्या वेगवेगळ्या व्याख्या केल्या आहेत, सर्वसाधारणपणे 'आदिवासी' म्हणजे 'आदिवासी' या शब्दातच त्याचा अर्थ दडला आहे. या भूमीवरील आदिपासूनचे निवासी म्हणजेच आदिवासी होय. भारतीय स्मृती ग्रंथातही आदिवासी जमातीचा उल्लेख आढळतो. त्यांचा रामायणात निषाद, किरात, शबर, रक्श असा उल्लेख आढळतो. कच्चे मांस खाणारे म्हणून किरातांचा उल्लेख आहे. महाभारतात पुलिंद आणि किरात हे हिमालयात राहणारे आदिवासी म्हणून उल्लेख आढळतो. एकलव्य, शबरी, निषादराज गुह हे आदिवासी होते. याही पुढे जाऊन आदिवासी म्हणजे कोण? तर इंपिरिअल गॅझेटमध्ये आदिवासींची समान बोलीभाषा बोलणाऱ्या एकाच भूभागात राहणाऱ्या सुरूवातीस अंतर्विवाही असण्याची शक्यता असणाऱ्या पण सर्वसामान्यपणे अंतर्विवाही नसलेल्या व समान नाव धारण करणाऱ्या कुंटुबाच्या समुच्चयाला आदिवासी समाज असा उल्लेख असल्याचे पहावयास मिळते.

अशा या आदिवासींचे देशातील वेगवेगळ्या राज्यातील एकूण लोकसंख्येत स्थान पाहिल्यास असे लक्षात येते की, मिझोराम (९५%), नागालँड (८८%) मेघालय (८६%), अरूणालय प्रदेश (६४%), मणिपुर (३४%), त्रिपुरा (३१%) तर महाराष्ट्रात (८.८५%) म्हणजेच ८५.७७ लाख

(२००१ च्या जनगणनेनुसार) इतकी आदिवासी लोकसंख्या वास्तव्यास राहत होती. २००१ च्या जनगणनेनुसार देशात आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ८.१९% इतके असून २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेची आकडेवारी विस्ताराने येण्यास अजूनही अवकाश आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात सर्वाधिक आदिवासी लोकसंख्या नंदूरबार जिल्ह्यात ६५.५३% इतकी तर या खालोखाल गडचिरोली जिल्ह्यात ३८.५५% इतकी आदिवासी लोकसंख्या होती. तर सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या वास्तव्यास असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात केवळ ०.५८% आदिवासी लोकसंख्या असल्याचे दिसते. नांदेड जिल्ह्यात एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी लोकांचे प्रमाण ८.८३% इतके आहे म्हणजेच राज्यातील आदिवासी लोकसंख्या व नांदेड जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण जवळपास सारखेच असल्याचे पहावयास मिळते. प्रस्तुत शोध निबंधाचा उद्देश हा नांदेड जिल्ह्यातील आदिवासींच्या लोकसंख्येची तालुका निहाय विभागणी, त्यांचे उत्पन्न, राहणीमान, साक्षरता या विषयीची मांडणी करून प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे काही निष्कर्ष नोंदवण्याचा प्रयत्न करण्याचा आहे.

## नांदेड जिल्हा एक दृष्टीक्षेप :

नांदेड जिल्ह्यास स्वतंत्र अशी ओळख असून मराठवाड्यातील एकूण आठ जिल्ह्यापैकी एक असलेल्या या जिल्ह्याची ओळख आपणास करून घेता येईल. महाराष्ट्राच्या दक्षिण पूर्व सीमेला दक्षिणोत्तर पसरला आहे. १८.५५ ते १९.५५ उत्तर अक्षांश व ७७.७ ते ७८.१५ पूर्व रेखांशामध्ये स्थित आहे. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेस हिंगोली व यवतमाळ जिल्हा, उत्तर पश्चिमेस व नैऋत्येस लातूर जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेला व दक्षिण पूर्व दिशेला आंध्र प्रदेशातील अदिलाबाद, निजामाबाद हे जिल्हे आहेत. जिल्ह्याच्या दक्षिणेस कर्नाटक राज्यातील बीदर जिल्ह्याच्या संतपूर तहसीलची सीमा आहे. नांदेड जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०५०२ चौ.कि.मी असून ते महाराष्ट्र राज्याच्या ३.४१% इतके भरते. या क्षेत्रापैकी २११.१ चौ.कि.मी. क्षेत्र (२.०१%) नागरी भागात असून उर्वरित क्षेत्र ग्रामीण भागात येते. प्रशासकिय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे तीन महसूली विभाग आहेत. त्यापैकी एक उप-विभाग नांदेड येथे आहे, यामध्ये नांदेड, अर्धापूर, मुदखेड, भोकर, उमरी, कंधार व लोहा तहसील क्षेत्रे येतात. दुसरा उप विभाग देगलूर या ठिकाणी असून यामध्ये देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, मुखेड तहसील येतात. तिसरा उप-विभाग किनवट येथे असून या विभागात किनवट, हिमायतनगर, हदगांव, माहूर तहसील क्षेत्राचा समावेश होतो. जिल्ह्यात एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ८.१९% वनक्षेत्र आहे. या वनक्षेत्राचा बराच मोठा भाग म्हणजे सुमारे ६५% इतका हिस्सा किनवट व माहुर तहसील मध्ये येतो. जिल्ह्यात प्रमुख अशा गोदावरी नदीचे मोठे पात्र उपलब्ध झाले आहे, यावरील विष्णूपूरी प्रकल्प हा आशियातील एक प्रमुख प्रकल्प आहे.

या ठिकाणी जिल्ह्यातील आदिवासीच्या संदर्भात प्रामुख्यांने मांडणी करण्याचे प्रयोजन असून जिल्हयात एकूण लोकसंख्येच्या ८.८२% असलेला आदिवासी समाज जिल्ह्यातील सोळाही तालुक्यात कमी अधिक प्रमाणात विभागला गेला आहे. सर्वात कमी आदिवासी लोकसंख्या अर्धापूर तालुक्यात १.३४% तर सर्वाधिक २३.०८% इतकी आदिवासी लोकसंख्या किनवट तालुक्यात वास्तव्यास असल्याचे दिसते. नांदेड (४.४७%), हादगाव (९.८५%), भोकर (८.७२%), बिलोली

(७.७०%), देगलूर (६.९७%), मुखेड (७.३४%), कंधार (२.९०%), मुदखेड (१.६८%), हिमायतनगर (५.४५%), माहुर (५.३१%), धर्माबाद (५.८२%), उमरी (३.५८%), लोहा (१.५०%), नायगाव (४.२५%) या सर्व तालुक्यात आदिवासी लोकसंख्या आढळून येते. जिल्ह्यात एकूण २ लाख ५३ हजार ५१६ इतकी आदिवासी लोकसंख्या (२००१) पहावयास मिळते.

**आदिवासींच्या उदरनिर्वाहाची साधने :**

जिल्ह्यातील जवळपास ८८% आदिवासी समुदाय दारिद्रय रेषेच्या खाली येतो. उदरनिर्वाहाच्या बाबतीत जवळपास शेती करणाऱ्या (५०%) व शेतीशी निगडित असलेल्या आदिवासींचे प्रमाण (७५%) मोठे आहे. म्हणजेच वनमजुरी (३.५४) व शेतमजुरी (२१.२९) सारखे प्रकार शेतीशीच संबंधीत आहेत. नोकरीच्या साधनाव्दारे उदरनिर्वाह करणारे ९.७३% तर व्यापाराच्या माध्यमाव्दारे २.५८% आदिवासी उदरनिर्वाह करतात.

**साक्षरता :**

जिल्ह्यातील आदिवासींच्या साक्षरतेचे प्रमाण केवळ ३६% इतके कमी आहे. त्या दृष्टीने जाणीवपुर्वक प्रयत्न करण्याची गरज असून आदिवासींच्या एकूणच प्रगतीच्या दृष्टीने शिक्षण ही एक अत्यावश्यक बाब आहे. कारण *'ज्ञान म्हणजे प्रकाश'* असे गौतम बुध्द म्हणाले होते तर *'विद्ये विना मती गेली, मती विना निती गेली निती विना गती गेली, गती विना वित्त गेले, वित्ता विना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले'* असे महात्मा ज्योतीराव फुले म्हणतात.

**विकास कार्यक्रमाचा फोलपणा :**

आदिवासींच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने देशात आणि महाराष्ट्रातही वेगवेगळ्या विकास कार्यक्रमांची आखणी करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने आर्थिक तरतूदही करण्यात येते परंतु त्याची योग्य रितीने अमलंबजावणी होताना दिसून येत नाही.

समर्थन या अर्थसंकल्पाचे अध्ययन करणाऱ्या संस्थेने केलेल्या अभ्यासावरून असे मत नोंदविले आहे की, ७ ते १० कि.मी. परिसरातील गावांमध्ये आदिवासी लोकसंख्या ५ हजार ते ७ हजार असल्यास आश्रमशाळा सुरू करता येते मात्र मुखेड व नांदेड या तालुक्यात आदिवासी लोकसंख्या अपेक्षेपेक्षा अधिक असूनही एकही आश्रमशाळा उघडली गेली नव्हती. असे भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी १९९३-९४ ते १९९७-९८ या अवधीमध्ये आश्रमशाळांच्या कार्यप्रणालीचा आढावा घेवून मत नोंदवले होते. मात्र यावर अद्याप लोकलेखा समितीत साधी चर्चा सुध्दा झालेली आहे.

प्रस्तुत लेखकाने जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी त्यांच्याशी वार्तालाप केला असता अतिशय धक्कादायक माहिती समोर आली आहे. आदिवासींना आदिवासी उप-योजनेची माहीती ही शासकिय यंत्रणेव्दारे प्राप्त होणाऱ्या आदिवासींचे प्रमाण केवळ ४.६१% इतके कमी असून उप-योजनेचा लाभ मिळण्यासाठी लागलेला वेळ आणि खर्च हा विषय तर डोळ्यात अंजन घालणारा आहे, प्रस्ताव मंजुर होण्यासाठी १० दिवसापासून ते एक वर्षाचा अवधी लागत असल्याचे अभ्यासात आढळून आले आहे. आदिवासी उप-योजनेचा लाभार्थींचा प्रस्ताव कमी वेळात मंजुर होण्याऐवजी वाजवीपेक्षा जास्त वेळ लागणे हे योजनेच्या अंमलबजावणीतील अपयश तर आहेच शिवाय यंत्रणा अकार्यक्षम असल्याचे लक्षण दर्शविणारे आहे. या काळात उपयोजनेची अंमलबजावणी

करणाऱ्या अधिकाऱ्यामध्ये अंमलबजावणीच्या संदर्भात कमालीची अनास्था पहावयास मिळाली. आदिवासीच्या एकूणच विकासाच्या दृष्टीने कोट्यवधी रूपयाची उधळण करूनही आदिवासी खेड्यात अजुनही आरोग्याच्या सोयीचा, पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या सोयीचा अभाव आहे, या खेड्यात आदिवासींना आजही नाल्याचे, विहीरीचे व शेत तळ्यातील पाणी पिण्यासाठी वापरावे लागते. आदिवासी उप-योजनेच्या अंतर्गत किनवट तालुक्यातील आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी खेड्यातील स्वच्छता व पाणी पुरवठ्यावर बऱ्यापैकी खर्च होऊनही स्वच्छता आणि पाणी पुरवठ्याची आदिवासी खेड्यातील ही दुर्दशा काय सांगते? एवढा खर्च करूनही आदिवासींना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळू नये यापेक्षा दुर्दैव कोणते.

आदिवासी उप योजनेव्दारे अनेक रोजगाराचे कार्यक्रम राबविण्यात आले, त्यासाठी इतर विकास कार्यक्रमांच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात खर्चही करण्यात आला (हा खर्च कुठे आणि कसा झाला?) परंतू आदिवासींना अजुनही रोजगाराच्या संधी उपलब्ध झालेल्या नाहीत. बेरोजगाराने गरिबीच्या गर्तेत अडकलेली तरूणांची बरीच संख्या आदिवासी खेड्यांत आजही आढळून येते.

आदिवासींना दिल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ हा कागदावरच राहिलेला असून प्रत्यक्ष आदिवासींच्या हाती निराशाच आली आहे. यास अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेचा हा भ्रष्टाचार आहे? असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. या सर्व बाबींचा शासन यंत्रणेने गांभीर्यपूर्वक विचार करून नांदेड जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यातील आदिवासी समूहाच्या विकासात्मक अन्यायावर आळा घालण्याचे थोडे कठीण पण अत्यावश्यक असलेले काम केले गेले पाहीजे. हे धैर्य शासन यंत्रणा आणि शासन दाखविल काय?

**संदर्भ :**


१) Govt. of Maharashtra, *Annual Tribal sub - plan*, 2005-2006, Tribal Development Department, Mumbai,

२) Govt. of India - 2006, Ministry of Intormation and Broad Casting, New Delhi.

३) वर्मा आर.सी, *भारतीय जमाती - काल, आज आणि उद्या*, माहिती आणि प्रशासन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली, २००३.

४) शिराळकर कुमार, *आदिवासींची एकच ललकार जमीन जंगलावर द्या अधिकार*, जनशक्ती प्रकाशन मुंबई, २००५.

५) डॉ.मारोती तेगमपुरे, *आदिवासी विकास आणि वास्तव*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २००९.

६) दत्ता देसाई, *महाराष्ट्राच्या विकासाची दिशा हवी नवी मळवाट*, परिवर्तन अकादमी प्रकाशन, सोलापूर २०११.

७) ब्रम्हदेव शर्मा, आदिवासी समाज : *टुटे वादों की अनटूटी श्रृंखला वैकल्पीक आर्थिक वार्षिकी*, भारत २००९ -२०१०, इंडियन पोलिटिकल इकॉनॉमीक असोसिएशन, नई दिल्ली - २०१०.

८) समर्थन, अर्थसंकल्प अध्ययन केंद्र, मुंबई.

९) Nanded District, *Annual Tribal Susplon*, Monthly Progress Report.


-*-

# आदिवासी विकासात केंद्रवर्ती अर्थसंकल्पाची भूमिका

एस. के. पगार, नाशिक
के.टी.एच.एम. महाविद्यालय

(आजीव सभासद क्र.६२२)
(भ्रमणध्वनी: ९४२३१७४२७६)

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प (संकल्पना) :

महाराष्ट्र राज्यात निरनिराळ्या क्षेत्रात राहणाऱ्या विविध आदिवासी जमातीच्या विकासाच्या प्रगतीमध्ये ठिकठिकाणी तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. आदिवासी विकास कार्यक्रमांच्या योजनांमध्ये स्थलकालानुरूप लवचिकता व अभिनवता आणणे अत्यंत गरजेचे आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन आदिवासी उपयोजना तयार करण्यात आली आहे. तथापि, प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक गरजा ह्या शासनाने मान्य केलेल्या नियमित योजनांपेक्षा बरेचदा भिन्न असतात. त्यासाठी आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजुरीचे अधिकार प्रदान करून सदर कार्यक्रम तातडीने कार्यान्वित करता यावेत या उद्देशाने केंद्रवर्ती अर्थसंकल्प ही योजना शासनातर्फे सन १९८१-८२ या वर्षापासून राबवली जात आहे. सदरील योजना प्रकल्प अधिकारी यांच्या परीसरातील आदिवासींच्या गरजा व उपलब्ध साधनसामुग्री लक्षात घेऊन तयार करतात. उदा. तेंडुपत्ता गोळा करणे, बांबूपासून कलाकुसरीच्या वस्तु तयार करणे, कांडपयंत्र देणे, पत्रावळी तयार करणे. ज्या योजनेचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्वाच्या कर्जविरहीत योजना तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून गरजू आदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवुन देणे हा योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेंतर्गत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना योजना तयार करण्याचे तसेच त्यांची अंमलबजावणी किंवा इतर विभागाच्या स्थानिकदृष्ट्या महत्वाच्या योजना विहीत कार्यपध्दती अवलंबुन त्या त्या विभागाकडुन राबवुन घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

## योजनेचे स्वरूप :

१. योजनेतंर्गत प्रत्येक आदिवासी व्यक्तीस / कुटुंबास / सामुहिक प्रकल्पात / कार्यक्रमांतर्गत आर्थिक मर्यादा रू. १५०००/- पर्यंत.

२. गट नमुद केले असुन (अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना (ब) प्रशिक्षणाच्या योजना (क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना (ड) आदिवासी कल्याणात्मक योजना

३. अ गटात अनुदानाची मर्यादा खालीलप्रमाणे (१) सर्वसाधारण आदिवासी ८५% व १५% वैयक्तिक सहभाग (२) आदिम जमाती लाभार्थी ९५% व ५ % वैयक्तिक सहभाग (३) जेथे अर्थसहाय्य रू. २००० असेल तेथे १००% अर्थसहाय्य.

४. शासन निर्णय दि. ३१ मे २००१ च्या मार्गदर्शक सुचनातील अटी शर्तीनुसार पात्र लाभार्थी व त्यांची मागणी केल्यानुसार योजना तयार करून अधिकारी यांनी अपर आयुक्ताकडे निर्देश समितीचे अध्यक्ष या नात्याने मंजुरी घेणे.

५. अर्थसंकल्पात तरतुद असलेल्या एखाद्या योजनेवर अत्यावश्यक आणि अपवादात्मक परिस्थितीत पूरक खर्च न्युक्लिअस बजेट मधुन करावयाचा असल्यास प्रस्ताव मंजुरिसाठी आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे सादर करणे.

६. शासनाने विहीत केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार जे कार्यक्रम न्युक्लिअस बजेट अंतर्गत देता येत नाहीत परंतु स्थानिक परिस्थितीनुसार खास. कार्यक्रम घेणे आवश्यक आहे असे निर्देश समितीस वाटल्यास त्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करणे.

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना अंमलबजावणीची कार्यपध्दती :

आदिवासींच्या विकासासाठी एखाद्या विभागास एखादी योजना आवश्यक वाटल्यास त्यासंबंधीचा योग्य तो प्रस्ताव तयार करून तो संचालन समितीकडे प्रकल्प अधिकारी यांनी सादर करावयाचा असतो. या समितीमध्ये खालील सभासद असतात:

१. अतिरीक्त आदिवासी विकास आयुक्त, नाशिक/नागपुर - अध्यक्ष

२. संबंधित योजनेच्या अंमलबजावणीचे प्रादेशिक किंवा जिल्हा परिषद विभागप्रमुख सभासद.

३. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प - सभासद सचिव.

४. आदिवासी कार्यकर्ता - अशासकीय सदस्य.

वरील समितीने योजना मंजूर केल्यानंतर संबंधित लाभधारकांना आवश्यक ती मदत दिली जाते.

### अ) लाभधारकांना अनुदान देण्याची पध्दत :

केंद्रवर्ती अर्थसंकल्पाअंतर्गत प्रामुख्याने वैयक्तिक व कुटुंबानुवर्ती योजना हाती घेऊन राबविल्या जातात. सर्व लाभार्थींच्या योजना प्रत्येक आदिवासीपर्यंत पोहोचविण्यात येतात. या योजनांवर १००%, ५०%, ८०% या प्रमाणात अनुदान दिले जाते. अनुदान हे रोख रकमेच्या स्वरूपात देण्यात येत नाही. उदा. बँकेतून कर्ज घेऊन शिवणयंत्र, गाई - म्हशी इत्यादींसाठी पंचायत समितीतर्फे व संबंधित अधिकाऱ्यांकडून कर्ज प्रकरणे तयार करून कर्ज मंजूर करून घेण्यात येतात. प्रकल्प कार्यालयामार्फत त्या योजना

राबवल्या जातात. त्यासाठी प्रत्यक्ष रक्कम दिली जात नाही. वस्तूंच्या रूपात लाभार्थींना लाभ देण्यात येतो.

**ब) लाभधारक निवडण्याची पध्दत :**

केंद्रवर्ती अर्थसंकल्पाअंतर्गत ज्यांना योजनांचा लाभ घ्यावयाचा आहे त्या आदिवासी लाभधारकांची निवड खालीलप्रमाणे केली जाते. प्रकल्प अधिकारी, प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, गटविकास अधिकारी, तहसिलदार यांना कळविण्यात येते. त्यानंतर त्यांच्याकडून लाभधारकांच्या याद्या, अर्ज, आवश्यक ते दाखले घेण्यात येतात. त्यानंतर त्यांच्या आर्थिकप्राप्तीच्या दृष्टीकोणातून कागदपत्रांची छाननी करून अंतिम निवड प्रकल्प कार्यालयामार्फत केली जाते. नियमानुसार लाभधारकांची निवड केल्यानंतर योजनांचा लाभ वस्तूरूपाने व प्रशिक्षणाच्या रूपात दिला जातो.

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचे गट :**

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ह्यांचेमार्फत आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या नियंत्रणाखाली राबवण्यात येणाऱ्या केंद्रवर्ती अर्थसंकल्पातील योजनांमध्ये लाभार्थींना कर्ज देणे अपेक्षित नाही. केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत घ्यावयाच्या योजनांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर मुभा असली तरी, या योजनेचा खरा उद्देश लक्षात घेवून या योजनांचे ४ गट पाडण्यात येतात.

(अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना
(ब) प्रशिक्षणाच्या योजना
(क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना
(ड) आदिवासी कल्याणात्मक योजना

**अ)उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना :**

या स्वरूपाच्या योजनांमध्ये सर्वसाधारण शेती उत्पन्न वाढवणे, लहान लहान सिंचन योजना, इनवेल बोअर, सिंचनासाठी कूपनलिका, भाताच्या शेतात बोड्या बांधणे, सिंचनासाठी पी. व्ही. सी. किंवा तत्सम पाईप पुरवणे, शासनामार्फत आदिवासींना पुरवलेले पंपसंच नादुरूस्त होऊन निकामी पडले असल्यास आणि संबंधीत आदिवासी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती पंप दुरूस्ती करण्यास खरोखरच सक्षम नसेल तर अशा पंपाची दुरूस्ती विहीत मर्यादेपलिकडे विद्युत खांब लावुन घेण्याचा खर्च करण्यास संबंधीत आदिवासी शेतकरी आर्थिकदृष्ट्या असमर्थ असेल तर त्याला सिंचनाची सोय उपलब्ध व्हावी म्हणुन या दृष्टीने आवश्यक ते आर्थिक सहाय्य करणे, दुग्धव्यवसाय संवर्धन, पशुविकास, फळबाग विकास, मत्स्यव्यवसाय विकास, कुटीर उद्योग व हस्तकला व्यवसाय, रेशमी तथा कोळसा उत्पादन उद्योग, मधुमक्षिका पालन इत्यादी विकासातील वैयक्तिक लाभाच्या किंवा कुटूंबाच्या लाभाच्या योजनांचा समावेश होतो. आदिवासी लाभार्थींना अशा प्रकारच्या योजनांचे पुरेसे ज्ञान आणि कौशल्य प्राप्त व्हावे यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाचा आणि प्रात्यक्षिकाचाही समावेश अशा योजनांमध्ये होईल. परंतु ज्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात आहे अशा योजना केंद्रवर्ती अर्थसंकल्पांतर्गत शक्यतो घेवू नयेत. तसेच उत्पन्न निर्मितीच्या योजनात लाभार्थींचा काही आर्थिक सहभाग असणे आवश्यक आहे. या गटाअंतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १) अनुदानावर संकरित गायी, शेळी गट, म्हशी पुरविणे. २) अनुदानावर पी.व्ही.सी. पाईप पुरविणे.
३) अनुदानावर लाऊड स्पीकर व मंडप पुरविणे.४) किराणा दुकानासाठी व पानटपरीसाठी अनुदान पुरविणे. ५) आदिवासींना फोटोग्राफी

व्यवसायाकरीता अनुदान पुरविणे. ६) दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना जैविक खते व किटकनाशके असे संयुक्त पॅकेज देणे. ७) आदिवासी तरूणांना स्वयंरोजगाराकरीता हॉटेल चालविणे, सुतारकाम, हस्तकला/सायकल दुरूस्ती गवंडीकाम अशा विविध व्यवसायांसाठी अनुदान पुरविणे. ८) रास्त-भाव दुकानदारांना भांडवल पुरवठा.

**ब) प्रशिक्षणाच्या योजना :**

ज्या योजनांमधुन आदिवासी व्यक्तींना रोजगार मिळवण्यासाठी किंवा नोकरी मिळवण्यासाठी संधी उपलब्ध होतील अशा प्रशिक्षणाच्या योजना प्रामुख्याने घेण्यात याव्यात अशा योजनांमध्ये विविध स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षण व उद्‌बोधन वर्ग आयोजित करणे, कॉम्प्युटर प्रशिक्षण, टंकलेखन/लघुलेखन, शिवणकामाचे प्रशिक्षण, सुतार, वायरमन, रेडिओ / टि. व्ही. मॅकेनीक, व वाहनचालक प्रशिक्षण, सशस्त्र दल, राज्य राखीव दल किंवा केंद्र / राज्य शासनाच्या निमलष्करी दलात भरतीपुर्व प्रशिक्षण व इतर नोकरी मिळवन्यासाठी उपयुक्त प्रशिक्षण इ. योजनांचा समावेश होतो. प्रशिक्षण योजनेला मंजुरी देण्यापुर्वी निर्देश समितीने अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी कोणत्या नोकरी / रोजगारांमध्ये किती जागा नजिकच्या भविष्यात अपेक्षित आहेत त्याचा अंदाज घेवून नंतर त्यानुसार मान्यता द्यावी. प्रशिक्षण देणाऱ्या व्यक्ति / संस्था आणि अभ्यासक्रम अधिकृत मान्यता प्राप्त असावा. या गटाअंतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १) वाहक प्रशिक्षण (मुले) २) हलके व अवजड वाहन चालक प्रशिक्षण ३) आदिवासी महिलांना पर्स, बॅग तयार करण्याचे प्रशिक्षण. ४) वेल्डींग वर्क अभ्यासण्याचे प्रशिक्षण ५) टायपिंग कम कॉम्प्युटर ऑपरेटर अभ्यासणाचे प्रशिक्षण ६) पंप मेकॅनिक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण ७) गांडुळखत तयार करण्याचे प्रशिक्षण इ. अनेक प्रशिक्षण वर्ग आदिवासी लाभार्थींसाठी भरवले जातात.

**क) मानवी साधनसंपत्तीच्या विकासाच्या योजना :**

मानवी साधनसंपत्तीच्या विकासामध्ये सर्वसाधारणपणे शिक्षण, प्रशिक्षण, योजना, क्रीडा, कला, साहित्य व संस्कृती ह्यांची जोपासना तसेच संवर्धन ह्याचा समावेश होतो. आदिवासींची गुणवत्ता आणि व्यक्तिमत्व विकासाच्या योजना, विविध योजना कार्यन्वित करून त्यांना सुविद्य, सुदृढ आणि समृध्द नागरीक बनविणे हा या सर्व उपक्रमांचा अंतिम उद्देश आहे. ह्या दृष्टीने विचार करता निवडक प्रमाणावर महत्वाच्या क्रिडास्पर्धा आयोजित करणे, आदिवासींच्या पारंपारिक कलाकृतीचे प्रदर्शन आयोजित करणे तसेच नृत्यकलेचे जतन व संवर्धन करणे उद्‌बोधक आणि ज्ञानवर्धक शिबिरे व मेळावे भरविणे, आश्रमशाळेतील शिक्षकांसाठी कार्यशाळा / उद्‌बोधक वर्ग आयोजित करणे, सुसंस्कार मंडळांना प्रोत्साहित करणे, युवा आणि महिला मंडळाच्या रचनात्मक उपक्रमांना सहाय्य देणे, सामुहिक विवाह आयोजित करून त्यातील जोडप्यांना अभिनव कल्पक संसारोपयोगी वस्तूंचे सहाय्य करणे अशा प्रकारच्या योजना, स्थानिक परिस्थिती लक्षात घेवून कार्यान्वित करता येतील.

या गटाअंतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १) आदिवासी मुला-मुलींना सायकल वाटप करणे. २) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना चष्मे देण्यासाठी अनुदान ३) कृषी प्रदर्शन आयोजित करणे. ४) कुटूंब कल्याण कार्यक्रमांतर्गत ब्लँकेट

वाटप करणे. ५) अंधश्रध्दा निमुर्लन कार्यक्रमासाठी अनुदान.

**ड) आदिवासी कल्याणात्मक योजना :**

आदिवासींच्या त्या त्या भागातील गरजांवरील समस्यांवर आधारीत अशा वैयक्तिक आणि सामुहिक कल्याणाच्या दृष्टीने अत्यावश्यक ठरणाऱ्या काही योजना या गटांतर्गत राबविण्यात येतात. अशा योजनांमध्ये घराचे विद्युतीकरण, बाल व महिला कल्याणासाठी अभिनव उपक्रम, आदिवासींवरील आपात्कालीन किंवा अत्याचारप्रकरणी, अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीने सहाय्य देणे इत्यादींचा समावेश होतो.

या योजनांचा फायदा घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी) यांच्याकडे अर्जांचे नमुने उपलब्ध असतात. प्रकल्प अधिकारी स्वत: प्रयत्न करून गरजु आदिवासींना महामंडळाकडून किंवा राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.

या गटाअंतर्गत पुढील योजनांचा समावेश होतो. १) आपदग्रस्त आदिवासींना अर्थसाहाय्य २) घर जळाल्यामुळे अर्थसहाय्य ३) मेळावे आयोजित करणे. ४) आदिवासी नृत्य पथकातील कलाकारांना नृत्याचा पोशाखसाहित्य खरेदीसाठी अर्थसहाय्य. ५) आश्रमशाळेतील अपंग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव पुरविणे.

## केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत झालेला गटनिहाय खर्च (२००५ ते २००९)

आदिवासी विकास विभागामार्फत वेगवेगळ्या योजना राबवल्या जातात त्यापैकी एक योजना म्हणजे केंद्रवर्ती अर्थसंकल्प. या योजनांसाठी शासनामार्फत दरवर्षी खर्चाची तरतुद केली जाते. त्यात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेचा महत्वपूर्ण वाटा असतो. तक्ता क्र. १ ते ४ मध्ये २००५-२००६ ते २००८-२००९ पर्यंतचा केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेसाठी करण्यात आलेला तरतूद खर्च, प्रत्यक्ष खर्च तसेच लाभार्थींची संख्या दाखविण्यात आली आहे ती पुढीलप्रमाणे.

**तक्ता क्र.१**

**केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत राबवण्यात आलेल्या योजनांवरील तरतुद खर्च व लाभार्थी दर्शक तपशील सन २००५-०६**

(रूपये लाखात)

| अ. क्र. | विभाग | तरतूद | गटनिहाय खर्च अ | ब | क | ड | योजना संख्या | लाभार्थी संख्या | एकूण खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ६१.३४ | ३५.४९ | १६.११ | ७.७२ | १.०० | २३ | ३३५१ | ६०.३२ | १००% |
| २ | कळवण | ५२.०७ | २७.९० | ९.०४ | १४.०१ | १.०० | १६ | २१३७ | ५१.९५ | ९९.७८% |
| ३ | तळोदा | ७१.८७ | २७.४२ | ९.४० | २४.४४ | १०.५७ | १८ | ९६९७ | ७१.७२ | ९९.९३% |
| ४ | नंदूरबार | ८४.०३ | २७.५३ | २२.६७ | ३२.३२ | १.५० | २७ | ५६६४ | ८४.०२ | १००% |
| ५ | राजूर | २६ | ९.७९ | ६.६१ | ५.६९ | ३.८९ | २५ | २००२ | २५.९८ | ९९.९२% |
| ६ | यावल | ३८.३१ | २६.४० | ८.३७ | २.८६ | ०.८० | २० | ९८४ | ३८.३३ | १००% |
| एकुण नाशिक विभाग | | ३३३.६१ | १५४.५३ | ७२.२ | ८७.०४ | १८.७६ | १२९ | २३८३५ | ३३२.४२ | ९९.६४% |

तक्ता क्र.२

केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत राबवण्यात आलेल्या योजनांवरील तरतुद खर्च व लाभार्थी दर्शक तपशील सन २००६-०७

(रूपये लाखात)

| अ. क्र. | विभाग | तरतूद | गटनिहाय खर्च | | | | योजना संख्या | लाभार्थी संख्या | एकुण खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| १ | नाशिक | १५१.६७ | ६५.३८ | ५०.०२ | ४१.२२ | २.८८ | ६४ | १४५४७ | १५१.५० | ९९.८९% |
| २ | कळवण | १३७.९५ | ५१.०३ | ४९.१२ | ११.७० | - | ३५ | ७६२० | १३७.९५ | १००% |
| ३ | तळोदा | २७१.३६ | ६२.३० | ८४.६९ | १२२.४८ | १.२९ | ४२ | १४४८६ | २७०.५६ | ९९.७०% |
| ४ | नंदूरबार | ३६८.०४ | १५०.२ | ५०.९२ | १६२.९३ | ३.८ | ४८ | १२६७० | ३६७.८५ | ९९.९४% |
| ५ | राजूर | १३०.०८ | २५.५४ | १२.५५ | ९१.१७ | १.८४ | ३६ | १७७४६ | १३१.१० | १००% |
| ६ | यावल | १०१.३३ | ४०.४५ | ३०.८३ | २३.१३ | ६.८४ | ३४ | ५२२८ | १०१.३५ | १००% |
| एकुण नाशिक विभाग | | ११६८.४३ | ४०२.९० | २७८.२३ | ४७०.६३ | १६.६५ | २५९ | ७२२९७ | ११६८.४३ | १००% |

तक्ता क्र.३

केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत राबवण्यात आलेल्या योजनांवरील तरतुद खर्च व लाभार्थी दर्शक तपशील सन २००७-०८

(रूपये लाखात)

| अ. क्र. | विभाग | तरतूद | गटनिहाय खर्च | | | | योजना संख्या | लाभार्थी संख्या | एकुण खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| १ | नाशिक | २५०.०० | ८५.४० | ७७.७६ | ८६.५४ | १.७२ | ५८ | २४०११ | २५१.४२ | १००% |
| २ | कळवण | १५०.०० | ४२.५६ | ६९.८१ | ३५.७७ | १.६५ | ३३ | ९३९५ | १४९.८७ | ९९.९१% |
| ३ | तळोदा | २५०.०० | ६२.३७ | ८०.९८ | ८९.६४ | ७.३४ | ४१ | ११४०६ | २४०.३३ | ९६.१३% |
| ४ | नंदूरबार | २११.४४ | ६४.७२ | ६०.६६ | ९४.६१ | ०.०० | ३४ | ७९३३ | २१९.९९ | १०४.०४% |
| ५ | राजूर | १२०.०० | ४३.७७ | ४४.२९ | २५.१९ | ६.७५ | ३८ | १५८६९ | १२०.०० | १००% |
| ६ | यावल | १२०.०० | ४७.१० | ५८.१६ | १३.७७ | ०.१५ | २३ | ५२४९ | ११९.९८ | ९९.९८% |
| एकुण नाशिक विभाग | | ११११.५४ | ३६६.२३ | ४२०.८७ | ३११.५७ | १७.७६ | २४७ | ८२८७२ | १११६.४३ | १००% |

तक्ता क्र.४.७

केंद्रवर्ती अर्थसंकल्प अंतर्गत राबवण्यात आलेल्या योजनांवरील तरतुद खर्च व लाभार्थी दर्शक तपशील सन २००८-०९

(रूपये लाखात)

| अ. क्र. | विभाग | तरतूद | गटनिहाय खर्च | | | | योजना संख्या | लाभार्थी संख्या | एकुण खर्च | खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | ब | क | ड | | | | |
| १ | नाशिक | २५०.५८ | ११३.३० | १०२.९९ | ३२.३४ | १.९६ | ४८ | १६४५२ | २५०.५९ | १००% |
| २ | कळवण | १६७.१८ | ५५.५५ | ३०.३५ | ६०.९४ | २०.३३ | ३० | १४९५९ | १६७.१७ | ९९.९९% |
| ३ | तळोदा | १८७.५५ | ३६.५४ | ७५.८१ | ७५.१९ | ०.०० | ३२ | ५८५१८ | १८७.५४ | ९९.९९% |
| ४ | नंदूरबार | ११३.०९ | ३७.७४ | ४३.२७ | ३२.०७ | ०.०० | २० | १७३९ | ११३.०८ | ९९.९९% |
| ५ | राजूर | १०६.०७ | ११.७७ | १८.७९ | ४९.१२ | १८.०० | १७ | १०६८०९ | १०५.६८ | ९९.६३% |
| ६ | यावल | १५२.४३ | ६१.१४ | ७०.९६ | १९.९६ | ०.०० | २७ | ६८१८ | १५२.०६ | ९९.७६% |
| एकुण नाशिक विभाग | | ११३२.०४ | ३७३.४७ | ३११.२८ | ३१७.३१ | ४१.११ | २०३ | २०७६२६ | ११३१.२५ | ९९.९३% |

वरील आकडेवाडीवरून केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेसाठी तरतूद रक्कम दरवर्षी वाढत आहे. सन २००५-२००६ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत विविध योजनासाठी केली जाणारी तरतूद रक्कम ३३३.६१ लाख होती. ती २००८-२००९ या वर्षापर्यंत ११३२.०४ लाख रूपये इतकी झाली यावरून आदिवासी समाजाच्या विकासासाठी सरकारने विविध योजनांसाठी तरतूद रक्कम वाढवलेली आहे. केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनासाठीचा प्रत्यक्ष खर्च दरवर्षी वाढत आहे. २००५-२००६ मध्ये केला जाणारा एकूण प्रत्यक्ष खर्च ३३२.४२ लाख इतका होता. हा खर्च २००८-२००९ पर्यंत ११३१.२५ लाख इतका वाढला आहे. त्याचप्रमाणे या योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थींची संख्या प्रतिवर्षी वाढत आहे. २००५-२००६ मध्ये २३८३५ एवढी होती तर २००८-२००९ मध्ये २,०७,६२६ इतकी वाढलेली दिसते. सारांश रूपाने महाराष्ट्र राज्य शासनाने लाभार्थींची संख्या विचारात घेऊन एकूण तरतूद रक्कम व एकूण प्रत्यक्ष खर्चात वाढ करून, जास्तीत जास्त आदिवासी समाजापर्यंत त्यांच्या गरजेनुसार केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय योजना तयार करून आदिवासी समाजाला लाभ देण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ :**


१. डॉ. गोविंद गारे, १९९८, *आदिवासी विकास योजना*, आदिवासी विकास प्रतिष्ठान - पुणे
२. डॉ. गुरूनाथ द. नाडगोंडे, *१९७१ भारतीय आदिवासी*, कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजय नगर, पुणे-३०
३. *अनुसूचीत जमातीच्या विकासाच्या योजना* माहिती पुस्तिका-आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक - (१९९८)
४. *नागरिकांची सनद*- आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - (२००६)
५. *आदिवासी विकास परिचय पुस्तिका* (सन २००३-२००४)
६. *आदिवासी विकास विभाग कार्यक्रम अंदाज पत्रिका* (सन २००७-२००८)
७. सन २००३ - २००४ ते २००८ - २००९ पर्यंतचा केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांवरील तरतूद खर्च व लाभार्थी दशक तपशिल आदिवासी विकास विभाग, नाशिक.
८. आदिवासी विकास भवनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in.

# पेठ तालुक्यातील आदिवासी विकास योजनांचा अभ्यास

डी.आर.बच्छाव, नाशिक
उपप्राचार्य व अर्थशास्त्र विभागप्रमुख, के.टी.एच.एम.महाविद्यालय.
(आजीव सभासद क्र.६२३)
(भ्रमणध्वनी क्र.९८८१८७८४८९) .

**प्रस्तावना :**

आफ्रिका खंडाच्या खालोखाल भारतात आदिवासींची संख्या जास्त आहे. २००१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ८.१९% आहे. या आदिवासींपैकी निम्मे आदिवासी मध्यप्रदेशात (६६ लक्ष), ओरीसा (४२ लक्ष) बिहार (४३ लक्ष) ह्या तीन राज्यात आहेत. त्याशिवाय गुजरात (२७ लक्ष) राजस्थान (२३ लक्ष) आसाम (२० लक्ष) व महाराष्ट्र (२४ लक्ष), प.बंगाल (२० लक्ष) व आंध्रप्रदेश (१३ लक्ष). नागालॅण्ड, मेघालय व अरूणाचल प्रदेश ही आदिवासी राज्ये आहेत. म्हणजेच आदिवासी जमात ही भारताच्या विविध भागात आढळते. विविध देशांमध्ये ती वेगवेगळ्या नावाने समजली जाते. उदा. अमेरिकेत त्यांना रेड इंडियन्स म्हणतात. ऑस्ट्रेलियात 'अॅबोरिजीन्स', युरोपीय देशामध्ये 'जिप्सी' तर आफ्रिकी आणि आशियाई देशांमध्ये त्यांना आदिवासी या नावाने संबोधिले जाते. ह्या सर्व आदिवासींचा समावेश 'अनुसूचित जाती' मध्ये होतो. त्याप्रकारची नोंद भारतीय संविधानाच्या कलम ३४२ अन्वये करण्यात आली आहे.

**आदिवासी कोणाला म्हणायचे?**

आदिवासी म्हणजे अतिप्राचिन समाज किंवा एका समान भाषेचा वापर करणाऱ्या व एका विशिष्ट भू-प्रदेशात वास्तव करणाऱ्या व्यक्तींचा समूह म्हणजे आदिवासी अशी सर्वसाधारण व्याख्या केली जाते.

**आदिवासींची वैशिष्ट्ये:**

१) आदिवासी जमात एका विशिष्ट भूप्रदेशात राहते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या प्रदेशाच्या मानाने लहान असतो.

२) प्रत्येक आदिवासीची स्वतंत्र पंचायत असते. आदिवासी

समाजाचे नियंत्रण पूर्णपणे पंचायत किंवा मुखिया करतो.

३) आदिवासी समाजाची बहुधा स्वतंत्र भाषा व बोली असते.

४) आदिवासींचा धर्म क्षत्रिय म्हणजे त्यांच्या निवासस्थानांमध्ये मर्यादा असतात.

५) आदिवासी अर्थव्यवस्थेत गटवार श्रमविभाजनाचा वा धंदानिहाय भिन्न सामाजिक गटांचा अभाव असतो.

६) आदिवासी समाजात परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतो.

७) आदिवासी समाजात निसर्गपूजेस व जादू यासारख्या क्रियाकल्पाला महत्त्व असते.

८) आदिवासी समाज हा बराचसा स्वयंकेंद्रीत असतो.

**अभ्यासाचे उद्देश** (Objectives of Study)

१) आदिवासी विकास महामंडळामार्फत सध्या राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमापूर्वी कोणते कार्यक्रम राबविले जात होते त्याचा अभ्यास करणे.

२) आदिवासींच्या विकासासाठी कोण कोणत्या सरकारी सवलती दिल्या जातात त्याचे अध्ययन करणे.

३) आदिवासींच्या विकासाकरीता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डी.आर.डी.ए.) कोणत्या योजना राबवित आहे त्याचा अभ्यास करणे.

४) दारिद्र्यरेषेखालील आदिवासी साठी कोणत्या योजना अंतर्गत अर्थसहाय्य मिळू शकते की ज्यामुळे त्यांचे जीवनमान उंचावू शकेल याचा शोध घेणे.

५) आदिवासींच्या विकास कार्यक्रम अंतर्गत विविध योजनांचा लाभार्थ्यांच्या जीवनावर, राहणीमानावर, रोजगारावर आणि उत्पन्नावर कोणता परिणाम झाला तो तपासून पाहाणे.

**गृहितके** (Hypothesis)

आदिवासींचे दारिद्र्य निर्मुलन त्याच्या विकास कार्यक्रमांतर्गत ज्या विविध योजना सरकार राबविते त्यासाठी जी गृहितके आहेत ती खालीलप्रमाणे.

१) अनेक जिल्ह्यातील अनेक आदिवासी तालुक्यांसारखेच पेठ तालुक्यात आदिवासी विकासाकरीता योजना राबविल्या जातात.

२) महाराष्ट्र शासनाने भारत सरकारच्या सहयोगाने आदिवासीच्या प्रगतीसाठी विविध योजना आखलेल्या आहेत.

३) आदिवासींच्या गावात आदिवासी विकास महामंडळामार्फत व ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विविध कार्यक्रम राबविले जातात.

४) दारिद्र्यरेषेखालील सर्व आदिवासी शेतकऱ्यांची नावे दारिद्र्यरेषेच्या यादीत आहेत.

५) आदिवासींच्या विकासासाठी बँकांची योजना राबविण्याच्या संदर्भातील भूमिका फारशी उत्साहवर्धक नाही.

**संशोधन पद्धती**

(Research Methodology)

संशोधनासाठी यादृच्छिक नमुना निवड (Random Sampling) पद्धतीचा वापर करून पेठ

तालुक्यातील ६० आदिवासी लाभार्थी निवडून त्यामध्ये त्यांच्या उत्पन्न गटानुसार तसेच जमिनीच्या धारणेनुसार वर्गीकरण करून प्रत्येक उत्पन्न गटातील लाभार्थींकडून प्रश्नावली, मुलाखती, अनुसूची चर्चा आणि निरीक्षण करून निष्कर्ष काढलेले आहेत.

**माहिती संकलन** (Data Collection)

प्राथमिक तथ्य (Primary Data) आणि दुय्यम स्वरूपाचे तथ्य (Secondary Data) च्या माध्यमातून प्राथमिक तथ्यामध्ये मुख्यत: लाभार्थी बँक अधिकारी व्यवस्थापन कृषी विस्तार अधिकारी तसेच बचत गटाचे पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून मुलाखतीद्वारे माहिती संकलित केली आहे तसेच द्वितीय स्वरूपाच्या माहितीमध्ये ग्रामीण विकास मार्गदर्शीका जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे (DRDA) वार्षिक अहवाल, मासिके, वर्तमानपत्रे, स्वर्णजयंती ग्राम विकास योजना इत्यादींच्या माध्यमातून दुय्यम स्वरूपाची सांख्यिकीय माहिती संकलित केली आहे.

**अभ्यासाची मर्यादा**(Limitation of Study)

पेठ (नासिक) तालुक्यातील आदिवासींसाठीच्या योजनांचा अभ्यास करतांना विशिष्ट कालखंडात राबविलेल्या योजनांचा अभ्यास केलेला आहे मात्र जर कालखंड बदलला किंवा नमुन्यात बदल झाला तर निष्कर्षामध्ये देखील बदल होण्याची शक्यता लक्षात घेऊन संशोधनावर किरकोळ मर्यादा आहेत. कालखंडाव्यतिरिक्त वेळेची मर्यादा, योग्य लाभार्थी निवडीची मर्यादा, योजना लाभार्थींपर्यन्त पोहोचण्याची मर्यादा आणि योग्य ग्रामसभेच्या कार्याची मर्यादा विचारात घेण्यात आली आहे.

**आदिवासींच्या विकासासाठी काही निवडक योजना**

१) रोजगार हमी योजना
२) जवाहर - ग्रामसमृद्धी योजना,
३) स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना
४) जनकृती आणि ग्रामीण तंत्रशास्त्राच्या प्रगतीसाठीची योजना
५) राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल मिशन कार्यक्रम
६) आदिवासींच्या जमीन सुधारणा कार्यक्रम
७) समन्वित पडीत जमीन विकास कार्यक्रम
८) वाळवंटी क्षेत्र विकास कार्यक्रम
९) अवर्षण प्रवणक्षेत्र विकास कार्यक्रम
१०) केंद्र पुरस्कृत ग्रामीण सांडपाणी निस्सारण कार्यक्रम.
११) राष्ट्रीय संभाव्य क्षेत्र विकास कार्यक्रम
१२) आदिवासी ग्रामीण गृहबांधणीसाठी कर्जस्वरूपातील आर्थिक सहाय्य कार्यक्रम यावरील विविध योजनां अंतर्गत आदिवासींचा जीवनस्तर उंचावण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. त्यासाठी आदिवासी लाभार्थींचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण करून लाभार्थी संख्या काढण्यात आली आहे.

तक्ता क्र. १

| उत्पन्नाचा गट क्र. | वार्षिक उत्पन्नानुसार आदिवासी लाभार्थींचे वर्गीकरण | लाभार्थींची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ० ते ८००० रूपये | २३ | ३८.३३ |
| २ | ८००१ ते १२००० | १८ | ३०.०० |
| ३ | १२००१ ते १६००० | ०५ | ८.३३ |
| ४ | १६००१ ते २०००० | ०९ | १५.०० |
| ५ | २०००० पेक्षा अधिक | ०५ | ८.३४ |
| | एकूण | ६० | १००.०० |

*संदर्भ : सर्वेक्षणाद्वारे केलेले तथ्य संकलन*

० ते ८००० पर्यंत उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या २३(३८.३३) आहे. ८००१ ते १२००० उत्पन्न गटातील लाभार्थींची संख्या १८ (३०.००), १२००१ ते १६००० उत्पन्न गटातील संख्या ५ (८.३३) असून १६००१ ते २०००० उत्पन्न असणाऱ्या आदिवासी लाभार्थ्यांची संख्या ९ (१५.००) असून २०००० पेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या ५(८.३४) आहे.

## आदिवासीच्या विकास कार्यक्रमविषयक प्रभाव/परिणाम -

आदिवासीकरीता आदिवासी महा मंडळामार्फत व एकात्मिक जिल्हा ग्रामीण विकास मार्फत कार्यक्रम किंवा योजना राबविल्या जातात त्याचा आदिवासीवर किती प्रभाव पडला ते दर्शविणारा तक्ता पुढील प्रमाणे

तक्ता क्र. २

| उत्पन्नाचा गट क्र. | एकात्मिक ग्रामिण विकास यंत्रणेमार्फत राबविले जाणारे कार्यक्रम | आदिवासी विकास यंत्रणे मार्फत राबविले जाणारे कार्यक्रम | एकूण |
|---|---|---|---|
| १ | ५ (८.३३) | १० (१६.६६) | १५ |
| २. | ३ (५.००) | ०९ (१५.००) | १२ |
| ३ | ४ (६.६६) | १४ (२३.३३) | १८ |
| ४ | २ (३.३३) | ०८ (१३.३३) | १० |
| ५ | १ (१.६६) | ०४ (६.६६) | ५ |
| एकूण | १५ (२५.००) | ४५ (७५.००) | ६० (१००%) |

*संदर्भ : सर्वेक्षणाद्वारे केलेले तथ्य संकलन*

आदिवासींच्या विकासासाठी जे विविध कार्यक्रम सरकारतर्फे राबविले जातात. त्याचा त्यांच्या जीवनावर तसेच व्यवसायावर किती प्रभाव झाला हे पाहत असतांना विविध उत्पन्न गटावर एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमा अंतर्गत १५ लाभार्थी म्हणजे २५% प्रभाव झाला तर आदिवासी विकास यंत्रणेमार्फत राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमामुळे ४५ लाभार्थी म्हणजेच ७५% लोकांवर प्रभाव झाला आहे. असे वरील कोष्टकावरून दिसून येते.

### तक्ता क्र. ३
### आदिवासी विकासासाठी राबविले जाणारे कार्यक्रम

| उत्पन्नाचा गट क्र. | वार्षिक उत्पन्नानुसार | कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जातात | कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | ०८ ते ८००० | ६ | ५ | ११ |
| २ | ८००१ ते १२००० | ८ | ३ | ११ |
| ३ | १२००१ ते १६००० | १० | ५ | १५ |
| ४ | १६००१ ते २०००० | १२ | ३ | १५ |
| ५ | २०००० च्या पुढे | ०८ | ० | ०८ |
| | एकूण | ४४ (७३.३३%) | १६ (२६.६७%) | ६० (१००%) |

*संदर्भ : सर्वेक्षणाद्वारे केलेले तथ्य संकलन*

भारत आणि महाराष्ट्र सरकारतर्फे आदिवासीसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमामुळे आदिवासीच्या जीवनस्तरावर काय परिणाम झाला. म्हणजेच कार्यक्रम हे प्रभावीपणे राबविले गेले की नाही याचा अभ्यास करता असे दिसून आले की एकूण ६० पैकी ४४ म्हणजेच ७३.३३% लाभार्थ्यांनी असे सांगितले की आदिवासीसाठी राबविले जाणारे कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जातात. तर फक्त १६ म्हणजेच २६.६७% लाभार्थींनी कार्यक्रम राबविण्याविषयी आपली नाराजी व्यक्त केली म्हणजे सरकारी कार्यक्रम हे प्रभावीपणे राबविले जात नाही असे त्यांनी सांगितले.

### तक्ता क्र. ४
### उत्पन्न गटानुसार आदिवासींनी घेतलेल्या कर्जाची परतफेड

| उत्पन्नाचा गट क्र. | वार्षिक उत्पन्नानुसार | वेळेवर मुदतीत | वेळेनंतर/ मुदतीनंतर | कर्जफेड केलीच नाही | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०८ ते ८००० | १ | १ | ०५ | ७ |
| २ | ८००१ ते १२००० | १ | ५ | ०४ | १० |
| ३ | १२००१ ते १६००० | ५ | ६ | ०४ | १५ |
| ४ | १६००१ ते २०००० | ८ | ५ | ०५ | १८ |
| ५ | २०००० च्या पुढे | १ | - | ०९ | १० |
| | एकूण | १६ (२६.६७%) | १७ (२८.३३%) | २७ (४५.००%) | ६० (१००%) |

उत्पन्न गटानुसार आदिवासी लाभार्थींनी घेतलेल्या कर्जफेडीचा आढावा घेतला असता असे दिसते की, विविध उत्पन्न गटातील १६ (२६.६७%) लाभार्थींनी आपल्या व्यवसाया साठी घेतलेल्या कर्जाची वेळेवर परतफेड केली आहे. तर एकूणपैकी १७ (२८.३३%) लाभार्थींनी उद्योग व्यवसायासाठी घेतलेले कर्ज मुदतीनंतर परत केले आहे. ती एकूण ६० पैकी २७ म्हणजेच (४५.००%) लाभार्थींनी विविध योजना अंतर्गत घेतलेले कर्जफेड केलीच नाही असे दिसले म्हणजेच सरकारी कर्ज वेळेवर परतफेड केली नाही तर सरकार पूर्ण कर्ज माफ करते किंवा कर्जाचे व्याज तरी माफ करते. अशी लाभार्थींची भूमिका पहावयास मिळते.

### तक्ता क्र. ५

### उत्पन्न गट आणि बँकेकडून आदिवासींना मिळालेले अनुदान

| उत्पन्नाचा गट क्र. | वार्षिक उत्पन्नानुसार | अनुदान कमी आह | अनुदान पुरेसे आहे | अनुदान जास्त आहे | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०८ ते ८००० | २० | २ | -- | २२ |
| २ | ८००१ ते १२००० | १० | १ | -- | ११ |
| ३ | १२००१ ते १६००० | ११ | २ | -- | १३ |
| ४ | १६००१ ते २०००० | ६ | १ | -- | ७ |
| ५ | २०००० च्या पुढे | ५ | २ | -- | ७ |
| | एकूण | ५२ (८६.६७%) | ८ (१३.३३%) | -- (०.००%) | ६० (१००%) |

*संदर्भ : सर्वेक्षणाद्वारे केलेले तथ्य संकलन*

आदिवासी लाभार्थींना विविध बँकांकडून कर्ज आणि अनुदान उपलब्ध झालेले आहे. त्याचा लाभ देखील आदिवासी कुटूंबांनी घेतला आहे. विविध उत्पन्न गटातील ५२ लाभार्थींनी (८६.६७%) अनुदान कमी आहे असे सांगितले. तर त्यात मुख्यतः रूपये ० ते ८००० उत्पन्न गटातील सर्वात अधिक २० लाभार्थींनी अनुदान कमी असल्याचे नमूद केले आहे. तर एकूण उत्पन्न गटातील फक्त ८ (१३.३३%) लाभार्थींनी सरकारी अनुदान पुरेसे आहे असे सांगितले. तर अनुदानाचे प्रमाण अधिक आहे असे सांगणारे लाभार्थी नाही असे आकडेवारीवरून दिसून येते.

तक्ता क्र. ६

**योजनाअंतर्गत कर्ज मिळालेल्या आदिवासींसाठी विविध साहाय्याच्या योजनांची संख्या दर्शविणारा तक्ता**

| उत्पन्न गट | वार्षिक उत्पन्नानुसार | स्वाभीमान योजना व खावटी कर्ज | तेल पंप/ विज पंप | पी.व्ही.सी. पाईप पाणी | धान्य कोष योजना | न्युक्लियस बजेट योजना | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०८ ते ८००० | २ | ४ | १ | २ | ४ | १३ |
| २ | ८००१ ते १२००० | १ | ४ | २ | १ | २ | १० |
| ३ | १२००१ ते १६००० | २ | ३ | १ | ३ | ३ | ११ |
| ४ | १६००१ ते २०००० | १ | २ | ४ | ४ | २ | १३ |
| ५ | २०००० च्या पुढे | २ | २ | ४ | २ | २ | १२ |
| | एकूण | ८ (१३.३३%) | १५ (२५.००%) | १२ (२०.००%) | १२ (२०.००%) | १३ (२१.६७%) | ६० (१००%) |

*संदर्भ : सर्वेक्षणाद्वारे केलेले तथ्य संकलन*

विविध योजनांच्या अंतर्गत आदिवासी लाभार्थींना विविध योजनांअंतर्गत जे उपक्रम राबविले आहेत त्यात १ ते ५ उत्पन्न गटातील 'स्वाभीमान योजना' व खावटी कर्ज अंतर्गत लाभ घेणारे एकूण लाभार्थी ८ (१३.३३%) असून, तेल पंपाचा/विज पंपाचा लाभ घेणारे लाभार्थी १५ (२५.००%). असून पी. व्ही. सी. पाईप लाईन व पाणी पुरवठा योजनेअंतर्गत लाभ घेणारे लाभार्थींची संख्या १२ (२०.००%) असून धान्यकोष योजना अंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या देखील १२ (२०.००%) असुन न्युक्लियस बजेट योजने अंतर्गत लाभ घेतलेल्या लाभार्थींची संख्या १३ (२१.६७%) आहे.

**निष्कर्ष व शिफारशी :**

संशोधकाने संशोधनासाठी घेतलेला विषय आणि त्या अनुषंगाने सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करून गृहितकृत्याच्या आधारे पुढील निष्कर्ष काढलेले आहेत.

**निष्कर्ष :**

१) आदिवासीसाठी सरकारमार्फत विविध कार्यक्रम राबविले जातात असे संशोधकाने गृहित धरलेले आहे त्यानुसार असे दिसते की, पेठ तालुक्यात कार्यक्रम राबविले जातात. परंतु ते कार्यक्रम आदिवासींपर्यंत १००% पोहोचलेले नाहीत. त्यामुळे घेतलेले गृहित सिद्ध करता आले नाही.

२) नासिक जिल्ह्यात अनेक तालुक्यापैकी पेठ तालुक्यात आदिवासींसाठी कार्यक्रम राबविले जातात. असे गृहितकृत्यात सांगितले आहे. मिळालेल्या माहितीच्या आकडेवारीच्या आधारे एकात्मिक ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत २५.२% इतर आदिवासी विकास महामंडळामार्फत ९४.९८% आदिवासीपर्यंत विकास कार्यक्रम पेठ तालुक्यात राबविले जातात असे दिसते म्हणजेच गृहित धरलेले

गृहितकृत्ये बरोबर आहे असे दिसून आले.

३) सर्व आदिवासी शेतकऱ्यांची नावे दारिद्र्य रेषेखाली आहेत असेच गृहित धरलेले आहे. परंतु वस्तुस्थितीत सर्व १००% आदिवासींची नावे दारिद्र्य रेषेखालील यादीत नाही. बऱ्याचदा यासाठी जो सर्व्हे केला जातो त्यात सर्व आदिवासींना सामावून घेतले जात नाही.

४) संशोधकाने संशोधन सुरू करतांना आदिवासी विकास कार्यक्रमा अंतर्गत आदिवासींनी आपली दारिद्र्यरेषा ओलांडली आहे. परंतु प्रत्यक्षात संशोधकाला सांख्यिकीवरून असे दिसते की फक्त एकूण पैकी १६.६७% लाभार्थींनी कार्यक्रमांचा लाभ घेवून दारिद्र्य रेषा ओलांडली आहे तर ८३.३३% लाभार्थींना आपली दारिद्र्य रेषा ओलांडता आली नाही. हे योजनेचे अपयश समजावे की काय?

**शिफारशी :**

१) आदिवासीसाठी सरकार जे कार्यक्रम किंवा योजना राबविते ते सर्व कार्यक्रम किंवा योजना आदिवासी लाभार्थींपर्यंत पोहोचविण्यासाठी कठोर पावले उचलावीत व कार्यक्रमाची उद्दिष्टे ठरवून द्यावीत. कार्यक्रमात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी. उदा. त्यांची पगारवाढ थांबवावी तसेच प्रमोशन थांबवावे.

२) कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रसारमाध्यमांना विशिष्ट उद्दिष्ट्ये द्यावीत तसेच ग्रामीण विकास त्यामध्ये आदिवासींच्या योजनांना टि.व्ही., रेडीओ, वर्तमानपत्रे इ. मध्ये वेळोवेळी प्रसिद्धी द्यावी.

३) आदिवासी कुटूंबांचे सर्वेक्षण करून जे कार्यक्रमाचा लाभ घेण्यास लायक आहेत तसेच ज्यांचे दरडोई उत्पन्न व वार्षिक उत्पन्न कमी आहे, त्या सर्वांचा दारिद्र्य रेषेतील यादीत समावेश करून त्यांना कार्यक्रमाचे लाभ द्यावेत.

४) आदिवासींना योजनांच्या लाभा बरोबरच त्यांना लिहिता-वाचता येईल यासाठी साक्षरता अभियानाचे काम प्रभावी करावे की, ज्यामुळे आदिवासींना कार्यक्रमाचे फायदे-तोटे समजू शकतील व ज्यांना फायदा-तोटा का होतो, प्रकल्पाचा तोटा कमी करून फायदा कसा वाढविता येईल.

५) आदिवासींनी प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची फेड वेळेवरच केली पाहिजे. त्यासाठी त्यांना कर्ज परतफेडीचे महत्व पटवून देण्यासाठी सरकार व स्वयंसेवी संस्थांनी पुढे येवून कर्ज न फेडल्यामुळे सरकारी बँकांचा तोटा कसा वाढत जातो यासंबंधी त्यांचे मत परिवर्तन करावे. नाहीतर विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखेच प्रयत्न आदिवासी लाभार्थी देखील भविष्य काळात कर्जाच्या भितीने करतील. तसे होवू नये म्हणून त्याचा वेळीच प्रतिबंध करावा.

-*-

# 'आर्थिक वृध्दी व रोजगारातील बदल' एक तौलनिक अभ्यास

डी.जी.धट, कुरुंदवाड
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
सहकारभूषण एस.के.पाटील महाविद्यालय, जि.कोल्हापूर.
(आजीव सभासद क्र.२६२)
(भ्रमणध्वनी क्र.९८९०९०९२४५)

---

**प्रास्ताविक:**

आर्थिक वृध्दीत वाढ होणे, याचाच अर्थ रोजगार पातळी मध्ये वाढ होत जाणे होय. यासंदर्भात भारताच्या बाबतीत सन १९९० पूर्वी व १९९० नंतरच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. कारण १९९० पूर्वी भारतीय अर्थव्यवस्था नियंत्रणामध्ये होती तर १९९० नंतर हळूहळू नियंत्रणमुक्त होत गेलेली आहे. अर्थव्यवस्थेतील कृषीक्षेत्र, उद्योगक्षेत्र आणि सेवाक्षेत्र यांच्या राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा व या क्षेत्रामधील रोजगारात होणारे बदल अभ्यासल्या नंतर आपणाला या दोन्हींचा तौलनिक अभ्यास करणे शक्य होते.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये राष्ट्रिय उत्पन्नातील शेती क्षेत्राचा हिस्सा कमी होत जातो तर उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत जात असतो. त्याचवेळी जर शेतीक्षेत्रातील अतिरिक्त श्रमिकांना उद्योग व सेवा क्षेत्रात सामावून घेतले तर बेकारांची संख्या कमी राहते. वास्तविक उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये रोजगार पातळी वाढत असेल तर अर्थव्यवस्था विकासाच्या योग्य मार्गाने चाललेली आहे असे म्हटले जाते. अर्थव्यवस्थेमध्ये शेतीक्षेत्र, उद्योगक्षेत्र व सेवाक्षेत्र या तिन्ही क्षेत्रामध्ये जे कामगार काम करीत असतात. त्यांची वर्गवारी संघटित आणि असंघटित अशी केली जाते किंवा वेगळ्या शब्दांमध्ये असे म्हणता येईल की, या तिन्ही क्षेत्रामध्ये संघटित क्षेत्र व असंघटित क्षेत्र अशी विभागणी झालेली असते. आणि त्या त्या क्षेत्रामधील रोजगार पातळीची स्थिती अभ्यासून आर्थिक वृध्दीच्या प्रक्रियेतील बदल आणि रोजगारातील बदल अभ्यासता येईल.

## शोध निबंधाचे उद्देश:

१) आर्थिक वृध्दीचे मोजमाप करणे त्यातील बदल अभ्यासणे.

२) आर्थिक वृध्दीबरोबर रोजगारातील बदलांचा अभ्यास करणे.

३) आर्थक वृध्दीचे निकष म्हणून शेती क्षेत्र, उद्योगधंदे आणि सेवाक्षेत्रातील बदलांचा अभ्यास करणे.

४) विविध क्षेत्रातील रोजगाराची सद्य:स्थिती मांडणे व अभ्यासणे.

५) आर्थिक वृध्दीतील बदल व रोजगार वृध्दीतील बदल यांचा तौलनिक अभ्यास करून निष्कर्ष मांडणे.

**गृहितकृत्य:**

१) आर्थिकवृध्दी बरोबरच शेती क्षेत्राच्या हिस्सा बरोबर त्या क्षेत्रातील रोजगार पातळी घटत जाते.

२) आर्थिक वृध्दी बरोबर उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये रोजगार पातळीत वाढ होत जाते.

**संशोधन पध्दत/अभ्यास पध्दत** - दुय्यम साधन सामग्रीचा वापर केला आहे.

## देशातील जी.डी.पी. मधील बदल आणि रोजगारामधील बदल-

कोलन क्लर्क यांच्यामते, जेव्हा राष्ट्रिय उत्पन्नाचे प्रमाण वाढत जात असते, तेव्हा लोकांच्या अन्नधान्यावरील खर्चात कपात होते तर अन्नधान्येतर (Non-Food items) वस्तुवरील खर्चात वाढ होत असते. त्याचा परिणाम उद्योग, आणि सेवा क्षेत्राच्या विकासावर अनुकूल होतो. त्यांच्या क्षेत्राचा विकास व विस्तार वेगाने होत जातो म्हणून त्या-त्या क्षेत्रात उद्योग, सेवा क्षेत्रांचा हिस्सा वाढण्याबरोबरच तेथील रोजगाराचा वृध्दीदर सुध्दा वाढत जातो हे पुढील तक्ता कमांक १ वरून लक्षात येईल.

**तक्ता क्र. १- २००७**

| अ.नं. | देश | उत्पादनातील हिस्सा (%) शेती उद्योग सेवा | रोजगारातील हिस्सा (%) शेती उद्योग सेवा |
|---|---|---|---|
| १) | इंग्लंड | १ - २ - ७६ | १.४ - २२.३ - ७६.३ |
| २) | अमेरिका | १ - २१ - ७७ | १.४ - २०.६ - ७८.० |
| ३) | फ्रान्स | २ - २० - ७७ | ३.४ - २२.१ - ७२.९ |
| ४) | जपान | २ - २९ - ६९ | ४.२ - २७.९ - ६६.७ |
| ५) | ऑस्ट्रलिया | २ - २९ - ६९ | ३.४ - २१.२ - ७५.१ |

*वरील तक्त्यावरून पुढील निष्कर्ष काढता येतील.*

१) विकसीत देशामध्ये देशान्तर्गत राष्ट्रीय उत्पादन (जी.डी.पी.) मध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा १ ते २ % दरम्यान आहे आणि या क्षेत्राचा रोजगारातील हिस्सा सुध्दा ५% पेक्षा कमीच राहिलेला आहे.

२) या देशांचा उद्योगक्षेत्राचा जी.डी.पी. मधील हिस्सा ६९ ते ७७% आहे आणि रोजगारामधील या क्षेत्राचा हिस्सा ६७ ते ७८% दरम्यान आहे.

यावरून असे म्हणता येईल की जी.डी.पी. मधील उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा जेव्हा वाढत जाईल तेव्हा रोजगार पातळीचे प्रमाणसुध्दा वाढत जाणार आहे. रोजगारातील हा बदल (trends) विकासाशी संबंधित राहिलेला आहे.

## विकसनशील देशातील जी.डी.पी. मधील बदल आणि रोजगारातील बदल:

तक्ता क्र. २ वरून विकसनशील देशामध्ये सुध्दा जेव्हा जी.डी.पी. मध्ये वाढ होते. किंवा उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत जातो. तेव्हा रोजगारातसुध्दा क्षेत्रनिहाय बदल होत असतात हे आढळून येईल.

**तक्ता क्र. २**

| अ.नं. | देश | G.D.P. (On P.P.P.) Base) 2007 | उत्पादनातील हिस्सा (%) शेती उद्योग सेवा | रोजगारातील हिस्सा (%) शेती उद्योग सेवा |
|---|---|---|---|---|
| १) | कोरिया | २६.२३० | ३ - ३७ - ६० | ७.४ - २५ - ६६.६ |
| २) | मलेशिया | १३.२५० | १० - ४८ - ४२ | १४.३ - २८ - ५६.७ |
| ३) | थायलंड | ०७, ५०० | ११ - ४५ - ४५ | ४१.७ - २०.७ - ३७.४ |
| ४) | चीन | ०५,६०० | ११ - ४७ - ४२ | ४७ - २२ - ३१ |
| ५) | भारत | ०२,३५० | १८ - २९ - ५३ | ५०.२ - २०.४ - २९.४ |
| ६) | पाकिस्तान | ०२,५४० | २० - २७ - ५३ | ४३.६ - २१.० - ३५.४ |

*P.P.P. Base = Purchasing Power parity (क्रयशक्ती समता शक्ती नुसार)*

तक्ता क्र.२ वरून पुढील निष्कर्ष काढता येतील:

१) कोरीयाच्या बाबतीत शेती क्षेत्राचा हिस्सा जी.डी.पी. मध्ये ३% तर उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा ३७% व ६०% आहे. त्याचवेळी या क्षेत्रामध्ये रोजगाराचा हिस्सा अनुक्रमे ७.४%, २५.९% व ६६.६% इतका आहे. म्हणजे शेती क्षेत्रातील कमी रोजगार उद्योग व सेवा क्षेत्रामध्ये रोजगाराचा हिस्सा जास्त आहे.

२) मलेशिया, थायलंड या दोन्ही देशामध्ये शेतीक्षेत्राचा जी.डी.पी. मधील हिस्सा १०% ते १५% दरम्यां आहे तर उद्योग व सेवेचा रोजगारातील हिस्सा ३२% ते ४८% आणि ४०% ते ४६% आहे.

३) भारत व पाकिस्तान या देशामध्ये शेती क्षेत्राचा हिस्सा १८-२०% आहे तर उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे २९-२७% आणि ५३% आहे. जेव्हा उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत जातो तेव्हा रोजगाराचे या क्षेत्रातील प्रमाण सुध्दा वाढत गेले ते २०.४% आणि २९३४% भारतामध्ये तर पाकिस्तानमध्ये २१% आणि ३५.४% राहिलेले आहे.

४) चीन या देशामध्ये उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाला चालना दिली तेव्हा चीनमध्ये उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा वाढत गेलेला आहे.

साधारणपणे असे दिसून येते की, सेवा क्षेत्रामध्ये या विकसनशील राष्ट्रातील रोजगारीचा हिस्सा ५० ते ६२% दरम्यान राहिलेला आहे.

विकास प्रक्रियेत उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण जास्त बदललेले आहे.

## नवीन आर्थिक धोरण आणि रोजगारातील बदल

सन १९९० पूर्वी आणि सन १९९० नंतर रोजगारातील प्रमाणात क्षेत्र निहाय बदल सुध्दा आढळून येतात. भारतामध्ये सन १९९० नंतर नवीन आर्थिक धोरणांचा पुरस्कार केला त्यामुळे रोजगारात सुध्दा काही बदल झालेले आहेत. तक्ता क्र. ३ वरून ही बाब लक्षात येईल.

**तक्ता क्र. ३(अ) (१९९० पूर्वीची स्थिती)**

| अ.क्र. | क्षेत्र | १९८३ द.ल. | १९९३-९४ द.ल. | १९८३-९३ मधील रोजगारातील बदल % |
|---|---|---|---|---|
| १) | शेती | २०८.९९ | २४५.१६ | ५०.५% |
| २) | उद्योग | ४१.६६ | ५५.५३ | १९.३% |
| ३) | सेवा | ५२.११- | ७३.७६ | ३०.२% |

**तक्ता क्र. ३(ब) (१९९० नंतर- २००० पर्यंत )**

| अ.क्र. | क्षेत्र | १९९३-९४ द.ल. | १९९९-२००० द.ल. | १९९४-२००० मधील रोजगारातील बदल % |
|---|---|---|---|---|
| १) | शेती - | २४५.१६ - | २३९.८३ - | २३.६% |
| २) | उद्योग - | २५५.५३ - | ६६.९१ - | ५०.४% |
| ३) | सेवा - | ७३.७६ - | ९०.२६ - | ७३.२% |

तक्ता क्र.३ 'अ' व 'ब' वरुन पुढील निष्कर्ष मांडता येतील.

१) १९८३ ते १९९३-९४ या कालावधीत शेती क्षेत्रात ५१% जादा लोक काम करण्यासाठी आले, तर १९% लोक उद्योगक्षेत्रात आणि ३०% लोक सेवा क्षेत्रामध्ये नव्याने काम करण्यासाठी आले.

२) साधारणपणे नवीन आर्थिक धोरणानंतर उद्योग क्षेत्रामध्ये ५०% व सेवा क्षेत्रामध्ये ७३% नव्याने रोजगारांच्या संधी निर्माण होऊन रोजगारीचे प्रमाण बदलले गेले. पण शेती क्षेत्रामध्ये २४% ने कामाची संधी कमी झाली. म्हणजे नवीन आर्थिक धोरणांच्या सुरुवातीस उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगारात वाढ झाली तर शेती क्षेत्रात ती कमी झाली. यांचे कारण म्हणजे नवीन आर्थिक धोरणामध्ये सुरुवातीला शेती क्षेत्राकडे दुर्लक्ष होय.

**संघटित क्षेत्रामधील सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये रोजगारात होणारे बदल**

Central Satisfied Organization यांनी संघटित व असंघटित उद्योग / कामगार यांच्यातील फरक स्पष्ट करता असे म्हटलेले आहे कि, 'बाजारपेठेसाठी उत्पादन करणाऱ्या ज्या उद्योगसंस्थेमध्ये यंत्रशक्तीचा वापर न करता तेथे २० कामगारांची संख्या असते किंवा यंत्रशक्तीचा वापर करता ज्या संस्थेमध्ये १० कामगार असतात. ते उद्योग / कामगार असंघटित म्हणून ओळखले जाईल. या बरोबरच ज्या उद्योगातील कामगारांची नोंद १९४८ च्या Industrial Disputes Act ने झालेली नाही. अशा कामगारांचा उल्लेख असंघटित कामगार केला जातो यावरुन संघटित क्षेत्राची कल्पना येऊ शकते.'

संघटित क्षेत्रात कामगारांचा एकूण पुरवठा किती झाला, त्या क्षेत्रात नवीन आर्थिक धोरणा पूर्वी व नंतर रोजगारामध्ये कसा बदल होत गेला हे पुढील पत्रक क्र. ४ वरुन लक्षात येईल तसेच या पत्रकामध्ये संघटित क्षेत्रामध्ये सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये रोजगारामध्ये जे बदल झाले हे दाखविलेले आहे.

**तक्ता क्र. ४**

**असंघटित व संघटित क्षेत्रातील रोजगार व त्यातील बदल**

| | रोजगार द.ल. | | | | | रोजगारातील वृध्दी % | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्र | १९८२-८३ | ९३-९४ | ९९-०० | २००४-०५ | २००९-१० | १९८२-८३ १९९३-९४ | ९४-२०० | ९९-००ते २००४-०५ | २००४-०५ ते २००९-१० |
| १) एकूण लोकसंख्या | ७१८.२१ | ८९५.०५ | १००४.१० | १००९२.३३ | ११७४.० | २.१२ | १.९३ | १.७५ | १.४४ |
| २) एकूण कामगाराचा पुरवठा | २७७.३४ | ३४३.५६ | ३७७.८८ | ४१९.७ | ४२८.० | २.०५ | १.०३ | २.०० | ०.४४ |
| ३) एकूण रोजगार दिला | २६९.३६ | ३३४.५४ | ३६७.३७ | ३८४.९ | ४००.८ | २.०४ | ०.९८ | १.१७ | ०.८२ |
| ४) संघटित क्षेत्रातील रोजगार | २४.०१ | २७.३७ | २८.११ | २६.५ | २७.६ | १.२० | ०.५३ | -०.३० | ०.८२ |
| ५) सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार | १६.४६ | १९.४४ | १९.४१ | १८.२ | १७.२ | १.५२ | -०.०३ | -०.६० | -०.५६ |
| ६) खाजगी क्षेत्रातील रोजगार | ७.५५ | ७.९३ | ८.७० | ८.३ | ९.९ | ०.४५ | १.८७ | ०.३६ | ३.५८ |
| ७) तक्ता ४% ३ | ७.९३% | ७.३०% | ७.०८% | ६.९४% | ६.९% | | | | |
| ८) तक्ता २% १ | ४३.०% | ४२.७% | ४०.४% | ३५.२% | ३६.५% | | | | |

तक्ता क्र. ४ वरुन पुढील निष्कर्ष मांडता येतील.

१) १९८२-८३ पासून २००९-१० पर्यंत भारतामध्ये कामगारांचा पुरवठा सातत्याने वाढत आहे. १९८२-८३ मध्ये २७७.३४ द.ल.असलेला कामगारांचा पुरवठा वाढून तो ४२८.९ द.ल.पर्यंत वाढला.

२) या कामगारांपैकी १९८२-८३ मध्ये २६९.३६ द.ल. कामगारांना रोजगार उपलब्ध करुन दिला. रोजगार उपलब्धेत संदर्भात २००९-१० मध्ये ४००.८ द.ल. लोकांना रोजगार दिला गेला. १९८२-८३ ते २००९-१० दरम्यान १३१ द.ल. लोकांना नव्याने रोजगार दिला. नवीन

आर्थिक धोरणानंतर रोजगार उपलब्धेतमध्ये वाढ होत गेल्याचे दिसून येते.

३) एकूण रोजगारापैकी संघटित क्षेत्रात सन १९८२-८३ मध्ये २४.०१ द.ल. लोकांना रोजगार दिला, तो नविन आर्थिक धोरणानंतर कमी-अधिक होत गेला. त्यामध्ये सातत्य राहिले नाही.

४) संघटित क्षेत्रामधील सार्वजनिक क्षेत्रामध्ये रोजगार वृध्दीचे प्रमाण जवळ जवळ स्थिर राहिलेले आहे. ते १६.४६ ते १७.२१ द.ल. रोजगारादरम्यान राहिलेले आहे.

५) खाजगी क्षेत्रामध्ये रोजगाराचे प्रमाण सन १९८२-८३ मध्ये ७.५५ द.ल. इतके होते ते वाढत जाऊन सन २००९-१० मध्ये ९.९ द.ल. लोकांना रोजगार पुरविला गेला. नविन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून सार्वजनिक क्षेत्राचा संकोच झाला व खाजगी क्षेत्राच्या विस्ताराला चालना दिल्यामुळे या क्षेत्रात रोजगार वाढत गेला.

६) एकूण रोजगारात संघटित क्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण ७% दरम्यान राहिलेले आहे. (सन १९८२-८३ ते सन २००९-१०)

७) एकूण लोकसंख्येचा एकूण रोजगार वाढीचा विचार करता वाढत्या लोकसंख्येबरोबर कामगारांचा पुरवठा सातत्याने वाढत आहे. म्हणजे कर्त्या लोकसंख्येचे प्रमाण वाढत चाललेले आहे. भारतात युवा शक्ती वाढत आहे.

८) सन १९८२-८३ ते सन १९९३-९४ मध्ये लोकसंख्येत वाढ २.१२% होते. तेव्हा कामगाराच्या पुरवठ्यात २.०५% ने वाढ होते. तेव्हा २.०४% लोकांना रोजगार पुरविला जातो हे भूषणावह आहे. या रोजगारापैकी १.२०% लोकांना संघटित क्षेत्रात काम/रोजगार उपलब्ध करून दिला जातो, तर निम्म्या लोकांना अन्य म्हणजे असंघटित क्षेत्रामध्ये रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. संघटित क्षेत्रामधील एकूण रोजगारांपैकी १.५२% लोकांना सार्वजनिक क्षेत्रात तर ०.४५% लोकांना खाजगी क्षेत्रात रोजगार उपलब्ध झालेला आहे. नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार करूनही खाजगी क्षेत्रात नव्याने रोजगार संधी उपलब्ध झालेली नाही हे आढळून येते.

९) सन १९९४-२००० या कालखंडामध्ये एकूण कामगारांचा पुरवठा १.०३% इतका होता. त्यापैकी ०.९८% च लोकांना रोजगार वृध्दी झाली. या मध्ये ०.५३% संघटित क्षेत्रात रोजगार वृध्दी झाली. ०.०३% ने सार्वजनिक क्षेत्रात रोजगार कमी झाला तर खाजगी क्षेत्रात १.८७% ने रोजगार वृध्दी घडून आली. नविन आर्थिक धोरणाचा तो परिणाम असावा.

१०) सन १९९९-२००० ते २००४-०५ या कालखंडामध्ये २% कामगारांचा पुरवठा झालेला होता. या पैकी १.९७% लोकांना रोजगारात वृध्दी झाली. या पैकी संघटित क्षेत्रात रोजगार वृध्दीची जी वाढ अपेक्षित होती ती पूर्ण झाली नाही. उलट -०.३०% नी कमी रोजगार या क्षेत्रात झाला तर नविन आर्थिक धोरणानुसार सरकारचा हस्तक्षेप कमी झाल्यामुळे किंवा सार्वजनिक क्षेत्राचा संकोच कमी केल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रात ०.६०% रोजगार घटला, परंतु खाजगी क्षेत्रामध्ये ०.३६% रोजगार वृध्दी घडून आली.

११) सन २००४-०५ ते २००९-१० या अलिकडील कालखंडात रोजगार वृध्दी मध्ये बदल घडून आलेला दिसून येतो. या कालखंडामध्ये केवळ ०.४९% एवढा कामगारांचा पुरवठ्यामध्ये वृध्दी झाली तर ०.८२% प्रत्यक्षात रोजगार वृध्दीत वाढ झाली. सार्वजनिक क्षेत्रामध्ये अपेक्षेप्रमाणे वृध्दी न होता घटच जाली, ती -०.५६% इतकी होती. खाजगी क्षेत्राने मात्र रोजगार वृध्दीत भरीव कामगिरी केली. +३.५८% अधिक रोजगार वृध्दी नोंदविली गेली.

**निष्कर्ष :**

नविन आर्थिक धोरण व जी.डी.पी. मधील बदल यांचा परिणाम म्हणून भारतामध्ये रोजगाराच्या प्रवृत्ती मध्ये (Employment trends) अपेक्षित बदल झालेले आहेत. सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्रामध्ये रोजगार वाढीचे प्रमाण वाढलेले आहे. तसेच जेव्हा जेव्हा जी.डी.पी. मध्ये वाढ होत गेली तेव्हा तेव्हा उद्योग व सेवा क्षेत्रात रोजगार वृध्दीचे प्रमाण वाढत गेले. तर शेती क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण कमी कमी होत गेलेले दिसून येते. थोडक्यात रोजगारातील बदल हा शेती क्षेत्राकडून उद्योग व सेवा क्षेत्राकडे राहतो.

**संदर्भ:**


1) *Indian Economy*- DATT and Sundharam S. Chand Publication New Delhi 055 Sixty Fourth Edition 2012.
2) Quarterly- *Economic Report of the Indian institute of public opinion.* July Sept 2016.
3) *योजना*- (मराठी) सप्टेंबर २०१०
4) *R.B.I. Bulletin*- Nov 2011
5) *Indian Economy*- K.R. Gupta, J.R. Gupta volume I, II, Published by Atlantic B-2, Vishal Enclave, Opp.Rajouri Garden, New Delhi- 27, 2008
6) *भारतीय अर्थव्यवस्था*- प्रा. भालेराव, विद्या प्रकाशन, नागपूर.
7) *Indian Economy Performance and Policies*, Uma Kapila,- Academic Foundation- 4772-73/23 Bharat Ram Road (23 Ansari Road) Darya Ganj, New Delhi- 02, 2007-08.


-*-

# आर्थिक सुधारणोत्तर कालावधीत पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची कामगिरी

**सुभाष पाटील, पुणे**

सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अध्ययन व संशोधन विभाग,

श्री.ना.दा.ठाकरसी महिला विद्यापीठ,

(आजीव सभासद क्र.११६०)

(भ्रमणध्वनी क्र.९८५०४३४५८९)

**प्रास्ताविक :**

१९९१ च्या उदारीकरण धोरणाचा परिणाम नागरी सहकारी बँकांच्या कामगिरीवर झालेला आहे. २००९-१० या वर्षाचा विचार करता भारतातील एकूण नागरी सहकारी बँकांपैकी ३२% बँका एकट्या महाराष्ट्रात असून भारताच्या सहकारी चळवळीमध्ये महाराष्ट्राचा वाटा खूप मोठा आहे. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्र या विभागात ५४% नागरी सहकारी बँका आहेत. पश्चिम महाराष्ट्रातही पुणे जिल्ह्यात १८% बँका असून जवळजवळ ४०% बँकिंग व्यवहार केंद्रीत झाला आहे. प्रस्तुत लेखातून आर्थिक सुधारणोत्तर कालावधीतील पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. मार्च २०१० पयतचा आढावा घेतला कारणाने प्रस्तुत अभ्यास १९९० ते २०१० या कालावधीपयत मर्यादित आहे. बँकांची वित्तीय कामगिरी बँकांच्या ठेवी, कर्जपुरवठा, भागभांडवल, गुंतवणूक, लाभप्रदता, थकबाकी या प्रमुख प्राचलांच्या आधारे अभ्यासली आहे.

**पुणे जिल्ह्याची भौगोलिक व लोकसंख्याविषयक माहिती :**

पुणे जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार १७° ५ ते १९° २ उत्तर अक्षांश व ७३° २ ते ७५° १ पूर्व रेखांश आहे. पुणे जिल्ह्याच्या उत्तरेस अहमदनगर जिल्हा, दक्षिणेला सातारा व पश्चिमेला रायगड जिल्हा आहे. आग्नेय दिशेला सोलापूर तर वायव्येला ठाणे जिल्हा आहे. पुणे जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ १५,६४९ चौ.किमी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ५% इतके आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्याची लोकसंख्या ९४.२६ लाख असून, महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ८.३८% इतकी आहे. पुणे जिल्ह्यातील लोकसंख्येची घनता दर चौरस कि.मी.ला ६०३ इतकी आहे. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्येची घनता ३६५ इतकी आहे. २००१ च्या जनगणनेनुसार, जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण ८०.४५% इतके असून

पुरूष व स्त्री साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ८८.३४% व ७१.८९% इतके आहे. ३१ मार्च २००९ अखेर पुणे जिल्ह्यात १२८८ शेती पतसंस्था, २६६५ बिगर शेती पतसंस्था, ४०६८ विपणन, प्रक्रिया व उत्पादन संस्था, १४,८२४ सामाजिक सेवा संस्था अशा सर्व प्रकारच्या एकूण २२,८४५ सहकारी संस्था कार्यरत होत्या.

**पुणे जिल्हा व महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची तुलनात्मक स्थिती :**

महाराष्ट्र राज्य हे भारतातील औद्योगिकदृष्ट्या प्रगतिपथावरील राज्य मानले जाते. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत पुणे जिल्ह्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. पुणे जिल्हा शैक्षणिक, औद्योगिक व ऐतिहासिकदृष्ट्या प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील पहिली नागरी सहकारी बँक पुणे येथे स्थापन झाली. पुणे जिल्हा व महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची तुलनात्मक स्थिती तक्ता १ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता १ मध्ये महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्हा यांतील नागरी सहकारी बँकांची तुलनात्मक प्रगती दर्शविली आहे. महाराष्ट्रातील एकूण ५१२ बँकांपैकी ५८ बँका म्हणजे ११.३२% बँका पुणे जिल्ह्यात आहेत. एकूण सभासदांपैकी ११.०५% सभासद पुणे जिल्ह्यात आहेत. भागभांडवल, राखीव निधी व खेळते भांडवल यांचे प्रमाण अनुक्रमे १७.३७%, २०.३९% व १८.१०% इतके आहे. पुणे जिल्ह्यातील ठेवींचे प्रमाण १९.९१% इतके होते. महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांनी वितरीत केलेल्या कर्जापैकी १८.९०% कर्जपुरवठा पुण्यातील नागरी सहकारी बँकांनी केला होता. पुणे जिल्ह्यातील ५४ नागरी सहकारी बँकांनी २००.८० कोटी रु. चा नफा मिळविला होता, की ज्याचे प्रमाण १८.५७% इतके होते. थोडक्यात, पुणे जिल्ह्यात ११% बँका असून जवळजवळ २०% बँकिंग व्यवहार केंद्रीत झाला आहे.

**तक्ता क्र.१ : महाराष्ट्र राज्य व पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची तुलनात्मक स्थिती (३१ मार्च २००९ अखेर) (रुपये कोटीत)**

| अ.क्र. | बाब | महाराष्ट्र | पुणे | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | बँकांची संख्या | ५१२* | ५८ | ११.३२ |
| २ | शाखांची संख्या | ३३११ | ४८४ | १४.५८ |
| ३ | सभासद संख्या | ६५५९ | ७२५ | ११.०५ |
| ४ | भागभांडवल | २३०६.४३ | ४००.८४ | १७.३७ |
| ५ | राखीव निधी | १०४६५.३५ | २१३४.५७ | २०.३९ |
| ६ | खेळते भांडवल | १०६२४९.४४ | ११२३९.७२ | १८.१ |
| ७ | ठेवी | ८८२७६.८९ | १७५७७.५२ | १९.९१ |
| ८ | दिलेले कर्ज | ५६०१६.६ | १०५८७.६६ | १८.९ |
| ९ | ठेवी व कर्ज प्रमाण | ६३.४५% | ६०.३६% | -- |
| १० | थकबाकी (टक्केवारी) | १२.३७% | २.९२%** | -- |
| ११ | नफा | १०८१.२३ | २००.८ | १८.५७ |
| १२ | तोटा | ५३५.४३ | ३.३१ | ०.६१ |

स्त्रोत: कृपया पुढील पानावर पहावे.

स्रोत:

१. *महाराष्ट्र राज्याकरीता : Statistical statements relating to operations of Urban Co-operative Banks in Maharashtra, 2008-09.*
२. *पुणे जिल्ह्याकरीता : पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशन लि. पुणे. ३१ वा वार्षिक अहवाल, सन २००८-०९*
   ** No. of Reporting Banks.,*
   *** Net NPA*

**पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची वृद्धी :**

पुणे जिल्ह्यात सर्वप्रथम ९ जानेवारी १९०६ रोजी डिफेन्स सहकारी पत बँक लि.पुना (Defence Co-operative Credit Bank Ltd. Poona) ही बँक स्थापन झाली. व १८ जानेवारी १९०६ रोजी कॉसमॉस सहकारी नागरी बँक लि. पुना (Cosmos Cooperative Urban Bank Ltd. Poona) ही बँक स्थापन झाली, तर १९ मे २००३ रोजी पुणे सहकारी बँक ही ६३ वी बँक स्थापन झाली आहे. १९०६ ते २००४ दरम्यान पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची एकूण संख्या ६३ इतकी झाली आहे. मार्च २०१० मध्ये नागरी सहकारी बँकांची संख्या ५७ पर्यंत कमी झाली आहे.

पुणे जिल्ह्यात २० व्या शतकाच्या पहिल्या दशकात (१९०१ ते १९१०) दोन बँका स्थापन झाल्या. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या दशकात प्रत्येकी दोन बँका स्थापन झाल्या. पाचव्या दशकात एका बँकेची स्थापना झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात या बँकांची संख्या केवळ आठ इतकी होती. त्यानंतर सहाव्या, सातव्या, आठव्या, नवव्या व दहाव्या दशकात अनुक्रमे चार, दोन, २१, दोन आणि २४ बँकांची स्थापना झाली. १९७१-१९८० आणि १९९१-२००० या दशकांमध्ये सर्वात जास्त म्हणजे अनुक्रमे २१ व २४ बँकांची स्थापना झाली. याचे श्रेय त्या वेळच्या भारतीय रिझर्व्ह बँक व केंद्र सरकारच्या धोरणास जाते. ३१ मार्च २०१० अखेर ५७ नागरी सहकारी बँका कार्यरत आहेत. या ५७ बँकांच्या शाखांची संख्या ४९३ तर विस्तारित कक्षांची संख्या २४ इतकी होती. या ५७ बँकांपैकी चार अनुसूचित बँका, दोन महिला बँका आणि चार पगारदार नोकरांच्या बँका आहेत. याशिवाय पुणे जिल्ह्याबाहेर ज्यांचे मुख्य कार्यालय आहे, अशा २७ बँकांच्या ४४ शाखा पुणे जिल्ह्यात प्रामुख्याने पुणे शहरात कार्यरत आहेत.

**पुणे जिल्ह्यातील तालुकानिहाय नागरी सहकारी बँका :**

पुणे जिल्ह्याचे मुख्य प्रशासकीय ठिकाण पुणे येथे आहे. पुणे जिल्ह्यात १४ तहसील/तालुके असून ते पुढीलप्रमाणे आहेत. १) जुन्नर, २) आंबेगाव, ३) शिरुर, ४) खेड, ५) मावळ, ६) मुळशी, ७) हवेली, ८) पुणे शहर, ९) दौंड, १०) पुरंदर, ११) वेल्हे, १२) भोर, १३) बारामती व १४) इंदापूर. पुणे जिल्ह्यातील एकूण क्षेत्रफळापैकी शिरूर तालुक्याचे क्षेत्र सर्वात मोठे म्हणजे १०% इतके आहे तर, पुणे शहराचे सर्वात कमी म्हणजे १% इतके आहे. २००१ च्या जनगणनेनुसार ७२.३३ लाख एकूण लोकसंख्येपैकी सर्वात जास्त लोकसंख्या पुणे शहरात २६.९५ लाख इतकी असून सर्वात कमी लोकसंख्या वेल्हे तालुक्यात ५५,८७४ इतकी आहे. हे प्रमाण अनुक्रमे ३७% व ०.७७% इतके आहे. याशिवाय पुणे जिल्ह्यात १३ पंचायतसमित्या आहेत. तसेच जिल्ह्यात एकूण २५ नागरी क्षेत्रे असून त्यापैकी २ महानगरपालिका,

३ कटकमंडळे, व ११ नगरपरिषदा आणि ९ गणना शहरे आहेत. जिल्ह्यात एकूण १८६६ खेडी आहेत.

पुणे जिल्ह्यात पुणे शहर व १३ तालुके आहेत. ३१ मार्च २०१० अखेर, एकूण ५७ नागरी सहकारी बँकांपैकी ४८ बँका म्हणजे ८४% बँका केवळ पुणे शहरात आहेत तर उर्वरित ९ बँका म्हणजे १६% बँका १३ तालुक्यांमध्ये आहेत. एकूण १३ तालुक्यांपैकी मुळशी, वेल्हे व भोर या तीन तालुक्यांमध्ये एकही नागरी सहकारी बँक स्थापन झालेली नाही. बारामती, खेड, आंबेगाव, जुन्नर, पुरंदर, शिरूर, मावळ, हवेली व दौंड या नऊ तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक बँक स्थापन झाली आहे. तर इंदापूर तालुक्यात दोन बँका स्थापन झाल्या आहेत.

**आर्थिक सुधारणोत्तर कालावधीतील पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची प्रगती :**

नागरी सहकारी बँकींग चळवळीच्या दृष्टीने १९९३ हे महत्त्वपूर्ण वर्ष समजले जाते, कारण भारतातील एकूण बँकींग प्रणालीबाबत नरसिंहम् समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी होत असतानाच भारतीय रिझर्व्ह बँकेने १९९१ मध्ये सतीश मराठे यांच्या अध्यक्षतेखाली नागरी सहकारी बँकांच्या अभ्यासासाठी समिती नेमली. या समितीने नवीन नागरी सहकारी बँकांची स्थापना, कार्यक्षेत्र, कार्यपद्धती, संघटन याबाबतीत महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. या शिफारशींची अंमलबजावणी मे १९९३ पासून करण्यात आली. १९९१ पासून उदारीकरण धोरणाची सुरुवात झाली असली तरी सहकारी बँकींग क्षेत्रात १९९३ पासून सुरुवात झाली आहे. उदारीकरण धोरणाचा नागरी सहकारी बँकांवर झालेला परिणाम अभ्यासण्याकरीता आर्थिक सुधारणापूर्व आणि आर्थिक सुधारणा नंतरच्या काळातील प्रगती अभ्यासणे संयुक्तिक ठरेल. पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची प्रगती तक्ता क्र.२ मध्ये दर्शविली आहे.

तक्ता क्र.२ वरुन पुढील निष्कर्ष काढता येतील:

१) १९९० ते २००५ या काळात पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची संख्या ४१ वरुन ६३ इतकी झाली असून २०१० मध्ये ती ५७ इतकी होती. १९९० ते १९९५ या उदारीकरणाच्या काळात बँक संख्या वृद्धीचा दर -२.४३% इतका होता. १९९५ ते २००० या वृद्धीचा दर ५५% इतका होता. तर २००५ ते २०१० या कालावधीतील वृध्दीचा दर -९.५२% इतका कमी झाला आहे.

२) बँकांची संख्या वाढीबरोबरच सभासदांची संख्याही वाढत आहे. सभासद संख्या वाढणे हे नागरी सहकारी बँकांचे यशच म्हणावे लागेल. १९९० ते १९९५ या काळातील सभासद संख्या वाढीचा दर २६.०४% इतका असून १९९५ ते २००० या काळात हा दर ३९.३९% इतका आहे. मात्र २००५ ते २०१० या काळात हा दर २३.४९% पर्यंत कमी झाला आहे.

३) १९९० ते २०१० या कालावधीत वसूल भागभांडवलात १६.२७ कोटी रुपये वरून ४४२.११ कोटी रुपये पर्यंत वाढ झाली आहे. १९९५ ते २००० या काळात वाढीचा दर २४७.१५% इतका होता, तर २०१० पर्यंत ८२.४५% पर्यंत कमी झालेला आहे. यावरून बँकांची आर्थिक परिस्थिती निदर्शनास येते.

४) १९९० मध्ये एकूण ४१ बँकांकडे ६९.०६ कोटी रुपये इतके खेळते भांडवल होते. १९९५ पर्यंत त्यात २०३.८३% वाढ झाली. २००० मध्ये ही वाढ २९७.९७% इतकी होती. २००५ पर्यंत यात ८०.८८% नी घट झाली. २००५ ते २०१० या काळात हा दर ६९.४६% इतका

आहे. २००० ते २०१० या कालावधीचा विचार करता एकूण खेळते भांडवल वाढीचा दर मात्र उत्तरोत्तर कमी झालेला दिसतो.

५) राखीव निधीच्या बाबतीत विचार करता, १९९० ते २०१० या कालावधीत राखीव निधीत २७.७८ कोटी रुपये वरून २६६५ कोटी रुपये पर्यंत वाढ झाली आहे. १९९० ते १९९५ या कालावधीतील राखीव निधी वाढीचा दर ३४३.९८% तर २००० ते २००५ या कालावधीत हा दर ४१०.३५% इतका होता. यावरून बँकांनी नागरी भागात आपले कार्य प्रभावीपणे चालवले आहे असे म्हणता येईल. मात्र २००५ ते २०१० या काळात हा दर ४.८९% पर्यंत कमी झाला आहे.

६) नागरी सहकारी बँकांकडील एकूण ठेवींमध्ये सातत्याने वाढ झाल्याचे दिसून येते. पण प्रत्यक्षात ठेवींचा वाढीचा दर १९९५ ते २००० या कालावधीत ३४४% ने वाढल्याचे व २००० ते २००५ या कालावधीत ६४.४६% पर्यंत घटल्याचे दिसून येते. काही बँकामधील घोटाळा प्रकरणामुळे नागरी सहकारी बँकांमध्ये ठेवी ठेवण्याच्या बाबतीत ग्राहकांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे असे म्हणता येईल. तर २००५ ते २०१० या काळात हा दर १७१.४५% ने वाढल्याचे दिसून येते.

७) नागरी सहकारी बँका प्रामुख्याने छोटे व्यावसायिक, मध्यमवर्ग, लहान व्यापारी, लघुउद्योजक आणि दुर्बल घटकांना कर्जे देत असतात. १९९० ते १९९५ या कालावधीतील वितरीत केलेल्या कर्ज वाटपाचा वृद्धीदर १६४.८७% इतका होता. तो १९९५ ते २००० या कालावधीत २८६.६०%पर्यंत वाढला. मात्र २००० ते २००५ या कालावधीत हा दर ४६.१३% इतका कमी झालेला आहे. यावरून उदारीकरणानंतर सरसकट कर्ज देण्याला आळा बसला आहे असे म्हणता येईल. २००५ ते २०१० या काळात हा दर ६४.४५% ने वाढल्याचे दिसून येते.

८) १९९० ते १९९५ या काळात बँकांना मिळणाऱ्या नफ्यात ७७.१३% दराने वाढ झाली होती. उदारीकरणानंतरच्या १९९५ ते २००० काळात एकूण नफा ६२३.३४% पर्यंत वाढल्याचे दिसते. मात्र नफा वाढीचा दर २००० ते २००५ काळात केवळ २५.३७%, तर २००५ ते २०१० या काळात हा दर ६५.१२% इतका आहे. कदाचित हा स्पर्धात्मक वातावरणातील अनियंत्रित व्याजदराचा परिणाम असावा.

९) थकबाकीच्या बाबतीत विचार करता, १९९० ते १९९५, १९९५ ते २००० या कालावधीतील सरासरी थकबाकीचे प्रमाण १४.६२% वरून ५.८२% पर्यंत कमी होत असल्याचे दिसून येते. २००३ पासून भारतीय रिझर्व्ह बँकेने अनुत्पादक मालमत्तेबाबत कडक निकष लागू केले. परिणामी २००० ते २००५ या कालावधीत थकबाकीची सरासरी टक्केवारी ९.१३% पर्यंत वाढल्याचे दिसते. मार्च २००४ पासून NPA चे निकष १८० दिवसापासून ९० दिवस केल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर झाली आहे.

१०) १९९५ मध्ये तोट्याची रक्कम ३.०५ कोटी रुपये इतकी होती. ती २००५ पर्यंत ३७.५३ कोटी रुपयांपर्यंत वाढली.

थोडक्यात १९९० ते २००० या कालावधीचा २००० ते २०१० या कालावधीशी तुलना करता असे दिसून येते की, या काळात

बँकांची संख्या, सभासद संख्या, वसूल भाग भांडवल आणि राखीव निधी या घटकांत वाढ झाली आहे. तशी वाढ बँकांकडील ठेवी, दिलेली कर्जे आणि नफा यांत झालेली नाही, असे म्हणण्यास वाव आहे.

## पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या वित्तीय समस्या :

### कर्ज व ठेवी गुणोत्तरात घट:

बँकेकडे असणाऱ्या एकूण ठेवींपैकी किती प्रमाणात ठेवी बँकेच्या कर्ज व्यवहारात गुंतलेल्या आहेत त्याचे प्रमाण म्हणजे कर्ज व ठेवी गुणोत्तर (Credit Deposit Ratio - CDR) होय. जर एखाद्या बँकेचा CDR खूप कमी असेल तर, त्याचा अर्थ बँकेने वितरित केलेल्या कर्जाचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे त्या बँकेला कर्जावर मिळणाऱ्या व्याजाचे उत्पन्न कमी होऊ शकेल. याउलट CDR जर खूप जास्त असेल तर बँकेची तरलता कमी पडू शकते. त्याचा बँकेच्या अस्तित्वावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो. बँकेच्या वित्तीय स्थैर्याच्या दृष्टीने CDR ६०% ते ७०% दरम्यान असला पाहिजे. उदारीकरणानंतरच्या काळात पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची एकूण कर्ज व ठेवी गुणोत्तर कमी झाले आहे. १९८९-९० मध्ये CDR ७७.९५% इतका होता.१९९९-२००० या वर्षात ६८.२०% इतका होता. तर २००९-१० या वर्षात ५९.१९% इतका आहे. थोडक्यात १९८९-९० ते २००९-१० या काळात CDR ७७.९५% वरून ५९.१९% पर्यंत कमी झाला आहे. सध्या बँकांबँकांमध्ये स्पर्धा सुरू आहे. नागरी सहकारी बँकांच्या कर्जावरील व्याजदर हे अजूनही स्पर्धात्मक दृष्ट्या वरचढ आहेत. त्यांच्याकडे चांगल्या कर्जदारांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे नवीन कर्जाला उठाव नाही. शिवाय ठेवींवरील व्याजदर जास्त असल्याने ग्राहक निवडक नागरी सहकारी बँकांमध्ये ठेवी ठेवण्यास प्राधान्य देतात. मात्र त्याच वेळेस कर्ज महाग असल्याने कर्जासाठी इतर बँकांना प्राधान्य देतात. या सर्व परिस्थितीमुळे घटता CDR ही समस्या निर्माण झाली आहे.

### घटती लाभप्रदता:

स्पर्धात्मक व्याजदरामुळे नागरी सहकारी बँकांच्या कर्ज आणि ठेवींवरील व्याजदरातील अंतर कमी झाले आहे. शिवाय नवीन कर्जाला उठाव नाही व बँकांकडे पडून असलेला अतिरिक्त निधी कमी व्याजदराच्या गुंतवणुकीकडे वळविल्यामुळे नफ्यातील दुरावा आणखी कमी झाला आहे. बँकेचे यश हे शेवटी त्या बँकेला मिळणाऱ्या नफ्यावर अवलंबून असते. उदारीकरणानंतरच्या काळात नागरी सहकारी बँकांची लाभप्रदता घटत चालली आहे. १९८९-९० या वर्षात पुणे जिल्ह्यातील एकूण ४१ नागरी सहकारी बँकांना ५.७३ कोटी रुपयांचा नफा प्राप्त झाला होता व लाभप्रदता ०.००८२ इतकी होती. १९९९-२००० या वर्षात एकूण ६२ बँकांपैकी ४६ बँकांना एकूण ७३.४२ कोटी रुपये नफा प्राप्त झाला होता व त्यांची लाभप्रदता ०.००८७ इतकी होती. २००९-१० या वर्षात एकूण ५७ बँकांपैकी ५२ बँकांना एकूण ९२.०५ कोटी रुपये नफा प्राप्त झाला होता व त्यांची लाभप्रदता ०.००५९ इतकी होती. लाभप्रदता दर ०.०१० इतका असायला हवा. प्रत्यक्षात मात्र तो कमी आहे. मार्च २००४ पासून NPA चे निकष १८० दिवसापासून ९० दिवस केल्यामुळे ही समस्या अधिक गंभीर झाली आहे. तसेच संगणकीकरण व अद्यावत तंत्रज्ञानासाठी नफ्यातील काही भाग राखून ठेवावा लागतो. मोठा भांडवली खर्च करावा लागून घसाऱ्याचे ३३% एवढे प्रमाण बँकांचा निव्वळ नफा कमी होण्यास कारणीभूत ठरतो. अशा प्रचंड खर्च केला तर नफ्याच्या क्षमतेत घट होईल.

**ठेवींवरील खर्चात वाढ :**

बँकांकडे प्रामुख्याने चालू ठेवी, बचत ठेवी, मुदती ठेवी आणि आवर्ती ठेवी या प्रकारच्या ठेवी असतात. चालू व बचत ठेवींसाठी येणारा खर्च कमी असतो. मात्र मुदती आणि आवर्ती ठेवींवरील खर्च जास्त असतो. साधारणतः ठेवीवर व्याजरूपाने करावा लागणारा खर्च ६० ते ७०% इतका असतो. बँकांकडील मुदती आणि आवर्ती ठेवींचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत आहे तर चालू व बचत ठेवींचे प्रमाण कमी होत आहे. १९९० या वर्षात चालू ठेवींचे प्रमाण १०.६२%, बचत ठेवींचे प्रमाण ५४.०७% व मुदती ठेवींचे प्रमाण ३५.३१% इतके होते.तर २०१० या वर्षात हे प्रमाण अनुक्रमे ५.१८%, २४.७७% व ७०.०५% इतके झाले आहे. म्हणजे मुदती ठेवींच्या प्रमाणात दुपटीने वाढ झाली आहे. पर्यायाने मुदत ठेवींवरील खर्चही वाढला आहे. बहुतेक नागरी सहकारी बँकांनी पूर्वी दीर्घमुदतीच्या १२ ते १४% एवढ्या अधिक व्याजदराने ठेवी स्वीकारलेल्या आहेत त्यांच्या मुदती संपण्यास अद्यापी काही वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे अशा जादा दरांच्या ठेवींवर द्याव्या लागणाऱ्या व्याजरकमेमुळे बँकांचा ठेवींवरील खर्च वाढतो आहे.

**मर्यादित भांडवल:**

भारतीय रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँकांसाठी भांडवल पर्याप्त प्रमाण (CRAR) ९% निश्चित केले आहे. त्याची पूर्तता करणे आज बऱ्याच नागरी सहकारी बँकांना अवघड होऊन बसले आहे. उदा.२००७-०८ या वर्षात CRAR चे प्रमाण ९% पेक्षा कमी असणाऱ्या बँकांची टक्केवारी पुणे जिल्ह्यात ११% इतकी आहे, त्यापैकी २०% बँकांचा CRAR ऋणात्मक आहे. याचे मुख्य कारण म्हणजे दिवसेंदिवस घटत चाललेल्या नफ्यामुळे गंगाजळीत भर घातली जात नाही. सहकारी बँकांप्रमाणे नागरी सहकारी बँकांना भांडवली बाजारातून भांडवल उभे करता येत नाही. तसेच कमी लाभांशामुळे मोठे ठेवीदार आकर्षित करण्यास नागरी सहकारी बँकांना मर्यादा येतात. यामुळे भांडवल पर्याप्त प्रमाण त्यांना नफ्यातून गाठावे लागते. तसेच प्रति सभासद कमाल भांडवल घेण्याची मर्यादा ५ लाख रु. इतकी आहे.

**गुंतवणूकीवर मर्यादा :**

एकीकडे, नागरी सहकारी बँका वगळता अन्य राष्ट्रीयीकृत, खासगी व परकीय बँका कार्पोरेट क्षेत्रात गुंतवणूक करू शकतात. मात्र अशी गुंतवणूक करण्यास नागरी सहकारी बँकांना परवानगी नाही. तर दुसरीकडे स्पर्धात्मक व्याजदरामुळे चांगल्या कर्जदारांनी नागरी बँकांकडे पाठ फिरवल्याने या बँकांच्या कर्जाला फारसा उठाव नाही. पर्यायाने अतिरिक्त निधीमध्ये वाढ झालेली आहे. अशा निधीची गुंतवणूक व व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करणे हे नफा वाढविण्यासाठी आवश्यक आहे.

**आर्थिक स्थिती कमकुवत :**

नागरी सहकारी बँकांसमोर त्यांच्या आर्थिक कमकुवतेचे आव्हान सर्वात मोठे आहे. संचालक मंडळावर बँकिंगबाबत अनभिज्ञ व्यक्तिंची नेमणुक, संचालक व बँकेतील अधिकारी वर्ग यांनी केलेले गैरव्यवहार, भ्रष्टाचार, अपुरी नियंत्रण यंत्रणा, वशिलेबाजी, अद्ययावत ज्ञानाचा अभाव यामुळे नागरी सहकारी बँकांना आर्थिक नुकसान होऊन बँका दिवाळखोरीत निघतात. उदा.२००६-०७ या वर्षात भारतातील एकूण १८१३ नागरी बँकांपैकी २५४ (१४%) बँका दिवाळखोरीत निघाल्या. त्यापैकी ४२ (१६.५३%) बँका महाराष्ट्रातील आहेत. अनेक बँकांवरील संचालक मंडळे बरखास्त करण्यात आलीत व प्रशासक नेमण्यात आले आहेत. शिवाय दिवाळखोरीमुळे लोकांचा नागरी सहकारी बँकांवरील विश्वास डळमळतो. ग्राहकांचा विश्वास टिकविणे ही देखील एक मोठी समस्या आहे.

### तक्ता २: पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांची प्रगती
(रुपये कोटीत)

| अ.क्र. | तपशील | १९९० | १९९५ | २००० | २००५ | २०१० |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बँकांची संख्या | ४१ | ४० (-२.४३) | ६२ (५५) | ६३ (१.६१) | ५७ (-९.५२) |
| २ | शाखांची संख्या | १७६ | २३५ (३३.५२) | ३६८ (५६.५९) | ४५४ (२३.३६) | ४९३ (८.५९) |
| ३ | सभासद(हजार) | २८८ | ३६३ (२६.०४) | ५०६ (३९.३९) | ६१३ (२१.१४) | ७५७ (२३.४९) |
| ४ | वसूल भागभांडवल | १६.२७ | ३२.३२ (९८.६४) | ११२.२ (२४७.१५) | २४२.३१ (११५.९६) | ४४२.११ (८२.४५) |
| ५ | खेळते भागभांडवल | ६९०.६३ | २०९८.३८ (२०३.८३) | ८३५९.०९ (२९७.९७) | १५१०६.०८ (८०.८८) | २५५९९.३ (६९.४६) |
| ६ | राखीव निधी | २७.७८ | १२३.३४ (३४३.९८) | ५४९.४५ (३४५.४७) | २२५४.७१ (४१०.३५) | २३६५.०६ (४.८९) |
| ७ | ठेवी | ६१५.५४ | १६२२.४३ (१६६.५७) | ७२.३.८५ (३४४.०१) | ११८४७.८ (६४.४६) | २०३१३.९८ (१७१.४५) |
| ८ | कर्जे | ४७९.८५ | १२७०.११ (१६४.८७) | ४९१३.७२ (२८६.६) | ७१८०.४६ (४६.१३) | १२०२३.१३ (६७.४५) |
| ९ | कर्ज व ठेवी गुणोत्तर | ७७.९५% | ७८.३३% | ६८.२०% | ६०.६०% | ५९.१९% |
| १० | गुंतवणूक | उ.ना. | ७७३.१३ | २५३१.५ (२२७.०९) | ५२९१.३७ (१०९.०२) | ९०३९.९ (७०.८४) |
| ११ | नफा | ५.७३ | १०.१५ (७७.१३) | ७३.४२ (६२३.३४) | ९२.०५ (२५.३७) | १५२ (६५.१२) |
| १२ | लाभप्रदता | ०.००८२ | ०.००४८ | ०.००८७ | ०.००६ | ०.००५९ |
| १३ | तोटा | ० | ३.०५ | ०.५७ | ३७.५३ | उ.ना. |
| १४ | सरासरी थकबाकी % | १४.६२ | ८.७१ | ५.८२ | ९.१३* | ९.६५** |
| १५ | सेवक उत्पादकता | ०.२८ | ०.६१ | १.५३ | २.१५ | ३.८५ |

**स्रोत :** *पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, वार्षिक अहवाल, १९८९-९०, १९९४-९५, २००४-०५ आणि २००९-१०.*

**( टीप : कंसातील आकडेवारी वृद्धीदर दर्शविते.)**

* NPA, ** Net NPA, C. Zm.: **उपलब्ध नाही.**

**अस्तित्व टिकविण्याची समस्या:**

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात नागरी सहकारी बँकांनी स्पर्धेत टिकून रहावे, म्हणून अशक्त बँकांचे विलीनीकरण होत असल्याचे दिसते. उदा. पुणे जिल्ह्यातील सिटीझन को. ऑप. बँकेचे अभ्युदय को. ऑप. बँकेत जून २००६ मध्ये विलीनीकरण करण्यात आले. तर २००७ या वर्षात सद्गुरू जंगली महाराज सहकारी बँक व नवजीवन बँक या दोन बँकांचे दि ठाणे जनता सहकारी बँकेत विलीनीकरण करण्यात आले. अशक्त बँकांच्या विलीनीकरणानंतर सशक्त बँकांच्या मालमत्तेवर परिणाम होऊ शकेल. भारतीय रिझर्व बँक व सहकार खाते आपापल्या परीने अशक्त बँकांच्या विलीनीकरणाबाबत प्रस्ताव मांडतात व जर हे शक्य झाले नाही तर ती बँक बंद होण्याची भीती असते. म्हणजेच नवीन जबाबदारी पार पाडताना सशक्त बँकांना स्वत:चे कार्य कार्यक्षमरीत्या पार पाडून नवीन घेतलेले ओझे हलके करण्यासाठी खुपच प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. तसेच सशक्त बँकांनी किती दुर्बल बँकांना आपल्यात सामावुन घ्यावे यालाही मर्यादा आहेत.

**बँक ग्राहकांच्या अपेक्षापूर्तीबाबतच्या समस्या :**

बँकिंग सेवा स्विकारणारी व्यक्ती हा बँकेचा ग्राहक असतो. यात प्रामुख्याने खातेदार, ठेवीदार, कर्जदार, भागधारक सभासद हा बँकेचा मुख्य ग्राहकवर्ग आहे. ग्राहकांच्या गरजा मुख्यत: भौगोलिक परिस्थिती, वयोमान, शैक्षणिक स्तर, आर्थिक परिस्थिती यांसारख्या बाबींवर अवलंबून असतात आणि त्यानुसार बदलतात. राष्ट्रीयीकृत, खासगी व परकीय बँकांच्या तुलनेने कर्जमंजुरीस व प्रत्यक्ष कर्ज देण्यास खूप विलंब लागतो. विशेषत: कर्जमंजुरी करताना नोकरवर्गास फारसा त्रास होत नसतो. मात्र लहान व्यापारी, व्यावसायिक, कारागीर यांना कर्जमंजूरी करताना कागदपत्रांची पुर्तता करणे कठीण जाते. नागरी सहकारी बँकांच्या कर्जावरील व्याजदर तुलनेने जास्त आहेत. पैसे काढणे, पैसे जमा करणे, धनादेश जमा करणे, धनाकर्ष काढणे इत्यादी बँकिंग व्यवहारांसाठी तुलनेने जास्त वेळ लागतो. अलीकडील काळात बँकेमार्फत होणाऱ्या व्यवहारात वाढ झालेली आहे. ग्राहकांना कमीत कमी वेळात बँकांचे व्यवहार पूर्ण होणे अपेक्षित आहे. परिणामकारक अंमलबजावणीकरीता तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे. त्यांना नागरी सहकारी बँका व इतर बँका यांच्या ग्राहक सेवेत फरक जाणवतो. वेळेला महत्त्व न देणे, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या, ग्राहकांबद्दल अनादर, कामाची गती संथ, कामाचा ताण, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव इ. प्रमुख तक्रारी ग्राहकांच्या आहेत.

**शिफारसी :**

नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीसाठी पुढील काही शिफारशी सुचविता येतील.

१. बँकांना दिला जाणारा लेखापरिक्षण दर्जा त्यांच्या उत्तम वित्तीय कामगिरीवर अवलंबून असतो. भारतीय रिझर्व बँकेने सुचविलेल्या CAMELS पध्दतीचे पालन जर यथायोग्य रितीने बँका करू शकल्या तर त्यांचे आर्थिक आरोग्य उत्तम राहिल.

२. बँकांमधील ठेवी वाढविण्यासाठी व सुरक्षित राहण्यासाठी १०० टक्के ठेवींना विम्याचे संरक्षण देणे त्यासाठी विम्या हप्त्याचा दर जरूर तर थोडा वाढविणे. ठेवीदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी त्यांचा प्रतिनिधी संचालक मंडळावर असावा.

३. बँकांच्या कर्ज व ठेवी गुणोत्तरात वाढ होण्यासाठी बँकांनी गुंतवणूकीपेक्षा कर्ज देण्यावर अधिकाधिक लक्ष केंद्रीत करावे. बँकांनी कर्ज

वितरण करताना तारणी कर्जाला व समाजातील दुर्बल घटकांना प्राधान्य द्यावे की जो अन्य बँकांचा ग्राहक नसतो. कर्जवितरणात महिला बचत गटाचांही जरूर विचार व्हावा.

४. नफा वाढविण्यासाठी कर्जवितरणाबरोबर Non Fund Base चा व्यवसाय वाढविला पाहिजे. विविध कमिशन्स, सेवा प्रभार, लॉकरचे भाडे यासोबत अन्य ग्राहकोपयोगी सेवा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

५. बँकांची थकबाकी तसेच एन.पी.ए. यांत वाढ होऊ नय यासाठी सुरक्षित व उत्पादक कर्जांना प्राधान्य द्यावे. दीर्घकालीन कर्जवसूलीसाठी धोरणात्मक नियोजन व नियत्रण प्रणाली राबविली पाहिजे. विशेष वसूली गट स्थापन करून त्यांच्या मार्फत स्वतंत्र यत्रणा राबवावी. दिलेल्या कर्जाच्या परतफेडीचे तिमाही ऐवजी प्रति महिना मूल्यमापन करावे.

६. भांडवल पर्याप्तता प्रमाण राखण्यासाठी बँकांना केवळ सभासदांवर अवलंबून रहावे लागते. तेव्हा प्रत्यक सभासदांच्या भाग विक्रीबाबत संख्यात्मक मर्यादा दूर करणे व सभासदांना भाग खरेदीसाठी प्रोत्साहन देणे.

७. कर्मचाऱ्यांची बँकांची कायक्षमता वाढीसाठी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करावा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ही भविष्यकालीन गुंतवणूक आहे. खर्चाचे विश्लेषण करून त्यातून बँकेला फायदा कसा होईल या दृष्टीने अभ्यास केला पाहिजे.

८. बँकांच्या संचालक मंडळात तज्ज्ञ व्यक्तींची निवड करणे गरजेचे आहे. विविध क्षेत्रातील माहितगार व्यक्तींचा समावेश केल्यास संचालक मंडळ बहुआयामी होईल.

९. दर सहा महिन्यांनी ग्राहक संतुष्टता पाहणी करून त्याचे निष्कर्ष तपासून योग्य ते बदल केले पाहिजे. बँकांनी तक्रार निवारण समिती स्थापन करावी व ग्राहकांच्या मुख्य तक्रारींचे तात्काळ निराकरण करावे. बँकांमधील एकूणच बदल नावीन्यपूर्ण पाहिजेत.

१०. लहान बँकांकरीता भारतीय रिझर्व बँकेने तज्ञांच्या सल्ल्याने या बँकांसाठी स्वतंत्र निकष ठरवावेत. नागरी सहकारी बँकांच्या समस्या अभ्यासण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर एक स्वतंत्र शिखर संस्था असावी. या शिखर संस्थेच्या माध्यमातून नागरी बँकांवर नियत्रण असावे. शिवाय या संस्थेने बँकांच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन व व्यवस्थापन करावे. दुर्बल बँकांचे पुनर्वसन करावे.

११. सार्वजनिक, खासगी आणि परकिय बँकांच्या बँकिंग सेवांपासून जो ग्राहक वंचित आहे त्या ग्राहकांवर लक्ष केंद्रित करावे. बँकांनी पुढील किमान १० वर्षांचा भविष्यवेध घेऊन व्यवस्थापनाची प्रवृत्ती व दिशा आजच ठरविणे अनिवाय आहे.

**सारांश:**

पुणे जिल्हा पातळीवर १९९० ते २०१० या कालावधीतील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचे सिंहावलोकन केल्यास व सांख्यिकीय माहितीच्या आधारे सभासद संख्या, ठेवी, दिलेली कर्जे, भागभांडवल, खेळते भांडवल, नफा-तोटा, सेवक उत्पादकता इ. मध्य लक्षणीय वाढ दिसून यते. मात्र १९९० ते २००० या दशकाच्या तुलनेत २००० ते २०१० या दशकात मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाल्याचे दिसते. १९९० ते २००० या दशकातील बँकांची प्रगती विकासात्मक परंतू स्थिर गतीने झाली आहे. याउलट २००० ते २०१० या दशकात मोठे चढ-उतार दिसून यतात. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण, उदारीकरण, आंतरराष्ट्रीय पातळीवरील आदर्श बँकिंगचे संकेत,

बँकांमधील स्पर्धा, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि व्यवहारात पारदर्शकता या सर्वांचा परिणाम बँकींग क्षेत्रावर झालेला दिसतो. राष्ट्रीय पातळीवरील नागरी सहकारी बँकांमधील ठळक बदलांचा प्रभाव पुणे जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतींवर झालेला दिसून यतो. १९९१-२००० नंतर हे बदल विशेषत्त्वाने लक्षात येतात.

## संदर्भः


1. Lokhande & Deshpande (2005), *'Evolution of Urban Co-operative Banks in Maharashtra'*, Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.
2. *Cooperative Institutions in Pune District- Statistical Information Book- 1987.*
3. *Co-operative Movement at a Glance, Office of the Commissioneer for Co-operation & Registrar of Co-operative Societies, Maharashtra State, Pune, 2001 - 2007.*
4. *Report on Trend and Progress on Banking in India, Reserve Bank of India publication*, 2008-09 - 2009-10.
5. *Statistical Statement relating to Operations of Urban Co-operative Banks in Maharashtra, Maharashtra State Co-operative Banks Association*, Mumbai, 2008-2009.
6. *Urban Co-operative Banks at a Glance, The Maharashtra Urban Co-operative Banks Federation Ltd. Mumbai*, 1988,1989,1990 & 2005.
7. Patil Subhash,' *Financial Performance of Urban Co-opertive Banks in Maharashtra (1991 to 2005)*, ' *Research Link*, May 2007, Issue-38, Vol-VI (3)
8. www. *Census of Maharashtra* 2011

९. *शतकोत्तर सहकार (२००४), लोकायन सहकारी प्रशासन संस्था, सातारा.*

१०. *जिल्हा- सामाजिक व आर्थिक समालोचन, पुणे जिल्हा, २००८-०९, अर्थ व सांख्यिकी संचालनालय*, महाराष्ट्र शासन, मुंबई.

११. *पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. पुणे, वार्षिक अहवाल,* १९८९-९०, १९९४-९५, १९९९-२००० ,२००४-२००५, २००८-०९, २००९-१०.

१२. पाटील सुभाष, *आर्थिक सुधारणा आणि बँकिंग क्षेत्राची कामगिरी*, अर्थसंवाद, जुलै-सप्टेंबर २००७, खंड ३१ अंक २.

१३. *बँकिंग- आशय अभिप्राय, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनची मासिक पत्रिका*, फेब्रुवारी २००५, अंक ९.

# भारतातील जमीन सुधारणा : एक दिशा दर्शन

**राहूल शं. म्होपरे,** कोल्हापूर
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, (निपाणी), ता.कागल,
(आजीव सभासद क्र.११९४)
(भ्रमणध्वनी क्र.९९२३८७९०२०)

**प्रस्तावना:**

कृषि सुधारणेचा एक अतिशय महत्त्वाचा भाग म्हणून जमीन सुधारणेकडे पाहिले जाते. भारतीय अर्थव्यवस्था आजही कृषिप्रधान अर्थव्यवस्था असल्याने व कृषि विकासाची अजुनही भारतात मोठी गरज असल्याने जमीन सुधारणा घडवून आणून कृषि विकास अजून जोमाने करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे जमीन सुधारणेचा अर्थ श्रीमंतांकडील जमीनींचे हस्तांतरण करून तिचे गरीबांमध्ये विभाजन करणे असा घेतला जातो. जमीन विषयक कायद्यांमधील बदल, जमिनीचे नियंत्रण, चाली रूढी यासारख्या घटकांमधील बदलांचा समावेश जमीन सुधारणेमध्ये होतो. थोडक्यात जमीन सुधारणेद्वारे अधिक जमीन असलेल्या लोकांकडील जमिनी सरकारी नियमाने काढून घेऊन जो शेतीमध्ये प्रत्यक्ष काम करतो अशा गरीब शेतकऱ्यांमध्ये व कामकरी वर्गामध्ये या जमिनीचे पुनर्वितरण करणे होय. अशा प्रकारे जमिनीच्या मालकीचे हस्तांतरण श्रीमंत जमीन मालकांच्या जमिनींच्या हस्तांतरणाबरोबरच लहान आकाराच्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे हस्तांतरण करून देखील सदर जमीनीचे रूपांतरण सरकारी सामुदायिक शेतीमध्ये केले जाते. तर गरजेनुरूप काही वेळा सरकारच्या मालकीच्या सामुदायिक शेतीचे पुनर्वितरण लहान आकाराच्या शेतकऱ्यांच्या जमिनींमध्ये केले जाते. अशा प्रकारे विविध मार्गाने जमीन सुधारणा केली जाते. या सर्वांमध्ये असणारे एक सामाइक वैशिष्ट्य म्हणजे ज्या ठिकाणी जमीन सुधारणा करावयाची आहे त्या ठिकाणची जमीन व्यवस्थापनाची प्रस्थापित व्यवस्था बदलून जमीन मालकी व वापरासंदर्भातील नवीन सुधारित व्यवस्था निर्माण करणे होय. जेणेकरून त्या भागातील गरीब शेतकरी, शेतमजूर यांचे कल्याण होईल व शेती विकास घडून येऊन शेती उत्पादनात मोठी वाढ होईल. अशा प्रकारे

जमीन सुधारणेची मूळ संकल्पना असली तरी तिच्या समर्थनार्थ व विरोधी बाजूने मांडण्यात येणारी मते खालील प्रमाणे सांगता येतील.

## जमीन सुधारणेचे समर्थन:

अलीकडील काळात जमीन सुधारणेच्या समर्थनार्थ विविध मते मांडली जातात. त्यामध्ये विकसनशील देशांमध्ये जमीन सुधारणेमुळे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक फायद्यांवर विशेष प्रकाश टाकला जातो. विकसनशील देशांत जमीन सुधारणेद्वारे लागवडी खालील जमीनींचे आकारमान वाढविल्यास त्याद्वारे निश्चितच उत्पादन वाढून अन्न सुरक्षितता निर्माण होईल तसेच दारिद्र्य निर्मूलन होण्यास मदत होईल असा एक विचार मांडला जातो. जमीन सुधारणेमुळे पर्यावरण विषयक फायदे देखील मोठ्या प्रमाणात मिळतात. तसेच जमीन मालकाला आपल्याकडील जमिनीच्या मालकीची सुरक्षितता जमीन सुधारणेमुळे मिळाल्याने तो आपल्या जमिनीत कायम स्वरूपी सोयी सुविधा निर्माण करण्याचे धाडस दाखवून गुंतवणूक वाढ देखील करतो. जमीन सुधारणेच्या समर्थनार्थ मांडण्यात येणारी आणखी एक बाजू म्हणजे यामुळे वादात्मक जमीन कायद्यांमुळे पूर्वापार चालत आलेले संघर्ष मिटविण्यास मदत होते. तसेच समता तत्त्वाचा प्रभावी वापर जमीन सुधारणेमुळे होतो असे सांगितले जाते. अशा प्रकारे जमीन सुधारणेच्या अनुषंगाने जरी काही चांगल्या बाबी मांडल्या जात असल्या तरी याला विरोध करणारा मत प्रवाह देखील आहे.

## जमीन सुधारणेला विरोध:

जमीन सुधारणा ही एक राजकीय प्रक्रिया असल्याचे पूर्वीच्या काही अनुभवांवरून सिध्द होते. त्यामुळे बरेच लोक जमीन सुधारणेला विरोध करताना दिसतात. काहींच्या मते जमीन सुधारणेमध्ये त्यांचा बळी गेलेला आहे. त्यांची जमीन काढून घेण्यात आलेली आहे. तसेच त्यांना आर्थिक व राजकीय शक्ती विरोधात लढा द्यावा लागत आहे. काही संशोधकांच्या मते सुधारणा ही एक तर अपरिणामकारक ठरते किंवा भविष्य कालीन संघर्षाला ती कारणीभूत ठरते. मोठ्या प्रमाणात जमिनीचे पुनर्वितरण केल्यास ती अनुत्पादक ठरते. तसेच ज्यांची जमीन हस्तांतरीत केली आहे त्यांना जमिनीचे योग्य मोबदले दिले जात नाहीत असे टीकाकारांचे मत आहे. याबाबतचे उदाहरण असे सांगितले जाते की, झिंबाब्वे हा देश मोठ्या प्रमाणातील जमीन सुधारणा केलेला असा देश आहे की ज्या ठिकाणी जमिनीच्या पुनर्वितरणाचा परिणाम म्हणून त्या देशाची आर्थिक स्थिती ढासळली. तसेच देशात अन्न असुरक्षितता निर्माण झाली. सरकारने जबरदस्तीने जमीन हस्तांतरण केल्यास जमीन मालक निकृष्ट दर्जाच्या जमिनी हस्तांतरित करण्यास परवानगी देतात. ज्यामुळे अशा जमिनींचे जरी पुनर्वितरण झाले तरी तिची उत्पादकता अत्यल्प असते त्यामुळे जमीन सुधारणेची मुख्य उद्दिष्ट्ये साध्य होत नाहीत असे दिसून येते.

अशा प्रकारे जमीन सुधारणेबाबत जरी परस्पर विरोधी मतप्रवाह असले तरी देखील शेती क्रांतीतील जमीन सुधारणा हा एक मैलाचा दगडच ठरेल असे म्हणावे लागेल. कारण भारतासारख्या शेती आधारित विकसनशील देशात आजही अल्प व सीमांत शेत जमीन असलेले शेतकरी, शेतमजूर मोठ्या प्रमाणात आहेत. जे पूर्वापार जमीनदारांच्या जमिनींवर राबत आहेत. अशा सर्व गरीब लोकांना न्याय द्यायचा असेल तर शास्त्रशुध्द चौकटीत बसवून योग्य मार्गाने जमीन सुधारणा घडवून आणलीच पाहिजे.

## भारतातील जमीन सुधारणाः

कृषिप्रधान भारतीय अर्थव्यवस्थेत जमिनीची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. या बरोबरच जमीन मालकीतील विषमता, ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे मोठे प्रमाण, पारंपरिक शेती लागवडीच्या पध्दती, इत्यादी अडचणींमुळे देखील भारतीय शेती मागासलेली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सुरुवातीच्या दशकात जमीन सुधारणा धोरणाच्या मसुद्याला प्राधान्यक्रम देण्यात आलेला होता. परंतु भारतीय संविधानानुसार जमीन हस्तांतरण आणि जमीन व कूळ सुधारणा हे विषय राज्यांच्या अधिकारात ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे देशातील विविध राज्यात जमीन सुधारणेच्या अंमलबजावणीमध्ये मोठी तफावत पडू लागली. ती आज देखील दिसून येते. भारतात सामाजिक समता व आर्थिक वृध्दी घडवून आणण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्योत्तर काळात जमीन सुधारणेची बांधणी प्रामुख्याने खालील उद्दिष्टांच्या आधारे करण्यात आली होती.

१. मध्यस्थांचे उच्चाटन करणे.
२. कूळ नियंत्रण व व्यवस्थापन करणे.
३. जमीन धारणेवर मर्यादा घालणे.

भारतात जमीन सुधारणेचे पहिले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विशेष लक्ष देण्यात आले होते. त्यानुसार जमीन मालकांनी स्वतः शेती उद्योगाचे नियंत्रण व व्यवस्थापन करावे म्हणून प्रोत्साहन देण्यात आले होते जेणेकरून मध्यस्थांचे उच्चाटन होईल. मध्यस्थांमुळे शेती उत्पादनावर व व्यवस्थापनावर विपरित परिणाम होतो हे लक्षात घेऊन त्या काळात १९४७ आणि १९५४ च्या दरम्यान जमीनदारी पध्दती नष्ट करण्याचे कायदे देखील करण्यात आलेले होते. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीपासून आज पर्यंतचा काळ लक्षात घेतल्यास जमीन सुधारणेचे पहिले उद्दिष्ट आज देखील पूर्णतः साध्य झालेले दिसून येत नाही.

जमीन सुधारणेच्या कुळ नियंत्रण व व्यवस्थापन या दुसऱ्या उद्‌दिष्टाकडे लक्ष दिल्यास असे समजते की, भारतात स्वातंत्र्योत्तर काळात खऱ्या अर्थाने कुळ सुधारणेकडे लक्ष देण्यात आले. विविध कुळ सुधारणा कायद्यांद्वारे त्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे, खंड निश्चितीचे दर ठरविणे, कालमर्यादा ठरवून देणे तसेच कुळांना सुरक्षितता प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न झाल्याचे दिसून येते. कुळांना जमिनीवरील कालमर्यादेसंदर्भात साशंकता असल्याने ते जमीन मालकांप्रमाणे जमिनीत आदानांच्या रूपाने आवश्यक तेवढी गुंतवणूक करत नाहीत. परिणामी उत्पादनावर त्याचा मोठा परिणाम होतो. तसेच अतिरिक्त खंड रक्कम जमीन मालकाला द्यावी लागत असल्याने कुळांचे शोषण होते. ही फार पूर्वीपासून चालत आलेली पध्दती आहे. पी.एस.अप्पू यांनी कुळ सुधारणेसंदर्भातील आयुष्यभर केलेल्या अभ्यासातून असा निष्कर्ष काढला आहे की, ''कुळ सुधारणेसंदर्भातील कोणत्याही कायद्यांचा परिणाम म्हणून जमीनीवरील जमीन मालकीची अनुपस्थिती नष्ट होवून कुळांचे उच्चाटन होवू शकत नाही.''भारतात पश्चिम बंगालमध्ये मात्र कुळ सुधारणा मोठया प्रमाणात यशस्वी झाल्याचे दिसते. याठिकाणी कुळ सुधारणा यशस्वी होण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्या ठिकाणची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती होय. प.बंगाल वगळता भारताच्या इतर राज्यांमध्ये या संदर्भातील राजकीय इच्छाशक्तीचा अभाव असल्याने उर्वरित राज्यांमध्ये कुळ सुधारणा अयशस्वी झाल्याचे चित्र आहे. संपूर्ण भारताचा विचार केल्यास १९९२ पर्यंत १४.४ दशलक्ष एकर क्षेत्राचा मालकी हक्क ११ दशलक्ष कुळांना देण्यात आला होता. जो कुळ

नियंत्रीत जमिनीच्या ४% पेक्षा देखील कमी होता. विशेष म्हणजे या ४% मध्ये भारतातील आसाम, गुजरात, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र आणि प.बंगाल या सात राज्यांच्या कुळ लाभार्थ्यांचा हिस्सा ९७% होता. यावरून भारताच्या उर्वरीत राज्यांत कुळ सुधारणेसंदर्भातील स्थिती किती गंभीर स्वरूपाची आहे हे सहज लक्षात येते.

स्वातंत्र्यानंतर पन्नासच्या दशकाच्या सुरुवातीलाच जमिनीच्या पुनर्वितरणाच्या उद्दिष्टाने संपूर्ण देशात 'भूदान' नावाची चळवळ गांधीवादी नेते विनोबा भावे यांनी सुरू केली होती. जमीन सुधारणेचे कमाल जमीन धारणेवरील मर्यादा घालण्याचे उद्दिष्ट याद्वारे पूर्ण करण्याचाच हा एक प्रयत्न होता असे म्हटले तर चूक ठरणार नाही. या चळवळीचे महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे मोठया जमीन मालकांनी स्वतःच्या इच्छेने आपल्या जमिनीचा काही भाग जमीन नसलेल्या तसेच अल्प जमीन असलेल्या शेतकऱ्यांमध्ये पुर्नवितरीत करण्यासाठी देणे हे होते. तेलंगणा पठार, बिहार व उत्तर प्रदेश याठिकाणी १९५५ च्या दरम्यान ४.३ दशलक्ष एकर जमीन मोठया जमीन मालकांनी स्वखुषीने भूदान चळवळीला दिलेली होती. पुढे या चळवळीने पंजाब व हरियाणा राज्यात देखील जोम धरला होता. ही राज्ये आज अतिरिक्त अन्नधान्य उत्पादीत करून इतर राज्यांच्या अन्न धान्याची गरज भागवत आहेत. असे जरी असले तरी सर्वच स्तरांवर या चळवळीचे स्वागत झाले नाही. त्याकाळातील अर्थशास्त्रज्ञ व्ही.एम.दांडेकर तसेच हनुमंत राव यांनी जमीन कमाल धारणा व कुळ कायदा यावर टिका केली. जमीन कमाल धारणेवर मर्यादा पडून त्याचा परिणाम शेती उत्पादनावर होईल असा देखील विचार मांडण्यात आला. तर काहींनी आधुनिक तंत्रज्ञान हे भांडवल प्रधान असल्याने भारतातील बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी जमीन धारणेवर मर्यादा घालून तिचे पुनर्वितरण केल्यास त्यामध्ये श्रमप्रधान तंत्राच्या वापरास प्राधान्य मिळेल असा विचार मांडला. अनेक मोठया जमिनीच्या मालकांनी आपल्या जमिनी जवळच्या नातेवाईकांच्या नावे करून अप्रत्यक्षरित्या स्वतःच मालक राहणे पसंत केले. अशाप्रकारे जमीन सुधारणेचे तिसरे उद्दिष्ट देखील भारतात साध्य झाल्याचे दिसून येत नाही. एकंदरीत या पार्श्वभूमीवर भारतात जमीन सुधारणेच्या अनुषंगाने पुन्हा नव्याने, जूनीच परंतु शिस्तबध्दरित्या वेगळ्या चौकटीत बसवून सहकारी शेतीची वाट धरल्यास ती जमीन सुधारणेची योग्य दिशा ठरेल असे वाटते.

**जमीन सुधारणेची योग्य दिशा - सहकारी शेती :**

सहकारी शेती ही संकल्पना शेतीमधील सहकारापेक्षा व्यापक व विस्तृत स्वरूपाची आहे. आजही ग्रामीण भागात आपणांस शेतकरी एकमेकांना शेतमालाची खरेदी-विक्री तसेच शेतीसंबंधीत इतर कामांमध्ये मदत करताना दिसून येतात. यालाच शेतीतील सहकार म्हणणे योग्य राहील. परंतु सहकारी शेतीच्या विविध व्याख्या अनेक तज्ज्ञांनी केलेल्या आहेत. डॉ.ओटो शिलर यांच्या मते, "सहकारी शेती म्हणजे अशी शेती की, ज्यामध्ये संयुक्त पध्दतीने लागवड केली जाते." वेगळया शब्दांत, "सहकारांच्या तत्त्वांचा वापर करून शेती लागवड करणे म्हणजे सहकारी शेती होय." दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत नमूद केल्यानुसार, "सहकारी शेती म्हणजे संयुक्त व्यवस्थापनाखाली जमीनीचे एकत्रीकरण करून लागवड करणे होय."

हरितक्रांतीनंतर विशेषतः १९८० नंतर शेती उत्पादन वाढीचा वेग घटत चालल्याचे सर्वांच्या लक्षात आले. वस्तुतः पाणी, संकरीत बियाणे, पतपुरवठा, वीज, किटकनाशके या

संयुक्त व्यवस्थेचा वापर करून देखील शेती उत्पादनात आवश्यक तेवढी वाढ होत नव्हती. दुसऱ्या बाजूस शेती उत्पादनाच्या आदानांच्या किंमती अधिक वाढल्या, उत्पादित मालाच्या किंमती त्या प्रमाणात वाढल्या नाहीत व घटत्या उत्पादकतेने विक्रीयोग्य वाढावा वाढला नाही. अशी परिस्थिती सीमांत, अल्प व मध्यम शेतकऱ्यांच्या बाबतीत झाली. शेती परवडत नाही अशी तक्रार पाचव्या राष्ट्रीय आर्थिक सर्वेक्षणात बहुसंख्य शेतकऱ्यांनी केली. एवढेच नव्हे तर शेतीतून बाहेर पडण्याची तयारी त्यांनी दाखविली. या बाहेर पडणाऱ्या लोकांना शहरी भागात रोजगार मिळेलच याची खात्री नाही. कारण आधुनिक सेवा क्षेत्र व कारखानदारी बौध्दीक कौशल्यावर अधिक चालते. अशा परिस्थितीत रोजगाराच्या शोधात लाखोंच्या संख्येने ग्रामीण लोकसंख्या भटकती राहणे ही एक सामाजिक तणाव निर्माण करणारी घटना ठरेल.

या पार्श्वभूमीवर लोकसंख्येचे मोठे स्थलांतर न घडविता आर्थिक कार्यक्षमतेचे लाभ मिळविण्यासाठी, स्थानिक रोजगार निर्माण करण्यासाठी, शेती उत्पादकता वाढविण्यासाठी, शेती सधन करण्यासाठी जमीन मालकीचा हक्क न गमावता शक्य असणारी पध्दत म्हणून जमीन सुधारणेत सहकारी शेतीचा अवलंब करण्याचा दृष्टिकोन योग्य ठरेल. मोठ्या आकारमानाच्या शेतीची उत्पादकता लहान आकाराच्या शेतीपेक्षा निश्चितच जास्त असते. सहकारी शेतीने शेतीचे आकारमान वाढते. लहान, सीमांत व भूमिहीन शेतक-यांनी जर सहकारी शेती केली नाही तर श्रीमंत शेतकरी व जमीनदार त्यांच्या लहान आकाराच्या जमीनी विकत घेतील. परिणामी लहान शेतकऱ्यांना त्या नाईलाजाने विकाव्या लागतील व त्यामुळे अशा बेरोजगार शेतकऱ्यांचा एक मोठा गट निर्माण होईल. हा धोका टाळण्यासाठी सहकारी शेती आवश्यक आहे. भारतात ७३ व्या घटना दुरूस्तीने ग्रामपंचायत कार्यपध्दती, ग्रामसभा, महिला आरक्षण इ.वर प्रभाव टाकणारे विकासात्मक बदल झालेले आहेत. जे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहकारी शेतीच्या विकासास पूरक आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या १५ ते २० वर्षांच्या काळात महाराष्ट्रात किंबहुना भारतात सहकारी शेती कमी-अधिक प्रमाणात केली जात होती. या काळात सहकारी शेतीवर लिहिले व बोलले गेले. परंतु नंतरच्या काळात या शेतीकडे पूर्णतः दुर्लक्ष झाले. हे दुर्लक्ष एकूण आर्थिक विकासाच्या दृष्टीने व ग्रामीण लोकसंख्येच्या कल्याणाच्या दृष्टीने फार मोठा राजकीय व सामाजिक गुन्हाच मानावा लागेल.

## सहकारी शेती अयशस्वीतेची कारणे :

लहान व सीमांत शेतकरी तसेच भूमीहीन शेतमजूर यांच्या दृष्टिनेच नव्हे तर एकंदरीत सर्वांगीण ग्रामीण विकासाच्या दृष्टिने सहकारी शेती गरजेची आहे. तरीसुध्दा फक्त महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात ती अपयशी ठरली. या अपयशामागे नेमकी कोणकोणती कारणे असू शकतील याबाबत गांभीर्याने विचार व अभ्यास केला असता निदर्शनास आलेली प्रमुख कारणे खालील प्रमाणे :

१. बहुतांशी सहकारी शेती संस्था भूमीहीन व्यक्तींच्या स्थापन केल्या होत्या. ज्यामध्ये आदिवासी, स्थलांतरीत कामगार इ.चा समावेश होता. त्यांना लागवडीचा पूर्वीचा विशेष अनुभव नव्हता. परिणामी या शेतीचे कार्यान्वयन योग्यरित्या झाले नाही.
२. कोणत्याही संस्थेच्या यशस्वीतेसाठी समान विचारांचे सदस्य असणे गरजेचे असते. ज्यामुळे एकत्रित कृती व चांगले व्यवस्थापन शक्य होते. परंतु सहकारी शेतीत भूमीहीन शेतमजूर, सीमांत शेतकरी, गरीब व श्रीमंत

शेतकरी अशा सर्व जाती-धर्माच्या लोकांना सदस्यत्व देण्यात आले. परिणामी विचारातील व कृतीतील मतभेद तसेच उच्च-नीच भाव मनामध्ये निर्माण झाला व सहकारी शेती फोल ठरली.

३. सहकारी शेती संस्थेचा कोणताही सदस्य व्यक्तिगत शेती लागवड करणाऱ्या शेतकऱ्यासारखा वर्तन करू शकत नाही. सदस्याला उत्पादन निवडीपासून ते विक्रीपर्यंत कोणतेही स्वातंत्र्य रहात नाही. संस्थेच्या नियमांना त्याला बांधील रहावे लागते. एवढेच नव्हे तर त्याने इतरांच्या तुलनेत अधिक श्रम केले तरी त्याला सर्वांच्या बरोबरीने व नियमानुसारच मोबदला दिला जातो. सदस्याला स्वतःची जमीन विक्री करता येणेसुध्दा सहज शक्य होत नाही. परिणामी शेतक-यांचे जमिनीवरील प्रेम व स्वातंत्र्याची भावना यामुळेदेखील सहकारी शेतीचा स्वीकार केला गेला नाही.

४. एकाच खेडयात एकापेक्षा जास्त सहकारी शेती संस्था निर्माण झाल्यामुळे देखील अनेक अडचणी निर्माण झाल्या. शेतीसाठी आवश्यक त्या साधन-सुविधांची कमतरता भासू लागली. पिकांचा आकृतिबंध व नियोजन करणे कठीण झाल्याने सहकारी शेती अपयशी ठरली.

५. सहकारी शेतीत ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा हिस्सा मोठा होता, त्या शेतकऱ्यांचे लहान, सीमांत व भूमीहीन शेतकऱ्यांवर वाढत चाललेले वर्चस्व हे देखील सहकारी शेतीच्या अपयशाचे एक कारण होय.

६. सन १९६५ च्या दरम्यान सहकारी शेतीबाबत त्यावेळचे पुणे जिल्हयाचे जिल्हाधिकारी डॉ.शेख यांनी सहकारी शेती संदर्भात पुणे जिल्ह्यासाठी एक आदेश काढला होता. त्यानुसार, सहकारी शेती ही एक वर्षासाठीची भाडे तत्वावरील (lease) शेती आहे. त्यामुळे या शेतीत कोणतीही कायमस्वरूपीची सुधारणा करू नये. एक वर्षाच्या कालावधीनंतर कोणत्याही अटी किंवा मागणीशिवाय ही जमीन एका आठवड्याच्या आत सरकारला परत करावी लागेल. अशा आशयाचा तो आदेश होता. त्यामुळे लोकांना सहकारी शेती सुधारणेसाठीची धडपड किंवा प्रेम राहिले नाही. थोडक्यात शासनाची चूकीची धोरणेदेखील या शेतीच्या अपयशास कारणीभूत आहेत.

७. सहकारी शेतीमध्ये तुलनेने सर्वसाधारण शेतांच्या तुलनेत मोठया प्रमाणात रेकॉर्डची साठवण करावी लागते. अनेक प्रकारच्या नोंदी व थोडीशी गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने लोकांनी या शेतीकडे दुर्लक्ष केल्याचे नाकारता येत नाही.

८. काही ठिकाणी सहकारी शेतीतून मोठया प्रमाणात उत्पादन काढण्यात आले. परंतु त्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ व योग्य बाजारभाव न मिळाल्यामुळे सदस्यांना कमी प्रमाणात उत्पन्न मिळाले. याचादेखील सहकारी शेतीवर नकारात्मक परिणाम झाला.

९. अभ्यासाअंती असे दिसून आले आहे की, व्यक्तिगत शेती करणारा शेतकरी आपल्या शेतात ७२ श्रमदिवस (labour days) व प्रती एकरी १३ बैल दिवस (bullock labour days) श्रम करतो. तर हेच प्रमाण सहकारी शेतीत अनुक्रमे २७ व ४ एवढे कमी आहे. म्हणजेच कामातील चुकारपणामुळे उत्पादन घट होवून सहकारी शेतीत नुकसान झाले.

१०. पडिक जमिनीचे एकत्रिकरण करून सहकारी शेती केली गेली. सदर जमिनीच्या मशागतीसाठी ट्रॅक्टरसारख्या यंत्रांची व भांडवली अवजारांची खरेदी केली गेली. परंतु प्रत्यक्ष लागवडीवेळी पैशाची कमतरता भासल्याने व सरकारच्या मदतीला मर्यादा पडल्याने सहकारी शेतीत नुकसान झाले.

११. संस्थेचे सदस्य झाल्यानंतर आपली जमीन परत मिळणार नाही व सहकारी शेतीचा अपप्रचार या कारणांनीदेखील सहकारी शेती अयशस्वी झाली.

**सहकारी शेती यशस्वीतेसाठी शिफारसी:**

महाराष्ट्रात किंबहूना संपूर्ण भारतात सहकारी शेतीचे पुनरूज्जीवन होणे गरजेचे आहे. ज्यामुळे ऑस्ट्रेलिया, इस्त्राईल यासारख्या देशातील शेतीप्रमाणे मोठया आकाराच्या शेतीचे सर्व लाभ आपल्या देशाला मिळून शेतकऱ्यांसह शेतीचा, ग्रामीण भागाचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास होणे सहज शक्य होईल असे वाटते. सबब जमीन सुधारणेतील मैलाचा दगड ठरविण्यासाठी व सहकारी शेतीच्या पुनरूज्जीवनासाठी प्रामुख्याने खालील शिफारशी कराव्यात असे वाटते.

१. ग्रामीण भागात सहकारी शेती संस्थांची निर्मिती करत असताना भरमसाठ संस्थांना शासनाने मान्यता न देता गावची गरज व भौगोलिक स्थिती लक्षात घेवून मोजक्याच संस्थांना मान्यता द्यावी. विशेषत: 'एक गाव-एक सहकारी शेती संस्था' ही पध्दत अवलंबिल्यास अधिक उत्तम राहील.

२. गावातील सहकारी शेतीमधील पिकाचा आकृतिबंध निश्चित करत असताना किंवा काही महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी सहकारी शेतीसंस्था, ग्रामपंचायत सदस्य व गावातील तज्ञ प्राथमिक शिक्षक यांची समिती नेमून त्याद्वारे निर्णय घेण्यात यावेत.

३. सहकारी शेतीमधून निर्माण झालेली सर्व भांडवली साधन सामग्री गावाच्या सार्वजनिक मालकीची असावी. जेणेकरून अशा संस्थेच्या विसर्जनानंतर ही मालमत्ता सार्वजनिक होवू शकेल.

४. सहकारी शेतीमधील जमीनधारक शेतकरी सदस्यांची जमीन त्यांच्या स्वत:च्या मालकीचीच रहावी याबद्दल स्पष्ट कल्पना सदर शेतकऱ्यांस देवून त्यांचे योग्य ते उद्बोधन करण्यात यावे.

५. सहकारी शेतीतून निर्माण होणारे बाजाराधिक्य सदस्यांना जमीन मालकीच्या प्रमाणात वाटले जावे. परंतु ही बाब करण्यापूर्वी बाजाराधिक्यातील २०% हिस्सा पहिली पाच वर्षे व त्यानंतर १०% हिस्सा कायमस्वरूपी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राखून ठेवण्यात यावा.

६. गरज पडल्यास शासनाने संबंधित सहकारी शेतीची पार्श्वभूमी लक्षात घेवून विशेष स्वरूपाची आर्थिक मदत करावी. तसेच या संस्थांना जिल्हा मध्यवर्ती बँक व इतर बँकांनी अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करण्याचा शासकीय आदेश देण्यात यावा.

७. परदेशातील यशस्वी सहकारी शेतीची सविस्तर माहिती संस्था सदस्यांना देवून, त्याचा प्रसार करावा. प्रसंगी सदस्यांना परदेशात काही अभ्यासदौरे काढण्यास मान्यता द्यावी व या अभ्यासदौऱ्याचा ७५% खर्च शासनामार्फत केला जावा.

८. सहकारी शेती संस्थेची स्थापना करीत असताना साधारणपणे समविचारी व सामाजिक बांधिलकी असणाऱ्या सदस्यांना प्राधान्य देण्यात यावे.

९. सहकारी शेतीमधील कागदपत्रांच्या नोंदी व इतर कार्यालयीन व्यवहाराबाबत सदस्यांना व्यवस्थित कल्पना येईपर्यंत मार्गदर्शन करावे.

अशा प्रकारे जर सहकारी शेती विकासाला शास्त्रशुध्द पध्दतीने गती दिली तर भविष्यात निश्चितच महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या शेती क्षेत्रात एक कायमची व्यवस्था निर्माण होईल. ज्यामुळे गरीब शेतकऱ्यांपासून शेतमजूरांपर्यंत सर्वांचाच लाभ होईल. शेतकऱ्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावेल तसेच ग्रामीण भागात मुलभूत सोयी-सुविधांची वाढ होवून निश्चितच ग्रामीण भागाचा विकास होईल.

*(या लेखासाठी लेखकास परिषदेचे विश्वस्त डॉ.ज.फा.पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.)*

## संदर्भः

१. Bachimanchi Narendra- *Importance of land reforms-* (http://www.indiastudychannel.com/resources/81149-Importance-land-reforms.aspx-Date - 12/08/2011)

२. Chatterjee Patralekha - *Land Reform in India - Necessary but not Sufficient to Fight Poverty* - (http://www.inwent.org/E+Z/zeitschr/de202-8.htm - Date - 12/08/2011)

३. Jha Devangana - *Land Reforms in India* - M Sc. Economics, 2nd Year, Madras School of Economics, (<http://www.google.co.in/search?hl=en&source=hp&q =land reforms in india meta aq 0 aqi g10 aql oq and ref Date-10/08/2011).

४. Kaushik Basu - *Land Reforms in India* - Oxford University Press - (http://econ.lse.ac.uk/staff/mghatak/landref.pdf - Date - 02/08/2011).

५. Mamoria, C.B. (1983), *Agricultural Co-operative Structure in India*, Kitab Mahal, Allahabad.

६. Patil, J.F., & Patil, V.S. (Edi.) (2005), *Problems & Prospects of Co-operative Movement*, Dept. of Commerce & Management, Shivaji University, Kolhapur.

७. Seminar on Co-operative Farming (1959), The Indian Society of Agricultural Economics, Bombay.

८. http://www.naukrihub.com/hr-today/land-reforms.html - Date - 02/08/2011.

९. म्होपरे, राहुल शंकरराव - *'सहकारी शेती-ग्रामीण विकासाची गुरूकिल्ली'* (शोधनिबंध), महाराष्ट्रातील सहकारी अर्थकारण-एक मूल्यमापन व दिग्दर्शन-राज्यस्तरीय गोलमेज परिषद, प्रौढ व निरंतर शिक्षण विस्तारकार्य विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. दि. ८ व ९ मार्च, २०११.

# औष्णीक विद्युत केंद्राचे सामाजिक आर्थिक परीणाम: भुसावळ औष्णीक विद्युत प्रकल्पाचे विशेष अध्ययन

**श्रीराम दे. जोशी**, जळगाव,
मू.जे. महाविद्यालय.
(आजीव सभासद क्र. ४६२)
भ्रमणध्वनी: ९४२१००८७७६

**विनोद झामा मोरे**, यावल
कला वाणिज्य व कॉम्प्युटर ॲप्ली.
महिला महाविद्यालय, डोंगर कठोरे, जि. जळगाव
(आजीव सभासद क्र. १२१३)

---

**प्रास्ताविक:**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था आहे. शेती व्यवसाय भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जातो. शेतीच्या विकासासाठी प्रामुख्याने उर्जा महत्वाची आहे. उपलब्ध स्त्रोतात वीज ही अत्यंत महत्वाचा स्त्रोत आहे कारण विजेशिवाय शेतीच्या उत्पादनात वेगाने वाढ होऊ शकत नाही. कारखानदारी क्षेत्राच्या विकासासाठी देखील वीज हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. त्याचबरोबर मानवाच्या राहणीमान व जीवनमानात वाढ करण्यासाठी वीज हा घटक महत्वाचा आहे. एकंदरीत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत विजेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

भारतात शेतीच्या, कारखानदारी व मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता वीजेचा वापर अत्यंत महत्वाचा आहे. महाराष्ट्र राज्यात विविध कारणांसाठी दररोज १३ हजार ६०० मेगॉवॅट वीजेची मागणी आहे. यापैकी सर्व स्त्रोताच्या माध्यमातून ९,५०० मेगावॅट वीजेचा पुरवठा केला जातो. प्रत्यक्षात महाराष्ट्र राज्याची वीज निर्मितीची स्थापित क्षमता १४,३६९,६०५ मेगावॅट इतकी आहे. ही वीज निर्मिती लहान मोठ्या ३२ जलविद्युत प्रकल्पातून (२४३३ मेगावॅट), ९ औष्णीक विद्युत प्रकल्पातून (७२७७ मेगावॅट) टाटा ट्रॉम्बे येथील प्रकल्प बी.एस.ई.एस. बॉम्बे आणि तारापूर अणु उर्जा प्रकल्पातून एकूण (२०२० मेगावॅट) तर केंद्रीय औष्णीक

विद्युत निर्मिती ग्रीड मधून (२१८५ मेगावॅट) उपलब्ध केली जाते. एकूण स्थापीत क्षमते पैकी औष्णीक विद्युत निर्मिती ग्रीड मधून (२१८५ मेगावॅट) उपलब्ध केली जाते. एकूण स्थापीत क्षमतेपैकी औष्णीक विद्युत प्रकल्पातून ५०.६१% वीज निर्माण होते. तर औष्णीक विद्युत प्रकल्पाच्या स्थापित क्षमतेपैकी दीपनगर येथील प्रकल्पाची ४८२ मेगावॅट (६.३३%)वीज निर्मिती क्षमता आहे. यावरुन या प्रकल्पाचे महत्व लक्षात येते.

खान्देश भूषण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जळगांव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील दीपनगर येथील वीज निर्मिती केंद्राने वीज निर्मितीत उच्चांक प्रस्थापित करुन या भागावर आपली वेगळी मुद्रा उमटविली आहे. प्रगती, विस्तार, रोजगार, शेतीचा विकास असा चौफेर ठसा या प्रकल्पाने उमटविला आहे. दीपनगर हे सूर्यकन्या म्हणून परिचित तापी नदी काठावरील गर्द वनराईत बसले आहेत. आशियायी महामार्ग क्र.४६ ला लागून व भुसावळ शहरापासून ८ कि.मी. वर सुमारे ७२९ हेक्टरमध्ये वीज केंद्र विस्तारले आहे.

केंद्रातील संच क्रमांक १ ची स्थापना १७ जुलै १९६८ मध्ये करण्यात आली आहे. या संचाची स्थापीत क्षमता ६२.५ मेगावॅट (सध्या ५५ मेगावॅट) आहे. संचासाठी १८.८७ कोटी रुपये गुंतवणूक झाली आहे.

केंद्रातील संच क्रमांक २ ची स्थापना ३० ऑगस्ट १९७९ मध्ये झाली आहे. या संचाची स्थापित क्षमता २१० मेगावॅट इतकी आहे. यासाठी ८३.८९ कोटी रुपये गुंतवणूक केली. संच क्रमांक ३ ची स्थापना १८ सप्टेंबर १९८२ मध्ये झाली आहे. याची स्थापित क्षमता २१० मेगावॅट आहे. यासाठी ११०.४४ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली होती. संच १ व संच २ अनुक्रमे ३० व २८ वर्षापासून अविरतपणे वीज निर्मिती करीत आहेत. विस्तारीत नवीन विद्युत प्रकल्पांचे काम प्रगती पथावर आहे. वीज निर्मिती करीता पाणी, कोळसा व वाहतूक हे घटक महत्वाचे आहे. दीपनगर येथे औष्णीक विद्युत केंद्राची स्थापना करण्यामागे हेतू असा की वीज निर्मिती करीता पाणी हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. दीपनगर वीज केंद्रातील पाण्याची गरज तापी नदीवरील हतनूर धरणातून भागविली जाते. वीज निर्मिती महत्वाचा घटक म्हणजे कोळसा वेस्टर्न कोल फिल्डच्या वणी, उमरेड, कुसमुंडा या कोळसा खाणीतून घेतला जातो. भुसावळ हे मध्य रेल्वेचे प्रमुख जंक्शन स्टेशन आहे. मध्य रेल्वेची रेल्वे लाईन दीपनगर जवळून गेल्यामुळे वीज निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या कोळसाची वाहतुक करणे सुलभ आहे.

दीपनगर औष्णीक विद्युत केंद्राच्या स्थापनेमुळे जळगांव जिल्ह्याच्या शेती व कारखानदारी विकासास फार मोठा हातभार लागलेला आहे. या केंद्रामुळे जळगांव जिल्ह्याच्या शेती व कारखानदारी विकासास हातभार लागला असला तरी या केंद्रामुळे आजुबाजूच्या परिसरातील आर्थिक व सामाजिक स्थितीवर निश्चित फार मोठा परिणाम झालेला आहे. म्हणूनच जळगांव जिल्ह्यातील दीपनगर येथील औष्णीक विद्युत केंद्रामुळे आजुबाजुच्या परिसरातील शेतकरी, मजुर व इतर व्यावसायिकांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीत काय बदल झाले यांचे अध्ययन केले आहे.

**उद्दीष्टे :**

१) औष्णीक विद्यूत केंद्रामुळे निर्माण झालेल्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीचे अध्ययन करणे.

२) निर्माण झालेल्या सामाजिक सुविधांचे अध्ययन करणे.

३) भाजीपाला, दुग्ध व्यवसाय, फेरीवाले, इतर व्यवसाय करणारे यांच्या आर्थिक सामाजिक, स्थितीचे अध्ययन करणे.

## संशोधनाची गृहितके :

१) दीपनगर येथील औष्णीक विद्युत केंद्रामुळे पुरक उपक्रमांना चालना मिळून परिसरातील लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली.

२) दीपनगर येथील औष्णीक विद्युत केंद्राच्या स्थापनेमुळे अनुकूल व प्रतिकुल परिणाम झाले.

३) दीपनगर येथील औष्णीक विद्युत केंद्रामुळे झालेल्या प्रदुषणाचे, शेतीची उत्पादकता, आरोग्य, पाण्याच्या गुणवत्तेवर परिणाम झाले.

## संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन दुय्यम माहितीवर आधारलेले आहे. कामगार, शेतकरी, लाभधारक यांची आकडेवारी ग्रामसेवक व तलाठी कार्यालयातून मिळवली आहे. तर पाणी व कोळश्याचा वापर, वीज निर्मिती व याबाबतची आकडेवारी केंद्रातील कार्यालयातून मिळवली आहे.

दीपनगर येथे औष्णीक विद्युत केंद्रातून वीज निर्मिती होण्यासाठी पाणी व कोळसा या घटकाच्या साह्याने वीज निर्मिती होते. पाणी हा घटक वीज निर्मितीसाठी महत्वाचा आहे. जलप्रक्रिया विभागातून वीज निर्मिती करिता पाण्याचा वापर किती केला जातो तो पुढील प्रमाणे

एका दिवसाला ४८,००० क्युबक मीटर पाणी संपूर्ण प्रक्रियेसाठी वापरण्यात येते.

| | |
|---|---|
| इतर कामासाठी पाण्याचा वापर दररोज | १००० ते १५०० (क्युबकमिटर) |
| राख सोबतवाहून नेण्यासाठी दररोज | १८००० ते २१००० (क्युबकमिटर) |
| कुलिंग वॉटरसाठी दररोज | १८००० ते २३००० (क्युबकमिटर) |
| क्षार नसलेले पाणी | ७०० ते १२०० (क्युबकमिटर) |
| घरगुती वापर | २००० (क्युबकमिटर) |
| वापरलेले पाणी परत वापरण्यासाठी उपयोग करणे | ६५०० ते ७००० (क्युबकमिटर) |

अशा प्रकारे विद्युत निर्मितसाठी पाण्याचा वापर केला जातो. कोळसा हा घटक सुध्दा वीज निर्मितीसाठी महत्वाचा आहे. विद्युत निर्मिसाठी दररोज ७००० ते ८००० मेट्रीक टन कोळसा लागतो. २२४ हजार मेट्रीक टन कोळसा दर महिन्यासाठी वापरण्यात येतो.

| | |
|---|---|
| संच क्रमांक १ प्रकल्पासाठी | - २२५ मेट्रीक टन एक तासासाठी कोळसाचा वापर केला जातो. |
| संच क्रमांक २ व ३ प्रकल्पासाठी | - ३६० मेट्रीक टन एक तासासाठी कोळसाचा वापर केला जातो. |
| कोळसाची साठवणूक क्षमता | - १.६५ लाख मेट्रीक टन आहे. |

धुराड्यातून बाहेर पडणाऱ्या राखेचे प्रमाण पुढील प्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ व ३ प्रकल्प | - | (१५० मिलीग्रॅम) साधारण |
| क्रमांक २ प्रकल्प | - | (२४० मिलीग्रॅम) साधारण |

अशा प्रकारे वीज निर्मितीसाठी पाणी व कोळसाचा वापर मोठ्या प्रमाणात करुन वीज निर्मिती केली जाते. भुसावळ येथे औष्णीक विद्युत केंद्रातून निर्माण होणाऱ्या व उत्पादित विजेचा उपयोग ग्रीड पध्दतीने जिल्ह्यात व इतरत्र केला जातो. जिल्ह्यातील १५०६ खेडी व शहरांना वीज पुरवठा केला जातो. एकूण विजेच्या वापरापैकी १२.६१ % उद्योगासाठी ६५.३१ % कृषीसाठी, १०.४५% घरगुती वापरासाठी, १.९७% वाणिज्य उपक्रमासाठी, १.१० % सार्वजनिक दिवाबत्तीसाठी वापरण्यात येते तर ९.५४% वीज इतर उपयोगसाठी वापरली जाते.

दीपनगर औष्णीक विद्युत केंद्रासाठी उपयोगात आणलेली जमीन पुढील प्रमाणे संपादित केली. खाजगी जमीन-४२१ हेक्टर, सरकारी जमीन-१०८ हेक्टर, जंगल जमीन - २०० हेक्टर, एकूण जमिनीपैकी - ४९३.११ हेक्टर जमीन विद्युत केंद्रासाठी वापरण्यात आली. ९१.०० हेक्टर जमीन वसाहतीसाठी १९९.५७ हेक्टर जमीन राखेच्या विल्हेवाटी करीता उपयोगात आणली जाते.

औष्णीक विद्युत केंद्रात कायम स्वरुपी - ११३६ कामगार कार्यरत आहे. ठेकेदार पध्दतीवर-११०० कामगार कार्यरत आहे. राख उद्योगावर जवळ-जवळ ८००-९०० कामगार काम करीत आहे. दीपनगर वसाहतीमध्ये व वसाहती बाहेर अनेक लहान-मोठे व्यवसाय आहे. या व्यवसायांची संख्या पुढील प्रमाणे -

**वसाहती बाहेरील व्यवसाय -**

१) पान टपरी -०७,
२) हॉटेल - ०४,
३) जनरल स्टोअर्स् - ०५,
४) बेकरी सेंटर - ०३,
५) गादी भंडार - ०२,
६) दवाखाना - ०५,
७) मेडिकल - ०२,
८) गॅरेज - ०२,
९) हेअर आर्ट -०६,
१०)टेलर्स् दुकान - ०५,
११) घड्याळ दुरुस्ती दुकान - ०२,
१२) टायर्स् सेंटर - ०३,
१३) इलेक्ट्रीक दुकान - ०२,
१४)सायकल व मोटार सायकल दुरुस्ती- ०२,
१५) रेडीमेड कापड दुकान - ०३,
१६) फोटो स्टुडिओ - ०३,
१७)किराणा दुकान - ०२,
१८) बुट पॉलीश दुरूस्ती दुकान - ०२,
१९) स्क्रिन व प्रिंटींग प्रेस - ०२,
२०) फर्निचर दुकान - ०२,
२१) मटन दुकान -०३,
२२) चिकन दुकान - ०३,
२३) मच्छी (मासे) दुकान - ०२,
२४) भाजीपाल्याचे दुकान - ३५,
२५) दारु दुकान - ०१,
इ. विविध प्रकारचे व्यवसाय करतांना दिसतात

**वसाहती मधील व्यवसाय -**

१) पान टपरी -०४,
२) किराणा दुकान - ०४,
३) हॉटेल - ०१,
४) सायकल दुरुस्ती दुकान - ०२,
५) बुट पॉलीश दुरुस्ती दुकान - ०२,
६) बॅन्जो पार्टी - ०१,
७) लॉन्ड्री दुकान - ०३,
८) जनरल स्टोअर्स - ०४,
९) फर्निचर दुकान-०१,
१०)बेकरी दुकान - ०१,

११) भोजनालय - ०२,
१२) दुध डेअरी- ०४,
१३) पिठ गिरणी- ०३,
१४) भाजीपाला दुकान - ०४,
१५) हेअर कटींग दुकान - ०४,
१६) फोटो स्टुडिओ - ०१,
१७)इलेक्ट्रीक दुकान - ०१,
१८) ब्युटी पार्लर सेंटर - १०,

इ. प्रकारचे व्यवसाय करतांना दिसून येतात.

वसाहती मधील व्यवसातून ८० व्यक्तींना तर वसाहती बाहेरील व्यवसायातून १८० व्यक्तींना रोजगार मिळाला. अशा प्रकारे वसाहतीमधील व बाहेरील व्यवसायातून एकूण २६० व्यक्तींना रोजगार मिळालेला आहे.

पीकरचनेचा अभ्यास करीत असताना तलाठी कार्यालयातून माहिती मिळविली यातून असे स्पष्ट झाले की, या भागात पीक रचनेत फारसा बदल झाला नाही फक्त भाजीपाल्याच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते.

दीपनगर औष्णीक विद्युत केंद्रातील वसाहतीत शैक्षणिक संकुलात एकूण १८५१ विद्यार्थी शिकत आहेत. या विद्यालयात एकूण ७४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहे.

दीपनगर औष्णीक विद्युत केंद्रातील व त्यांच्या कुटूंबासाठी आरोग्याच्या सुविधा उपलब्ध केली आहे. या आरोग्य केंद्रात औ.वि. केंद्रातील कर्मचाऱ्यांना आरोग्याच्या सुविधा दिल्या जातात व त्याच्या कुटूंबाच्या सदस्यांना सुध्दा आरोग्याच्या सुविधांचा लाभ मिळतो.

दीपनगर येथे औष्णीक विद्युत केंद्राच्या माध्यमातून वीज निर्माण होते. परंतु त्याच बरोबर मोठ्या प्रमाणात राख निर्माण होते. ही राख बाहेर सोडली जाते. या राखेचा विविध क्षेत्रामध्ये चांगल्या तऱ्हेने उपयोग केला जातो. जसे सिमेंट तयार करण्यासाठी, विटा बनविण्यासाठी, रोड बनविणे, खाणी बुजविणे व शेती क्षेत्रासाठी राखेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असतांना दिसून येतो. या राखेच्या गुणधर्मानुसार सर्वात जास्त उपयोग होऊ शकणाऱ्या शेती सारख्या क्षेत्रामध्ये उपयोग करण्याच्या दृष्टीने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील शास्त्रज्ञांनी यावर संशोधन केले आहे. फ्लाय ॲश (राख) मध्ये क्वॉर्टझ, मॅग्रेटाईट हॅमेटाईट आणि अनेक खनिजे असतात. ८५% पेक्षा जास्त फ्लाय ॲश (राख) ही सिलीकॉन, अल्युमिनीयम, लोह आणि कॅल्शीयम सारख्या अन्नद्रव्यांनी तयार झालेली असते. फ्लाय ॲश (राख) ही कोळशापासून तयार झालेली असल्यामुळे सामान्यपणे वनस्पतीमध्ये असणारे मुळ घटक हे ऑक्साईडच्या रुपात ॲश मध्ये आढळतात.

कृषी विद्यापीठाने केलेल्या संशोधनानुसार सामान्यतः एकरी २० टन किंवा हेक्टरी ५० टन फ्लाय ॲश (राख) वापरता येते. वरीलप्रमाणे सामान्यपणे सर्वच पिकाला व विविध शेतजमिनींना वापरता येते. रब्बी व खरीप हंगामाआधी वरील राख शेतात मिसळून घ्यावी फ्लाय ॲश (राख) चा वापर इतर सर्वच खतासोबत करता येतो. जमिनीचा एकंदरीत पोत सुधारतो. एकदा राख टाकली की साधारणपणे पुढील ५ वर्षाकरीता राखेचा प्रभाव टिकून राहतो व जमिनीला पुनः जीवन प्राप्त होते. अशा प्रकारे औष्णीक विद्युत केंद्रातून वीज निर्मिती तर होते परंतू या केंद्रातून जी राख बाहेर सोडली जाते त्या राखेचा वापर शेतीत केल्यास शेती उत्पादनात वाढ झालेली दिसून येते.

औष्णीक केंद्रामुळे आजुबाजुच्या गावावर जो काही परीणाम झालेला आहे. त्या गावातील

ग्रामस्थ व शेतकरी यांना प्रत्यक्ष भेटून माहिती संकलीत केली. या केंद्रामुळे आजुबाजुच्या परिसरातील ज्या लोकांची जमीन या केंद्रात दिली आहे, त्यांना या केंद्रात कायस्वरुपी नोकरी लागली व काही लोकांना ठेकेदारीत सुध्दा रोजगार मिळालेला आहे. गावातील इतर लोकांना या केंद्रात व केंद्राबाहेर रोजगार मिळालेला दिसतो. ५० ट्रॅक्टरच्या सहाय्याने केंद्रातील राख बाहेर काढली जाते व ही राख २० ते २५ ट्रकच्या माध्यमातून बाहेरगावी विट भट्टींना दिली जाते. तसेच केंद्रातून ३५ टँकरच्या माध्यमातून सिमेंट फॅक्टरीला देखील राख दिली जाते. या राख वाहतुकीवर व विट भट्ट्यांवर अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. यात जवळपास ९०० लोकांना रोजगार मिळालेला दिसतो. यात आजुबाजूच्या गावातील व परराज्यातील पुरुष व स्त्रियांना रोजगार मिळालेला दिसतो. शेतकऱ्यांच्या संदर्भात विचार केल्यास शेती उत्पादनात वाढ झालेली दिसते. भाजीपाल्याच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. अन्नधान्याच्या उत्पादनातसुध्दा वाढ झालेली दिसते. तीन गावातील शेतीची पाहणी केली असता प्रामुख्याने असे दिसून आले की परंपरागत पिकांकडून भाजीपाला व फळे याकडे शेतकरी वळतांना दिसून येतात. त्यामागील प्रमुख कारण म्हणजे औष्णीक विद्युत केंद्रामुळे उपलब्ध झालेली शाश्वत बाजारपेठ होय. या विवेचनावरुन औष्णीक विद्युत केंद्राच्या संदर्भात अनुकूल विचार प्रवाह दिसून येतो.

औष्णीक विद्युत केंद्रामुळे गावातील पिण्याच्या पाण्यावर दुष्परिणाम झालेले दिसतात. तसेच प्रदुषणात वाढ झालेली दिसून येते. आजुबाजुच्या परिसरात औष्णीक केंद्रामुळे तापमानात वाढ झालेली दिसून येते. शेती क्षेत्राचा अभ्यास केल्यास शेतातील पिकांवर कोरडी राख उडत असल्यामुळे पिकांवर वाईट परिणाम होतात. शेतकऱ्यांना शेतमजुर मिळत नाही. म्हणजे शेतमजूरांचा तुटवडा निर्माण झालेला दिसून येतो. शेतात राखेचा वापर केल्यामुळे उत्पादनात वाढ झालेली दिसून येत नाही. या केंद्रामुळे कोणताही फायदा झालेला नाही असे अनेकांनी आपले मत मांडलेले दिसते.

## संशोधन निष्कर्ष :

१) कायमस्वरुपी कामगार - औष्णीक विद्युत केंद्रात आजुबाजुच्या गावातील ११३६ लोकांना कायम स्वरुपी नोकरी मिळाली.

२) ठेकेदार कामगार - औष्णीक विद्युत केंद्रामुळे आजुबाजुच्या गावातील ११०० लोकांना ठेकेदारीत वा वेगवेगळ्या कंपनीत रोजगार मिळाला.

३) शेतकरी - औष्णीक विद्युत केंद्रामुळे आजुबाजुच्या परिसरातील शेतकरी भाजीपाल्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेत आहेत व त्यापासून त्यांना चांगल्या प्रकारे उत्पन्न मिळत आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते.

४) राखेवरील मजूर - औष्णीक विद्युत केंद्रातून जी राख बाहेर पडते त्या राखेवर ९०० लोकांना रोजगार उपलब्ध झाला. तसेच राख वाहतुकीमुळे सुध्दा अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. तसेच वीटभट्टीव्यवसायाला मोठ्या प्रमाणात चालना मिळून रोजगार निर्मिती झाली आहे.

५) व्यावसायिक - औष्णीक विद्युत केंद्रामुळे जे अनेक लहान - मोठे उद्योग व व्यवसाय निर्माण झाले व त्यात २६० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

**संदर्भ :**

१) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ दैनंदिनी
२) *जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन* जळगांव जिल्हा
३) *संशोधन पध्दती शास्त्रे व तंत्र* - प्रा. प्रदिप आगलावे.
४) *प्रात्यक्षित सामाजिक संशोधन* - प्रा. सुरेश मेश्राम.
५) *दिपनगर औष्णीक विद्युत केंद्राच्या जलप्रक्रिया विभाग*
६) *दिपनगर औष्णीक विद्युत केंद्राचा कोळसा पर्यावरण विभाग*
७) फ्लाय ॲश (राख) शेतीसाठी वरदान या विषयावर फ्लाय ॲश युटिलायझेशन प्रकल्प कृषी रसायनशास्त्र व मृद विज्ञान विभाग डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला यांचे पत्रक घडी पत्रिका - पदेकृषि/३२४, डिसेंबर २००५,
८) लोकमत - वर्तमानपत्र.

National Research Journal

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

**अर्थसंवाद**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ: ।

जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल(B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| २) मागील(आतील) पृष्ठ | रु.४,०००/- | रु.११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु.५,०००/- | रु.१५,०००/- |

आपल्या जाहिरातीचा मजकूर-डिझाईन (1/5=150X210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिध्द होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

डॉ. अनिल सूर्यवंशी,
कार्यवाह खजिनदार
गोदाई,
शिवशक्ती मैदानाजवळ,
शिवाजीनगर, बार्शी-४१३ ४११,
जिल्हा-सोलापूर,
दूरध्वनी:(०२१८४) २२४२९४
मो.९०११३३९९०६

डॉ.अविनाश निकम
प्रमुख संपादक
मातृपितृ कृपा,प्लॉट नं.३०,
परिमल कॉलनी,
यशवंत क्लासेसच्या मागे,
शहादा-४२५४०९,
जिल्हा नंदुरबार,
मो.९८२२६६५१४१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीतून श्रमिक-कल्याण

**एस.एस. नाईक**, अमरावती
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था.
(आजीव सभासद क्र. ८३८)
भ्रमणध्वनी: ९४२३६२१६६५

---

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव जगातील काही विद्वानांपैकी एक आहे. ते फक्त एक व्यक्ती नाही तर एक विचारप्रवाह आहे. समतेचा, स्वातंत्र्याचा आणि बंधुतेच्या विचारांवर मार्गक्रमण करणाऱ्या लोकांनी आज यशाची शिखरे गाठलेली आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मजुरांचे कल्याण :**

कामगार नेता, मजुर मंत्री आणि स्वतंत्र मजुर पक्षाचा संस्थापक या भूमिकांमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी, कामगार व मजुरांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**कामगार नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य:**

कामगार नेता म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपली भूमिका पार पाडली. शेतकऱ्यांचे हित साध्य करण्यासाठी मुंबई विधिमंडळात एक विधेयक मांडले. शेतजमीन कसणाऱ्या कुळांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या हेतूने प्रांतिक विधिमंडळात अशा तऱ्हेचे विधेयक मांडणारे डॉ. बाबासाहेब पहिलेच सदस्य होते. खोती नष्ट होऊन कुळांना जमिनीचे स्वामित्व मिळावे हा त्यांच्या विधेयकाचा मुख्य हेतू होता. परंतु राज्यकर्त्यांनी हे विधेयक मंजूर होऊ दिले नाही. त्यानंतर त्यांनी महार वतन विधेयक सुद्धा मांडले. परंतु ते ही शेवटपर्यंत संमत झाले नाही.

डॉ. बाबासाहेबांचा कम्युनिष्ट कामगार चळवळीला विरोध होता. कारण कम्युनिस्ट हे आपले राजकीय ध्येय साध्य करण्यासाठी कामगारांचा केवळ वापर करतात. त्यामुळे कामगारांचे हित साध्य होत नाही असे बाबासाहेबांचे मत होते. त्यांनी कॉंग्रेस पक्षाला सुद्धा समाजवादाच्या बुरख्याखाली भांडवलशाहीला खतपाणी घालणारा पक्ष ठरविले होते. कारण

काँग्रेस पक्ष वर वर जरी समाजवादाच्या गोष्टी करीत असला तरी या पक्षात धनिकांचा जास्त भरणा असल्यामुळे कामगार व श्रमिकांनी आपल्या कल्याणासाठी काँग्रेस पक्षावर अवलंबून राहणे मुर्खपणाचे होईल असे ते मानत. त्यांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. कारण त्यांना कामगार, शेतकरी व मजुरांना न्याय मिळवून द्यायचा होता व एक सक्षम राजकीय पर्याय म्हणून हा पक्ष बळकट करायचा होता.

शेतकऱ्यांची गाऱ्हाणी सरकारच्या समोर मांडण्यासाठी त्यांनी एक मोर्चा काढला होता. डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटले व त्यावेळी त्यांनी एक निवेदन मुख्यमंत्र्यांना दिले त्या निवेदनामध्ये शेतावर काम करणाऱ्या मजुरांचे किमान वेतन ठरविणे, महसुल करात ज्याप्रमाणे सुट देण्यात येते त्याप्रमाणे थकलेल्या भाड्याच्या पैशात सुट द्यावी. मालकांना भरपाई देऊन, इनामदारी आणि खोती या पद्धती नष्ट करण्याबाबत ताबडतोब कायदा करावा, सामाजिक दृष्ट्या जुलमी व आर्थिक दृष्ट्या कुचकामी ठरलेली जमिनदारी पद्धत संपुष्टात आणली पाहिजे, लहान शेतकऱ्यांना कालव्याच्या पाण्याचे दर निम्मे करावेत, इत्यादी मागण्यांचा समावेश होता. त्यावेळी शेतकरी, कामगार, मजुरांना उद्देशून भाषण करतांना त्यांनी आवाहन केले की, शेतकरी, कामगार, मजुर यांनी आपल्या दैन्याची कारणे कोणती याचा शोध घेतला पाहिजे. त्यांना असे आढळून येईल की, त्यांच्या दैन्याची कारणे त्यांची पिळवणूक करणाऱ्या श्रीमंतीत आहे. त्यामुळे त्यांनी निरपेक्ष बुद्धीने मजुरांची एक आघाडी निर्माण करावी.

शेतकऱ्यांप्रमाणे रेल्वे कामगारांचेही संघटन करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेबांनी केलेले आहे. १९३८ ला मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगारांची एक मोठी परिषद भरली होती. वीस हजार कामगार या परिषदेला हजर होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी भाषण करतांना रेल्वे कामगारांना उपदेश केला की, त्यांनी स्पृश्यास्पृश्य असा भेदभाव करु नये, कामगारांचा खरा शत्रु भांडवलशाही आहे. त्यामुळे कामगारांनी आपापसातील हेवेदावे विसरून आपली एकजुट करावी. डॉ. आंबेडकरांच्या मते जोपर्यंत संघटनेच्या दृष्टीने एकजुटीला अपायकारक असलेला अन्याय आणि पक्षपात दूर होत नाही तोपर्यंत कामगारांमध्ये एकजुट निर्माण होऊ शकत नाही. ते पुढे म्हणतात की हिन्दुस्थानातील कामगार संघटना वाईट स्थितीत आहे. ते तुंबलेले घाणेरडे डबके आहे कारण कामगार संघटनेचे नेतृत्व भित्रे, स्वार्थी व चूकीच्या मार्गाने जाणारे आहे. कामगार संघटनांचे आपापसातील तंटे इतके भयानक होते की, प्रत्यक्ष कामगार व भांडवलदार यांच्यामध्ये सुद्धा तेवढे भयानक भांडण नव्हते असे आंबेडकरांचे मत होते.

१९३८ ला मुंबई विधीमंडळात औद्योगिक कलहाचे विधेयक चर्चेसाठी मांडले गेले. त्याला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कडाडून विरोध केला. या विधेयकानुसार विशिष्ट परिस्थितीत संप करणे बेकायदेशीर ठरविले गेले होते. हे विधेयक कामगारांच्या संप करण्याच्या हक्काला बाधा आणत होते. परंतु मालकांना मात्र आपला अर्थसंकल्प उधार करण्यास भाग पाडत नाही आणि पोलीस दलाचा उपयोग कामगारांविरुद्ध करण्याची मुभा मागते असा निष्कर्ष डॉ. बाबासाहेबांनी काढला होता.

बाबासाहेबांचे असे मत होते की, संप करणे हा दिवाणी अपराध आहे. फौजदारी गुन्हा नव्हे त्यामुळे या विधेयकाला बाबासाहेबांनी कामगारांच्या नागरी स्वातंत्र्याच्या गळचेपीचा कायदा असे संबोधले व तो कायदा बेकायदेशीर ठरविला. परंतु तरीही मुंबई विधीमंडळाने ते विधेयक मंजुर केलेच. या अन्यायकारक कायद्याचा विरोध करण्यासाठी डॉ. बाबासाहेब यांनी स्वतंत्र मजुर पक्ष, कम्युनिस्ट पक्ष, गिरणी कामगार संघटना इत्यादी साठ संघटनांच्या सहकार्याने संप पुकारला. त्यानंतरच्या काळात प्रथम श्रेणीचे कामगार नेते म्हणून आंबेडकरांची किर्ती पसरली होती.

## मजुरमंत्री म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार कल्याणासाठी नेहमी झटत होते. १९४३ मध्ये डॉ. आंबेडकर मजुरमंत्री असतांना कामगार, मालक आणि सरकार यांचे प्रतिनिधी असलेल्या एका संयुक्त स्थायी समितीची बैठक मुंबईतील सचिवालयात घेण्यात आली होती. डॉ. आंबेडकर त्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीत युद्ध साहित्याचे काम करीत असलेल्या कारखान्यात एक संयुक्त कामगार नियामक समिती नेमावी आणि सेवायोजन कार्यालयाची स्थापना करावी असे दोन मुद्दे चर्चेसाठी होते. अशा तऱ्हेच्या समित्या संयुक्त अमेरिकेच्या संस्थानामध्ये आणि ब्रिटनमध्ये होत्या. तसेच कामगारांच्या हिताच्या दृष्टीने सेवायोजना कार्यालयाची आवश्यकता होती. त्याकाळी जे अनुभवी व अर्धशिक्षित तंत्रज्ञ निरनिराळ्या योजनांमधून तयार होत होते त्यांना भटकायला लागू नये. त्यांना नोकरी मिळविण्याचे मार्ग मोकळे असले पाहिजे. हा सेवायोजन कार्यालय स्थापण्यामागचा उद्देश होता. याच काळात 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या संघटनेच्या एका समारंभात मजुरमंत्री म्हणून भाषण करतांना कामगार चळवळीत असलेल्या दुहीबद्दल बाबासाहेबांनी आपली नापसंती व्यक्त केली होती आणि त्यामुळे कामगार चळवळ ही पोकळ आणि उथळ झालेली आहे. असे मत बाबासाहेबांनी व्यक्त केले होते. कामगार नेत्यांनी कामगार चळवळीतील दोष निवारण्यासाठी प्रयत्न करण्याचे आव्हान डॉ. बाबासाहेबांनी त्यावेळी केले होते.

त्रिपक्ष कामगार परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात मजुरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अध्यक्ष म्हणून भाषण करतांना अन्न, कापड, निवारा, शिक्षण, सांस्कृतिक साधने, आरोग्याची साधने याविषयी कामगारांच्या मागण्या मांडल्या होत्या. एका ठरावान्वये कामगारांचा पगार आणि उत्पन्न याविषयी संशोधन करण्याच्या आणि कामगारांना सामाजिक संरक्षण मिळवून देण्याच्या दृष्टीने माहिती गोळा केली जावी असे ठरले होते. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने आंबेडकरांनी आणखी एक सुधारणा केली होती. त्यांनी मध्यवर्ती विधीमंडळात एक विधेयक संमत करुन घेतले. त्या विधेयकात कारखान्यातील बारामाही कामगारांना भरपगारी रजा द्यावी असे एक कलम होते.

मुंबईच्या टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स या संस्थेच्या विद्यार्थी संघापुढे भाषण करतांना डॉ. आंबेडकरांनी मत मांडले होते की, सक्तीची तडजोड आणि लवाद हे कामगारांना अत्यंत हितावह आहे. मी हे तत्व कामगारांच्या

न्यायपद्धतीत कायम स्वरुपाचे करील अशी मला आशा आहे. असे आश्वासन उपस्थित लोकांना दिले होते. याच कालावधीत कामगार स्थायी समितीची बैठक नवी दिल्ली येथे झाली होती. अध्यक्ष डॉ. आंबेडकरांनी त्यावेळी औद्योगिक क्षेत्रातील कामगारांसाठी घरे बांधण्यासंबंधीची मालकांची जबाबदारी आणि भरपगारी रजा या विषयीच्या नियमांवर चर्चा केली होती.

दिल्ली येथे भरलेल्या सातव्या हिन्दी कामगार परिषदेमध्ये अध्यक्ष म्हणून भाषण करतांना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, कामगार धनिक वर्गाला एक महत्वाचा प्रश्न विचारू शकतात, तो म्हणजे हा की, जर युद्धाच्या खर्चासाठी मालक वर्ग कर देण्यास नकार देत नाही तर कामगारांच्या जीवनाचा दर्जा वाढविण्यासाठी जो निधी उभारावयाचा आहे त्याला तुम्ही विरोध का करता ? जो खर्च युद्धावर झाला आहे तो लोककल्याणासाठी खर्च झाला असता, तर त्यातून कितीतरी लोकांचे शिक्षण झाले असते आणि कितीतरी रोगी बरे झाले असते.

औद्योगिक शांतता प्रस्थापित करण्याच्या शक्यतेविषयी डॉ. आंबेडकरांनी आपले मत मांडले होते की, सत्तेच्या बळावर औद्योगिक शांतता प्रस्थापित करणे शक्य नाही. कायद्याच्या बळावर ती शक्य आहे. परंतू खात्री देता येत नाही. ती सामाजिक न्यायनितीच्या बळावर करता येणे शक्य आहे आणि ही सूचना आशादायक वाटते. परंतू त्यात तिन बाजू गुंतलेल्या आहेत. पहिली म्हणजे स्वत: कामगारांनीच आपले काम करण्याचे कर्तव्य ओळखले पाहिजे. म्हणजेच त्यांनी कामचुकारपणाची वृत्ती टाकून दिली पाहिजे. दोन मालकाने कामगारांना योग्य ते वेतन देणे याचाच अर्थ पिळवणूक थांबविणे आणि मालकांनी कामगारांना काम करण्यास सुखावह परिस्थिती निर्माण करणे, म्हणजेच कामगार कल्याण साधने आणि तिसरी गोष्ट म्हणजे सरकार आणि समाज ह्यांनी औद्योगिक संबंध सलोख्याचे राहावे यासाठी झटले पाहिजे. हे सार्वजनिक काम आहे हे केवळ मालक आणि कामगार ह्यामधील केवळ करार नाही हे ओळखता आले पाहिजे. असे मत आंबेडकरांनी त्यावेळी व्यक्त केले होते.

अशा प्रकारचे विचार मांडून व प्रत्यक्ष कृती करुन डॉ. आंबेडकरांनी मजुरमंत्री म्हणून मजूरांचे कल्याण साधण्याचा वेळोवेळी प्रयत्न केलेला होता.

**स्वतंत्र मजूर पक्ष आणि डॉ.आंबेडकरांचेकार्य:** दलित आणि शोषीतांच्या समावेशक एकजुटीशिवाय तरणोपाय नाही असे बाबासाहेबांना वाटत होते. म्हणून त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. अस्पृश्यता निवारण्यासारखा एखादा प्रश्न सोडल्यास इतर सर्व हितसंबंधावर सर्वच श्रमिकांची एकजुट होऊ शकते. अस्पृश्यते विरुद्धचा लढा अस्पृश्यांना स्वतंत्रपणे लढावा लागेल. पण आर्थिक न्यायाचा लढा मात्र त्यांना शेतकरी–कामगार वर्गाच्या सहकार्याशिवाय मुळीच यशस्वी करता येणार नाही. अस्पृश्य व अस्पृश्येतर शोषीत श्रमिकांचा हा लढा प्रभावीपणे चालविण्याची क्षमता कोणत्याही तत्कालीन राजकीय पक्षात नसल्यामुळे या वर्गाचा नवा पक्ष निर्माण करणे हाच एक मार्ग डॉ. आंबेडकरांना दिसत होता.

कॉंग्रेस पक्षाकडून श्रमिक कष्टकरी वर्गाला न्याय मिळण्याची शक्यता मुळीच नाही असे आंबेडकरांचे मत होते. कारण कॉंग्रेस पक्ष शेवटी

भांडवलदारांचाच होता. काँग्रेसचा साम्राज्यशाही विरोधही वरवरचा असून पुढे काँग्रेसच्या हातात सत्ता आली तर ती देशीविदेशी भांडवलदार आणि स्वार्थी हितसंबंधी यांच्याच सोयीने वापरणार. समाजवादाची भाषा काँग्रेस नेते करीत असले तरी शेतकरी कामगार वर्गाच्या हिताला त्यांनी कधीच तिलांजली दिलेली नाही असे आंबेडकर म्हणत. समाजवादी पक्षाबद्दल आंबेडकरांचे काही गंभीर आक्षेप होते. एकतर काँग्रेससारखया भांडवलदारी विचारांच्या पक्षासोबत राहून त्याला समाजवादी कार्यक्रम स्विकारणे आपण भाग पाडू, हा समाजवादी मंडळींचा आशावाद डॉ. आंबेडकरांना अनाठायी वाटत होता. तसेच समाजवादी पुढाऱ्यांना डॉ. आंबेडकर मार्क्सवादाचे पढीकपंडीत म्हणत कारण, आर्थिक प्रश्नांवरच लक्ष केंद्रित करुन सामाजिक विषमतेच्या प्रश्नाकडे ते सर्वस्वी दुर्लक्ष करतात. मार्क्सचा 'पाया-इमारत सिद्धांत' ते फारच शब्दश: खरा मानून चालतात, केवळ वर्गीय परिभाषेत ते भारतीय समाजवास्तव पाहत असल्यामुळे त्यांना त्याचे यथार्थ आकलन होऊ शकत नाही असे समाजवाद्यांविषयी डॉ. आंबेडकरांचे काही आक्षेप होते. त्यामुळे त्यांच्याशी सहकार्य करुन श्रमिकांचे हित साधण्याची शक्यता त्यांना दिसत नव्हती. त्यामुळे त्यांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली होती. अन्य राजकीय पक्षांपेक्षा वेगळा आणि प्रत्येक प्रश्नाकडे त्याच्या गुणवत्तेच्या आधारे भूमिका घेणारा या अर्थाने हा पक्ष स्वतंत्र होता. जाती, धर्म, प्रदेश इत्यादी भेदांना बाजूला सारून वर्गभावनेच्या आधारे सर्व स्पृश्यास्पृश्य, शेतकरी, कष्टकरी, श्रमजीवींची एकजूट करणारा पक्ष या दृष्टीने 'मजूर' या शब्दाची व त्याच्या नावाची योजना करण्यात आली होती. बहिष्कृत, डिप्रेस्ड क्लासेस इत्यादी संज्ञापेक्षा मजुर ही संज्ञा व्यापक होती. स्वतंत्र मजुर पक्षाच्या आर्थिक धोरणात पुढील बारा बाबींचा अंतर्भाव होता.

१) शेतीची प्रगती होऊन तो धंदा अधिक फलदायी करण्याच्या दृष्टीने भूतारण बँका, शेतकऱ्यांच्या सहकारी पतपेढ्या व खरेदी विक्री संघ यांची स्थापना पक्ष करील.
२) जमिनीचे लहान-लहान तुकडे होत जाणे हेच शेतकऱ्यांच्या दारिद्रयाचे मुळ कारण असून, भांडवल गुंतवणूक व आधुनिक पद्धतीची शेती या गोष्टींना या तुकडीकरणामुळे वावच राहत नाही. वाढत्या लोकसंख्येला शेतीवरच उपजिवीकेसाठी विसंबुन रहावे लागणे हे जमिनीच्या तुकडीकरणाचे मुख्य कारण असल्यामुळे पर्यायी व्यवसाय उपलब्ध करून देणे हाच त्यावर उपाय असू शकतो. त्यासाठी शेतीतील उत्पादन वाढ व उद्योगधंद्यांचा विकास झाला पाहिजे. जुन्या उद्योगधंद्यांचे पुनरूज्जीवन करवून प्रदेशातील कच्च्या मालास अनुरूप असे नविन उद्योगधंदे हा पक्ष उभारील.
३) लोकांना आपपल्या धंद्यात आवश्यक ते प्राविण्य संपादून उत्पादनक्षमता वाढविता यावी यादृष्टीने धंदे-शिक्षणाचा विस्तृत कार्यक्रम पक्ष हाती घेईल.
४) लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक उद्योगधंद्यांची मालकी व व्यवस्थापन सरकारने आपल्याकडे घ्यावे, ही पक्षाची भूमिका राहील.
५) जीवनाचा परिपूर्ण उपयोग स्वतंत्रपणे घेण्याच्या मार्गात उपस्थित होणाऱ्या सर्व अडचणी नष्ट होण्याच्या दृष्टीने विशिष्ट

वर्गावर अन्याय करणारी अर्थव्यवस्था बदलणे, सुधारणे वा नष्ट करणे हे या पक्षाचे कार्य असेल.

६) खोती, तालुकादारी यासारख्या पद्धतीमध्ये जमीनदारांकडून शेतकरी कुळांची जी पिळवणूक होते, तिच्यापासून शेतकरी कुळांचे संरक्षण व्हावे असे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

७) शेतकरी व कामगार या वर्गांना सुधारलेल्या राहणीमानानुसार जीवन जगता यावे इतपत तरी रोजंदारी मिळेलच अशी व्यवस्था करण्यास पक्ष बांधील राहील.

८) कारखान्यातील कामगारांना नोकरीची व वेतनाची हमी, कामाचे नियमित तास, कामानुरुप वेतन, पगारी रजा, बोनस, पेन्शन इत्यादी सुविधा, बेकारी, आजारपण, अपघात वगैरे प्रसंगी मदत मिळेल अशी विम्याची सोय, स्वस्त भाड्याची निवासगृहे इत्यादी बाबींकडे हा पक्ष लक्ष देईल.

९) कामगारांप्रमाणेच शेतकऱ्यांच्या हिताची काळजी घेतली जाईल.

१०) बेकारी निवारण ही शासनाची जबाबदारी आहे असे हा पक्ष तत्त्व म्हणून मानतो आणि त्यासाठी रोजगाराच्या संधी सरकारने उपलब्ध करून द्याव्यात असा आग्रह हा पक्ष धरील.

११) जबर व्याज घेणाऱ्या, खोटे व घोटाळ्याचे व्यवहार करणाऱ्या सावकारांपासून गरीब ऋणकोचे संरक्षण व्हावे तसेच शेतकऱ्यांना ऋणमुक्त होता यावे असे कायदे करवून घेण्याचा प्रयत्न पक्ष करील.

१२) मोठ्या शहरात व औद्योगिक वसाहतीत राहणाऱ्या मध्यम स्थितीतील लोकांना सोयीस्कर घरभाड्यात घरे मिळतील असे कायदे हा पक्ष करवून घेईल.

कराधार पद्धतीविषयी पक्षाची अशी अपेक्षा होती की, प्रजाकल्याण व प्रगती साधेल अशा राष्ट्रसंवर्धक कामासाठी लागणारा पैसा कर रूपाने वसूल करतांना गरीब वर्ग भरडून निघणार नाही ही काळजी सरकारने घ्यायला पाहिजे.

सामाजिक सुधारणा अग्रक्रमाने करण्याचेही आश्वासन स्वतंत्र मजुर पक्षाच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. धार्मिक द्रव्यनिधीचा दुरुपयोग अगर गैरव्यवहार होऊ नये तर शिक्षणासारख्या कार्यात सदुपयोग व्हावा, यासाठी सार्वजनिक धर्मदाय संस्थावर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे आणि भिकारी व अन्य निराश्रित लोक यांच्या योगक्षेमाची कायद्यान्वये व्यवस्था करणे, ग्रामसंघटनेच्या दृष्टीने आवश्यक अशी सुखाची राहणी ग्रामीण लोकांना लाभावी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जावेत, नगररचनेच्याच धर्तीवर ग्रामीण घरबांधणी करून आरोग्याची निगा घेतली जावी. खेड्यात वाचनालये, सार्वजनिक वस्तीगृहे, मनोरंजनाची साधने इत्यादी सुविधा करून जनतेच्या विचाराला चालना मिळेल अशी दक्षता हा पक्ष घेईल असे आश्वासन जाहिरनाम्यात दिले गेले होते.

शिक्षणाच्या संदर्भात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अंमलात आणणे, साक्षरता प्रसारासाठी प्रौढ साक्षरता मोहिम चालविणे, औद्योगिक शिक्षणावर भर देणे, शैक्षणिक दृष्ट्या मागास जातीतील होतकरू तरुणांना देशात व परदेशात उच्च शिक्षण घेता यावे म्हणून सरकारी मदत मिळेल अशी कायदेशीर योजना करणे, प्रदेशात गरज असेल तिथे प्रत्यक्ष शिक्षणाची प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करुन विद्यापीठीय शिक्षणाचे पुर्नगठन करण्याविषयी कायदे करणे, विद्यार्थ्यांचे श्रम आणि बुद्धीमत्ता

मातीमोल करून टाकणारी सध्याची शिक्षणपद्धती नष्ट करणे या गोष्टीसाठी पक्षाच्या वतीने प्रयत्न केले जाईल असे जाहिरनाम्यात म्हटले होते.

अस्पृश्य कामगारांच्या कर्जबाजारीपणावर उपाय म्हणून एक सावकारी नियंत्रण विधेयकही तयार करुन सभागृहात मांडण्याची अनुमती बाबासाहेबांनी मागितली होती. सावकारांना आपला व्यवसाय करण्यासाठी परवाने द्यावेत, त्या परवान्याची मुदत वर्षभरच असावी, दरवर्षी त्याचे नुतनीकरण केले जावे. सावकाराने गैरव्यवहार केल्यास त्याचा परवाना रद्द करावा. कर्जाचे व्यवहार लेखी व्हावेत आणि धनकोने ऋणकोस या व्यवहाराची नोंद असलेले खातेपुस्तक द्यावे अशा अनेक अभिनव तरतूदी सावकारी नियंत्रण विधेयकात डॉ. आंबेडकरांनी केलेल्या होत्या.

१९३८ मध्ये मुंबईत स्वतंत्र मजुर पक्षाने वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधानसभेवर नेला होता. मोर्चाच्यावतीने डॉ. आंबेडकरांनी काँग्रेस मंत्रीमंडळाला शेतकऱ्यांच्या चार मुलभूत मागण्या व तेरा तातडीच्या मागण्या सादर केल्या होत्या. जमीन कसणाऱ्याला त्याच्या मेहनतीचे फळ मिळाले पाहिजे. खोत, इनामदारांसारखे मध्यस्थ नकोत, शेतमजुरांना किमान वेतन मिळावे, शेतकऱ्यांवर कर वा पट्टी बसविण्यासाठी त्यांना त्यांच्या चरितार्थापुरती योग्य सोय करुन दिली जावी या चार मुलभूत मागण्या होत्या. किमान निर्धारित वेतनापेक्षा कमी उत्पन्न झाल्यास शेतसारा संपुर्ण माफ करावा, तीन वर्षे जमीन कसणाऱ्या कुळाला कायम कुळ समजले जावे, कृषी प्रश्ना विषयी कृषी आयोग नेमावा, पाणीपट्टी कमी करावी, मोफत चराई राने सर्व खेड्यात असावीत, कर्ज तहकुबी व सावकारी नियंत्रण व्हावे, चरितार्थासाठी लागणाऱ्या जमिनीवर व साधनांवर जप्ती आणता येऊ नये, सर्व पडीक जमीन शेतमजुरांना मोफत वाटून द्यावी इत्यादी मागण्यांचा अंतर्भाव तातडीच्या मागण्यांच्या यादीत होता.

वरील सर्व विचारांचा व कार्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, डॉ. आंबेडकरांनी आपल्या जीवनात शोषीत, कामगार, मजुर व स्त्रिया यांच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष केला. आजची जी कल्याणकारी नीती शासन राबवित आहे ती डॉ. बाबासाहेबांनी त्यांच्या काळातच सांगितली होती. यावरून त्यांची दूरदृष्टी आणि सामान्यांप्रती असलेला जिव्हाळा दिसून येतो.

**संदर्भ :**

१) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-११*

२) *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-२०*

३) कीर धनंजय - *डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरीत्र.*

४) लिंबाळे शरणकुमार - *प्रज्ञासुर्य.*

५) *पुणे विद्यापीठ महिला सबलीकरण विशेषांक*

६) www.google.co.in

## ‘अर्थसंवाद’ आगामी (जाने-मार्च २०१२)अंकासाठी त्वरित लेख पाठवा !

### फक्त एवढंच करा...

- लेखकांनी आपला शोधनिबंध Shree-Dev7-2336 या फॉन्टमध्ये PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्ये टाईप करावा. फॉन्ट साईझ 14 असावी. कागदाचा आकार 7 X 9.5 इंच घेऊन टॉप, लेफ्ट व राईट मार्जीन 0.8 व बॉटम मार्जीन 1.0 इंच याप्रमाणे सोडाव्यात. लेखातील टेबल्स सामान्यपणे अर्धा ते पाऊण कागद आकारापेक्षा मोठे नकोत.
- **MS-Word मध्ये टाईप करून लेख पाठवू नयेत.** PageMaker 6.5 या सॉफ्टवेअरमध्येच टाईप करावा.
- दोन हार्ड कॉपीज् व एक सॉफ्ट कॉपी (सीडी) प्रमुख संपादकाकडे त्वरीत पाठवावी.
- शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सदस्य क्रमांक, मोबाईल क्रमांक लिहावा.
- शोध निबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल.
- भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा.
- लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

## ‘अर्थसंवाद’ : भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक

***अर्थसंवाद: एप्रिल-जून २०१२*** हा ***भारतीय अर्थव्यवस्था विशेषांक*** प्रकाशित करावयाचा आहे. या विशेषांकासाठी आजीव सदस्यांनी सामान्यपणे ३/४ पृष्ठांचा लेख प्रमुख संपादकाकडे त्वरित पाठवावा. लेख स्वीकारण्याची अंतिम मुदत ३१ मे २०१२ पर्यंत आहे. या विश्लेषणात्मक लेखांमध्ये शक्यतो तक्ता घेऊ नये. अगदीच आवश्यक असेल तर लहान आकाराचा तक्ता घ्यावा. या विशेषांकात जास्तीत जास्त संशोधनपर लेख प्रकाशित करता यावेत यासाठीच हे सूचित करण्यात आले आहे. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिध्दीसाठी निवड केली जाईल. संदर्भाचा उल्लेख आवश्यक. ***फॉण्ट व इतर बाबींसाठी वर दिलेल्या सूचना कृपया पहाव्यात.***

विशेषांकासाठी लेखांचे विषय याप्रमाणे आहेत-

१. भारतीय अर्थव्यवस्था आणि संरचनात्मक बदल, २.भारतातील बेकारी, ३.भारतातील दारिद्र्य, ४. भारतातील मानव विकास निर्देशांक, ५.भारतातील उर्जा संसाधन, ६.भारताच्या राष्ट्रीय उत्पन्न बदलाच्या प्रवृत्ती, ७. भारतीय कृषी उत्पादकता, ८. भारतीय कृषी किंमत धोरण, ९. भारतीय अन्न सुरक्षा, १०. भारतीय कृषी विमा योजना, ११. भारतातील कृषी क्षेत्रातील कर्जबाजारीपणा व शेतकऱ्यांच्या आत्महत्या, १२. भारतीय लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांचा विकास, १३. भारतातील किरकोळ बाजारात मोठ्या कंपन्यांचा प्रवेश, १४. भारतीय पर्यटन उद्योग, १५. भारतीय बँकींग क्षेत्र.

- प्रमुख संपादक, अर्थसंवाद.

# ग्राहक हितसंवर्धनार्थ ग्राहक न्यायमंचाची भूमिका


**मुलाणी एम.यू., बारामती,**

शारदाबाई पवार महिला महाविद्यालय

(आजीव सभासद क्र.११२०)

भ्रमणध्वनी: ९८८११६१८९३


**प्रस्तावना :**

समाजात ग्राहकाला राजा म्हणून संबोधले जात असले. तरी ग्राहक हा अतिशय निम्नस्तरावरील घटक असून अधिकारशून्य एकाकी, हतबल, हिरमुसलेला, असंघटित आर्थिक व सामाजिक विवचंनानी ग्रासलेला अशी प्रतिमा भूतपुर्वापारप ून वर्तमानपर्यंत राहिलेले दिसून येते. ग्राहकाची वर्तमान प्रतिमा सुधारण्याकरिता व त्यांचा दर्जा उंचावून सन्मानपूर्वक वर्तन करता यावे यासाठी विविध स्त्रोतांद्वारे प्रयत्न केले जात आहेत. समाजातील प्रत्येकजण ग्राहक असून त्याला बाजारपेठेत केंद्रबिंदूनुसार उच्चस्थान व सन्मान मिळवुन देण्यासाठी प्रयत्नवादी आहेत.

ग्राहकांचा असंघटितपणा, हक्क व जाणिवांचे अपहरण, अज्ञान, निरक्षरता अधिकार याविषयी उदासीनता कमालीची सहनशीलता बेफिकीरपण आणि व्यापारउदीम वर्ग हा नफापेरित अभिलाषावृध्दी तसेच ग्राहकांची मर्यादित आर्थिक शक्ती यामुळे ग्राहकांची पिळवणुक, लुबाडणूक, अडवणुक अशा घटना घडत असतात. म्हणून शासकीय, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते या पातळीवर ग्राहक संरक्षण करण्यात येत आहे.

प्रत्येक व्यक्ती ही ग्राहक असून जात, धर्म, वय, लिंग, शिक्षण, आर्थिक स्तर या सारख्या कोणत्याही भेदांच्या पलीकडे जाऊन सर्वांना एक स्तरावर आणण्याचे काम ग्राहकत्वामुळे साधले जावे, ग्राहक हा संपूर्ण आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू मानला जातो. उत्पादन, वितरण, विनिमय आणि उपभोग अशा चार अवस्थांमध्ये आर्थिक व्यवहारांचे वर्णन केले जाते.

**उद्दिष्टे :**

प्राचीन ग्राहक हितसंवर्धनाकरिता सद्य:स्थिती आणि प्राचीन ग्राहक संरक्षणाची माहिती घेणे व वर्तमान ग्राहक चळवळीच्या तरतुदी व प्रगतीचा शोध घेणे आणि ग्राहक हितसंवर्धनार्थ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचाचा अभ्यास करणे इत्यादी उद्दिष्टानिहाय शोधनिबंध सादर करीत आहे.

**परिकल्पना :**

१. ग्राहक संरक्षण कायद्यामुळे ग्राहक सबलीकरण साध्य होत आहे.

२. ग्राहक संरक्षण कायदा १९८६ नुसार स्थापन करण्यात आलेल्या त्रि-

स्तरीय न्याय व्यवस्था अत्यंत उत्कृष्ट रितीने कार्य करीत आहे.

३. पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण कार्यक्षमतेने कार्य करीत आहे.

**४) संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. शोधनिबंधाकरीता विविध धार्मिक ग्रंथे, विविध मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्रे, ग्राहक कल्याण मंत्रालय अहवाल इत्यादीचा संदर्भ घेतलेले आहेत. त्याचप्रमाणे पुणे जिल्हा ग्राहक न्यायमंचाच्या दरमहा प्रगती अहवालावरून तथ्य संकलन केले आहे. त्याचप्रमाणे प्रतिशत पध्दतीचा वापर केलेला आहे.

**५) तथ्य संकलनाचे विश्लेषण :**

शोधनिबंधाकरिता दुय्यम स्त्रोताद्वारे तथ्य संकलन करण्यात आलेले आहे. त्या तथ्य संकलनाद्वारे ग्राहक हितसंवर्धन तरतूदीचे विश्लेषण करण्यात येत आहे.

**१. संकल्पना :**

ग्राहक संघटन, ग्राहक प्रबोधन, विधायक कार्य, बहिष्कार या स्त्रोतांद्वारे संघर्षात्मक शस्त्राच्या साहाय्याने ग्राहकाची ग्राहकांकरिता चालवलेल्या शोषणमुक्ती अभियानास ग्राहक चळवळ म्हणतात. तसेच ग्राहक हितसंवर्धनार्थ, उत्पादक, विक्रेते यांच्याकडून पिळवणुकीस प्रतिकार करण्यासाठी संघटित केलेल्या प्रयत्नास ग्राहक चळवळ म्हणतात.

**२. जागतिक ग्राहक चळवळीची उत्क्रांती :**

जगामध्ये सहकाराच्या प्रारंभापासून ग्राहक चळवळीचा प्रारंभ झालेला दिसुन येत आहे. सहकारी ग्राहक भांडारासोबत ग्राहक चळवळ इंग्लड, स्वीडन, नेदरलॅण्ड, रशिया, चीन, जपान, या देशात विस्तारत होती. ग्राहक चळवळीचेविकासात्मक ऐतिहासिक दाखले १८९० ते १९०९ अमेरिका, १९१० ते १९१९ इंग्लड, १९२० ते १९२९ नेदरलॅण्ड, १९३० ते १९३९ नॉर्वे व डेन्मार्क, १९४७ ते १९४९ आयर्लंड, जपान, स्वित्झरलँड, जर्मनी आणि १९८० ते १९८९ भारत व पाकिस्तान, १९९० ते १९९९ दक्षिण आफ्रिका इ. देशात दिसुन येत आहे. ग्राहक चळवळीस विधी ग्राहय मान्यता म्हणून १५ मार्च १९६२ ला अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष यांनी सनद मंजुर करून त्यामध्ये सुरक्षिततेचा हक्क, मत ऐकणे हक्क १५ मार्च ला बहाल केले. म्हणून १५ मार्च जागतिक ग्राहक दिन साजरा केला जातो त्याचप्रमाणे केनेडी राष्ट्राध्यक्ष यांनी तक्रार निवारण हक्क, शिक्षणाचा हक्क, आरोग्यदायी पर्यावरणाचा हक्क, मुलभूत गरजा पुर्तता हक्क बहाल करून ग्राहक चळवळीस विधीग्राहय मान्यता प्राप्त करून दिली. त्यामुळे ग्राहक चळवळ जागतिक पातळीवर विस्तारली आहे.

**३.भारतातील ग्राहक चळवळीची उत्क्रांती :**

भारतातील ग्राहक संवर्धनाच्या चळवळीचा शोध तीन टप्प्यात घेतलेला आहे. ते पुढील प्रमाणे

अ) स्वातंत्र्यपूर्व काळ :

भारतीय अर्थव्यवस्थेत प्राचीन काळापासून कृषिप्रधान असुन त्यामध्ये सेवा, कृषी, आणि उद्दीम यांचे प्राबल्य असताना ग्राहकहित संवर्धनप्रणालीचे दाखले प्राप्त होत आहेत.

वैदिक कालखंड इ.स. पूर्व ५००० ते १५०० हा कालखंड, रामायण, महाभारत, या साहित्यकृतीत ग्राहकाला महेश्वराची (मोठ्या देवाची) उपमा देवून ग्राहक हितसंवर्धन तरतुदीचा उल्लेख आढळतो. महाभारतकाळामध्ये मध्ये व्यापाऱ्यांनी शुध्द व्यवहार करावा दोषपुर्ण वजनमापे, भेसळ याबाबत दंडाची तरतुद केल्याचा दाखला आढळतो म्हणजे भारतातील १९७६ या

वजनमापे कायद्याची परिणती महाभारतात दिसून येते, मनुस्मृतीमध्ये ग्राहक हितसंवर्धनाचा नामोउल्लेख आढळतो. राजाने किंमत निर्धारण करावे असा उल्लेख आहे. भारतीय १९६५ च्या किंमत निर्धारण विधीग्राह्याचे मुळ दिसुन येत.

आयुर्वेद काळ इ.स. पुर्व ५००० ते १००० हा असुन वैद्यकीय उपचारात्मक हलगर्जीपणा सिध्द झाल्यास वैद्यास दंडात्मक कार्यवाही करण्याचे नियम पारित केला आहे. म्हणजे वर्तमानचा दाखला दिसून येतो.

मौर्यकालिन शासनप्रणाली ग्राहक संरक्षण संवर्धनास दक्ष होती याचा दाखला इ.स. पूर्व चौथ्या शतकातील कौटीलीय अर्थशास्त्रामध्ये आहे. यामध्ये ग्राहक हितसंवधर्नाचा एक स्वतंत्र अध्याय लिहिलेला आहे. शिवाय दंडात्मक (२०० चलन) तरतूद केली आहे. मध्ययुगीन कालखंड हा (इ.स. १२०० ते १५००) सुलतानशाही असून अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात ग्राहक संरक्षणार्थ तरतुदी आढळतात. त्याचा भाग म्हणून सुहना बाजार प्रमुखाची नेमणुक केलेली आहे. हा सुहना ग्राहक संरक्षणकरीता व्यापारीवर्गावर दंडात्मक कार्यवाही करीत होता. त्यामुळे खाद्यान्न वितरण व्यवस्था कार्यक्षम आणि दिल्लीत शाही भांडारव्यवस्था निर्माण झाली. तसेच खिलजी हा ग्राहकांचे संरक्षण करण्याकरीता लहान मुलांना गुप्तहेर नेमून माहिती गोळा करीत होता. भारतीय ग्राहक संरक्षण कायद्याची मुळे येथे दिसतात.

**ब) स्वातंत्र्योत्तर ग्राहक हितसंवर्धन कायदे :**

ग्राहकांचे हितसंवर्धन करून ग्राहकांची पिळवणुक थांबविण्याकरिता आणि विक्रेत्यांवर दबाव ठेवण्याकरिता स्वातंत्र्यानंतर कायदे करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये पुढील कायद्यांचा समावेश आहे.

१. भारतीय कराराचा कायदा - १८७२
२. वस्तू विक्री कायदा - १९३०
३. औषधे व सौंदर्य प्रसाधने - १९४०
४. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा - १९५४
५. जीवनावश्यक वस्तू कायदा - १९५८
६. मक्तेदारी व निर्बंधक व्यापारी पध्दती कायदा -१९६९
७. भाडे खरेदी कायदा - १९७२
८. प्रमाणित वजनमापे कायदा - १९७६
९. काळाबाजार प्रतिबंधक आणि जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा कायदा - १९८०
१०. घरगुती उपकरणे व गुण नियंत्रण कायदा - १९७६
११. जीवनावश्यक सेवा कायदा - १९८६
१२. पर्यावरण संरक्षण कायदा - १९८७
१३. ग्राहक संरक्षण कायदा - १९८६

अशा प्रकारे विविध कायदे करण्यात आलेले आहेत. परंतु प्रस्तुत शोधनिंबधात १९८६ च्या ग्राहक हितसंवर्धन अधिनियमाचा अभ्यास केला आहे.

**क) १९८६ चा ग्राहक हितसंवर्धन विधीग्राह्यः**

या विधीग्राह्यामध्ये दोन विभाग करण्यात आलेले आहेत. प्रथम विधीग्राह्य मध्ये ग्राहक हक्क आणि दुसऱ्या विभागात ग्राहक हितसंवर्धनार्थ यंत्रणा सुचित करण्यात आली आहे. या विभागात ग्राहक तक्रार न्यायमंचाची तरतुद नमुद केली आहे. त्याचा प्रस्तुत विषयात सांगोपांग विचार करण्यात आला आहे.

सन १९८६ च्या ग्राहक हितसंवर्धन विभाग प्रथमामध्ये ग्राहकाचे हक्क व तक्रारीचे स्वरूप सूचित करण्यात येत आलेले आहे.

**१. मूलभूत हक्क :**

१) मूलभूत गरजा भागविल्या जाण्याचा हक्क

२) माहितीचा हक्क

३) निवड करण्याचा हक्क

४) सुरक्षिततेचा हक्क

५) मत मांडण्याचा हक्क

६) तक्रार निवारण्याचा हक्क

७) ग्राहक शिक्षणाचा हक्क

८) स्वच्छ आणि आरोग्यदायी पर्यावरणाचा हक्क

**२) कार्यवाहीचे स्वरूप :**

ग्राहकांच्या वरील हक्क अधिकारात बाधा येत असेल आणि ग्राहकांना नुकसान होत असेल तर पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी तक्रार करता येते.

**अ) वस्तुंच्या बाबतीत :**

१) वस्तुमधील दोष काढुन मिळणे.

२) वस्तू बदलून मिळणे.

३) वस्तू परत घेऊन तिची किंमत परत मिळणे.

४) जादा आकारलेली किंमत परत मिळणे.

**ब) सेवांच्या बाबतीत :**

१) सेवा ठरल्याप्रमाणे योग्य वेळी व योग्य प्रकारे न मिळाल्याबद्दल भरपाई मिळणे.

२) सेवेत त्रुटी असण्याबद्दल भरपाई मिळणे.

३) सेवा पुर्णपणे किंवा अंशतः बंद राहिल्या बद्दल परतावा मिळणे.

**क) नुकसान भरपाई बाबतीत :**

वस्तू व सेवेत दोष असल्यामुळे ग्राहकाची निर्माण झालेली पैशाची व वेळेची नुकसानभरपाई तसेच दावा चालविण्यास लागणाऱ्या खर्चाची नुकसान भरपाई मिळणे. अशा प्रकारे ग्राहक आपल्या अधिकारांचे अधिपतन झाल्यास मंचाद्वारे वरील कायदेशीर कार्यवाही करू शकतो. १९८६ च्या ग्राहक कायद्यामुळे अशा पध्दतीने ग्राहकांच्या कल्याणात भर पडली आहे.

ग्राहक संरक्षण विधीग्राह्य १९८६ च्या दुसऱ्या भागात ग्राहक तक्रार निवारणाची प्रशासकीय यंत्रणा व त्यांची अंमलबजावणी सुचित केलेले आहे. त्या यंत्रणेद्वारे ग्राहकाचे हितसंवर्धन केले जाते. अशी यंत्रणा त्रिस्तरीय असून ती पुढीलप्रमाणे आहे.

**अ) राष्ट्रीय ग्राहक आयोग :**

ग्राहक न्यायदानामधील सर्वोच्च संस्था असून सर्वोच्च न्यायालयाचे विद्यमान किंवा माजी न्यायाधीश अध्यक्ष असतात. अतिशय विद्वता, कार्यक्षमता, तज्ज्ञ असलेले अर्थशास्त्र, कायदा, वाणिज्य, सार्वजनिक प्रशासन या विद्याशाखेत भरीव कार्य केलेल्यांची सदस्य म्हणून पाच वर्षासाठी नियुक्ती केली जाते. त्याचप्रमाणे वयाची अट ७० वर्षापर्यंत आहे. यामध्ये पाच सदस्य असून एक व्यायधीश आणि इतर सदस्य चार असून त्यामध्ये स्त्री सदस्य असते.

कोणत्याही ग्राहकाला राज्य ग्राहक न्यायमंचामध्ये समाधानकारक निकाल न लागल्यास राष्ट्रीय ग्राहक न्यायमंचाकडे अपील करता येते. सदर अपील ३० दिवसाच्या आत करणे आवश्यक असून सदर अपीलचे मूल्य रु. १ कोटी पेक्षा अधिकतम असेल तरच अपील करता येते. राष्ट्रीय ग्राहक न्यायमंच दिलेला निकालानुसार सर्वोच्च न्यायालयात अपील करता येते. सदर तक्रारीचे निवारण ९० दिवसाच्या आत करणे हे राष्ट्रीय न्यायमंचला बंधनकारक आहे.

ग्राहक हितसंवर्धन कायदा १९८६ पासून राष्ट्रीय ग्राहक न्यायमंच कार्यरत असली तरी अभ्यासाच्या व्याप्तीच्या विचारार्थ गत पाच वर्षाचा सांख्यिकीय वापर केला आहे. या सांख्यिकीवरून राष्ट्रीय ग्राहक न्यायमंचाची कार्यक्षमता तपासत आहे.

तक्ता क्र.१ वरून असे स्पष्ट होते की, राष्ट्रीय आयोगाकडे २००६-०७ मध्ये दाखल झालेल्या दाव्यांची संख्या ४५९०७ असून सन २०१०-११ मध्ये ही संख्या ६५८४९ इतके असून

### तक्ता क्र. १
### राष्ट्रीय ग्राहक न्यायमंचाची कार्यक्षमता

| वर्ष | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे % |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ४५९०७ | ३३७४३ | १२१६४ | ७३५० | २६.५० |
| २००७-०८ | ५०६५६ | ४१५७६ | ९०८० | ८३.०० | १७ |
| २००८-०९ | ५६९२१ | ४७३०४ | ९६१७ | ८४.०० | १६ |
| २००९-१० | ६२३२० | ५५६५२ | ६६६८ | ८९.०० | ९.७० |
| २०१०-११ | ६५८४९ | ५७६२६ | ८२२३ | ८८.०० | १२ |

*स्रोत : Department of consumer offairs Delhi annual reports 2006-07 to 2010-11*

सरासरी ७० प्रतिशत ५ वर्षामध्ये दाव्यांची संख्या वाढलेली आहे. तसेच निकाली दाव्यांचे प्रमाण सन २००६-०७ मध्ये ३३७४३ असून २०१०-११ मध्ये ५७६२६ असून हे अनुपात ५८ प्रतिशत इतके आहे. म्हणजेच निकाली दाव्यांची संख्यात्मक वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे निकाली दाव्यांच्या विचारार्थ प्रतिशत सन २००६-०७ मध्ये ७३.५०% वरून सन २०१० -११ पर्यंत ८८% ने वृध्दी झाली आहे याचा मतितार्थ राष्ट्रीय न्यायमंचाची कार्यक्षमता वृध्दींगत झालेली आहे. तसेच प्रलंबित दाव्यांचे प्रतिशत घटलेले आहे.

**२) राज्य आयोग :**

सन १९८६ च्या विधीग्राह्य नुसार प्रत्येक घटक राज्यांच्या पातळीवर राज्य न्याय आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. या विधीग्राह्यानुसार सद्य स्थितीत भारतामध्ये ३४ राज्य आयोग कार्यक्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे ग्राहक हितसंवर्धन होत आहे. हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होते.

### तक्ता क्र. २ राज्य ग्राहक न्यायमंचाचे कार्यक्षमता

| अ.क्र. | वर्ष | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | प्रतिशत | प्रलंबित दावे % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००६-०७ | ३८६७७८ | २७७६३६ | १०९१४२ | ७१.७८ | २८.२२ |
| २ | २००७-०८ | ४२४०४७ | ३१२९७५ | १११०७२ | ७३.८१ | २६.१९ |
| ३ | २००८-०९ | ४६६०४३ | ३५४६८३ | १११३६० | ७६.११ | २३.८९ |
| ४ | २००९-१० | ४९३३६६ | ३८४०८९ | १०९२७७ | ७७.८५ | २२.१५ |
| ५ | २०१०-११ | ५१५५२७ | ४०७१४३ | १०८३८४ | ७८.९८ | २१.०२ |

*स्रोत : Department of consumer offairs Delhi annual reports 2006-07 to 2010-11*

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास येते की गेल्या पाच वर्षात दाखल दाव्यांची संख्या २००६-०७ मध्ये ३८६७७८ असून सन २०१०-११ पर्यंत ५१५५२७ पर्यंत ७५ प्रतिशत वृध्दी झालेली आहे. त्याचप्रमाणे निकाली दाव्यांचा अनुपात ६८.११% पर्यंत वृध्दी झाली आहे. त्याचप्रमाणे सन २००६-०७ दाखल दावे आणि निकाली दावे यांचे अनुपात ७१.७८ इतके आहे. तसेच सन २०१०-११ पर्यंत

सदर अनुपात प्रतिशत ७८.९८ पर्यंत वृध्दी झालेली आहे. यावरून स्पष्ट होते की राज्य ग्राहक न्यायमंच कार्यक्षमतेने कार्यरत असून ग्राहकांचे हितसंवर्धनाचे पालन करीत आहे.

राष्ट्रीय ग्राहक न्यायमंच आणि राज्य ग्राहक न्याय मंच यांची तौलनिक विचारार्थ प्रलंबित दाव्यांची संख्या राज्य ग्राहक न्यायमंचाची जास्त दिसून येते. कारण राष्ट्रीय ग्राहक न्यायमंचाकडे अधिक म्हणजेच रु.१ कोटी पेक्षा जास्त रक्कमेचे नुकसान भरपाई दावे दाखल होतात. त्यामानाने राज्य ग्राहक न्यायमंचाकडे ते रु.२ लाख ते १० लाख पर्यंत रक्कमेची नुकसान भरपाई दावे दाखल होतात. म्हणून शोधनिबंधातील न्यायमंचातील कार्यक्षमता या गृहीत कृत्यांची सत्यसत्यता पडताळणी झाली आहे.

३) पुणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच :

सन १९८६ च्या विधीग्राह्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी ग्राहक हितसंवर्धनाकरिता जिल्हा स्तरीय न्यायमंचाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यासाठी ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच असून गेल्या दहा वर्षांमधील त्यांच्या कार्यक्षमतेचा शोध घेतलेला आहे. पुणे जिल्ह्याच्या भौगोलिक विस्तारामुळे पुणे जिल्हा ग्रामीण पिंपरी चिंचवड महानगर आणि कॅम्प एरिया अशा विभागासाठी न्यायमंच स्थापन केले आहेत. पुणे महानगरपालिका आणि पुणे जिल्हा ग्रामीण एकत्रित आहेत. त्यांचा ग्राहक 'हित संवर्धनात्मकतेमध्ये कितपत कार्यक्षमता आहे हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**तक्ता क्र. ३ पुणे महानगरपालिका न्यायमंचाची कार्यक्षमता**

| वर्ष | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे |
|---|---|---|---|---|---|
| स्था.ते १९९९ | १३०२ | १३०१ | ०१ | ९९.९८% | ०२ % |
| २०००-०१ | ४५३ | ४५३ | - | १००% | - |
| २००१-०२ | ४३९ | ४३९ | - | १००% | - |
| २००२-०३ | ४६० | ४६० | - | १००% | - |
| २००३-०४ | ४०७ | ३९४ | १३ | ९६% | ०४% |
| २००४-०५ | ४३६ | ४३२ | ०४ | ९९% | ०१% |
| २००५-०६ | ५९० | ५९० | - | १००% | - |
| २००६-०७ | ३२८ | २९८ | ३० | ९०.८५% | ९.१५% |
| २००७-०८ | ३९७ | ३५६ | ४१ | ८९.६८% | १०.३३% |
| २००८-०९ | ५९१ | ४३० | १६१ | ७०.७८% | २८.२२% |
| २००९-१० | ६१२ | २६६ | ३४६ | ४३.४६% | ५६.५४% |
| २०१०-११ | ५६५ | ६६ | ४९९ | २१.६८% | ८८.३२% |
| एकूण | ५२८६ | ४१८४ | ११०२ | ८९.१५% | २०.८५% |

*स्रोत : ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच पुणे.*

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, पुणे जिल्हा ग्राहक हितसंवर्धनासाठी न्यायमंचाने स्थापनेपासून ते २००५-०६ पर्यंत कार्यक्षमतेने कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे सन २००६-०७ ते २०१० ते २०११ पर्यंतचा शोधार्थ ग्राहक हित संवर्धनाबाबत फारसे कार्यक्षमतेने कार्य केलेले दिसत नाही सन २००९ ते २०११ पर्यंतचा प्रलंबित दाव्यांची संख्यात्मक वृध्दी दिसून येते.

पुणे महानगरपालिका ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचाच्या कार्यक्षमतेत खालील विषयांच्या दावे दाखल झालेले आहेत. ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचाच्या स्थापनेत (१९९५) पासून ते २०१०-२०११ पर्यंत कारण निहाय दाखल दावे खालील तक्त्यात दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र. ४**

**कारणनिहाय दाखल दाव्यांचे वर्गीकरण (२०११ पर्यंत)**

| तपशील | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे |
|---|---|---|---|---|---|
| अधिकोषन | ८५९(५.८८) | ७७१(५.७१) | ८८ | ८८.७५ % | ११.२५% |
| मेडीकल | १७४(१.१९) | १५६(१.१५) | १८ | ८९.६५ % | १०.३५% |
| टेलिफोन | १६१(१.१०) | १४४(१.०६) | १७ | ७९.४४ % | १०.५६% |
| विमा | ११३७(७.७९) | १००२(७.४३) | १३५ | ८८.१२ % | ११.८८% |
| घरबांधणी | २४७४(१६.९५) | २१७५(१६.१२) | २९९ | ८७.९१ % | १२.०९% |
| विद्युत | ६६१(४.५३) | ६१७(४.३७) | ४४ | ९३.३४ % | ६.६६% |
| विमानसेवा | २५(०.१७) | २४(४.५७) | ०१ | ९६.०० % | ४.००% |
| रेल्वे | ५७(०.३९) | ५६(०.४१) | ०१ | ९८.२४ % | १.७६% |
| इतर | ९०४(६१.९६) | ८५४०(६३.३२) | ५०० | ९४.४६ % | ५.५४% |
| एकूण | १४५८८ | १३४८५ | ११०३ | ९२.४३ % | ७.५% |

टीपा :

१) कंसातील अंक प्रतिशत दर्शवितात.

२) तक्त्यामधील दावे फक्त पुणे महानगरपालिका सीमेतील आहे.

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की, जिल्हा ग्राहक न्यायमंचाची भूमिका ग्राहक हितसंवर्धना बाबत कार्यक्षम आहे. कारण प्रलंबित दाव्यांची प्रतिशत अतिशय निम्न असून निकाली दाव्यांची प्रतिशत अधिकतम आहेत. पुणे जिल्हा ग्राहक न्यायमंचाचे ग्राहक संरक्षणात महत्त्वपुर्ण योगदान आहे.

दाखल दावे आणि निकाली दाव्यांचे कारणनिहाय वर्गीकृत करता सर्वाधिक दाखल दावे घरबांधणी उद्योगाबाबत आहे. त्यांची संख्या अनुपात २४७४ असून १६.९५ प्रतिशत आहेत. यामध्ये विकसनाबाबत तक्रारी असून प्रलंबित दावे सर्वाधिक आहेत. त्याखालोखाल विमा कारणाचे दाखले दावे अनुपात ११३७ असून ७.१९ प्रतिशत आहेत. विमा सबबीत हप्ता रक्कम, मुदतपूर्व विमा रक्कम, विमा रक्कम परतावा याबाबत आहेत. तसेच अधिकोष सेवेबाबत दाखल दाव्यांचे अनुपात

११.२५ प्रतिशत आहे. यामध्ये एटीएम सेवा खंडीत, चुकीचे व्याज आकारणी, प्रलंबित कर्जमंजुर मुदतपुर्व न करणे, चुकीची कपात करणे या कारणांचे दावे दाखल झालेले आहेत. इतर सबब मध्ये किराणा दुकानातील फसवणुक मालात भेसळ, वजनमापात फसवणुक यांचा समावेश होतो.

मेडीकल या सबबबाबत दाखल दावे १७४ असून अनुपात १.१९ प्रतिशत आहे. शिवाय निकाली दावे ९० प्रतिशत आहे. यामध्ये मेडिकल दुकानातून चुकीचे औषध, मुदत संपल्यानंतरची औषधे देणे, निर्धारित किंमतीपेक्षा अधिकतम मूल्य घेणे या सबबीचे दावे दाखल झालेले आहेत.

पुणे महानगरपालिकासाठी पुण्यामध्ये स्वतंत्र ग्राहक न्यायमंच आहे. पुणे जिल्हा ग्रामीण, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि कॅम्प एरिया या सिमेरेषेतील ग्राहकांचे दाखल दाव्यांची अनुपातन पुढील तक्ता क्र. ५ मध्ये दर्शविलेले आहे.

**तक्ता क्र. ५**

**पुणे जिल्हा ग्रामीण पिंपरी चिंचवड महानगरपालिका व कॅम्प एरिया न्यायमंचाची कार्यक्षमता**

| वर्ष | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | प्रतिशत | प्रलंबित दावे |
|---|---|---|---|---|---|
| अ-१९९५ | २६६८ | २६१० | ५८ | ९७.८२ | २.१८% |
| २०००-०१ | ९५७ | ९५७ | - | १०० | - |
| २००१-०२ | १४२ | १४२ | - | १०० | - |
| २००२-०३ | २४९ | २४९ | - | १००% | - |
| २००३-०४ | १६४ | १६३ | ०१ | ९९.५९ | ०.६१% |
| २००४-०५ | ६४६ | ६३९ | ०७ | ९८.५९ | १.०९% |
| २००५-०६ | ३२७ | ३२१ | ०६ | ९८.१६ | १.८४% |
| २००६-०७ | १९६ | १८९ | ०७ | ९६.४२ | ३.५८% |
| २००७-०८ | ५०२ | ४१० | ९२ | ८१.६७ | १८.३३% |
| २००८-०९ | २११ | १८० | ३१ | ८५.३० | १४.०७% |
| २००९-१० | १९६ | १४७ | ४९ | ७५.० | २५.००% |
| २०१०-११ | २८४ | ४७ | २३७ | १६.५४ | ८३.४६% |
| एकूण | ३८७४ | ३४४४ | ४३० | ८८.९० | ११.१०% |
| अ+ब | ६५४२ | ६०५४ | ४८८ | ९२.५४ | ७.४६ |

*स्रोत : ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच पुणे*

वरील तक्त्यावरून निष्कर्षाप्रत येते की ग्राहक हितसंवर्धन म्हणून ग्राहक न्यायमंचानी निकाली दावे गेल्या दशकात ६०५४ केले असून अनुपात ९२.५४ प्रतिशत इतके आहे. तर प्रलंबित दावे ४८८ असून अनुपात ११.१० प्रतिशत एवढे कमी आहेत याचा अन्वयार्थ म्हणजे ग्राहक न्यायमंच ग्राहक हितसंवर्धनासाठी कार्यक्षम कार्य करीत आहे. वित्तीय वर्ष २००० ते २००१ मध्ये अधिकतम

दाखल दावे असून सर्व निकाली आहेत.

सन २००३ ते २००४ पासून ३१ डिसेंबर २०११ पर्यंत प्रलंबित दाव्यांची एकूण संख्या ४३० असून १९९५ ते २००० पर्यंतचे ५८ दावे प्रलंबित आहेत. कारण की सदर दावे जिल्हा ग्राहक मंचातून राज्य ग्राहक मंचाकडे विचारार्थ आहेत. म्हणजे ५८ दावे बाबत ग्राहक न्यायप्रतिक्षेत आहेत. पुणे जिल्हा ग्राहक न्यायमंचामध्ये दाखल झालेले दावेची सबब अथवा कारणनिहाय वर्गीकरण खालील तक्त्यात नमूद केले आहेत.

**तक्ता क्र. ६**

**कारणानिहाय दाखल दावांची वर्गीकरण (१९९५ ते २०११ पर्यंत)**

| तपशील | दाखल दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे | निकाली दावे | प्रलंबित दावे |
|---|---|---|---|---|---|
| अधिकोष | ५४५(८.३३) | ४९०(८.०९) | ५५ | ८९.९०% | १०.१०% |
| मेडीकल | १९७(३.०१) | १४८(२.४४) | ४९ | ७५.१२% | २४.८८% |
| टेलिफोन | ६५६(१०) | ६०९(१०.५) | ४७ | ९२.८३% | ७.१७% |
| विमा | ७८१(१२) | ७७७(१२.८३) | ०४ | ९९.४८% | ०.५२% |
| घरबांधणी | २३२२(३५) | २३१४(३८.२२) | ०८ | ९९.६५% | ०.३५% |
| विद्युत | ६०५(९.२४) | ४९८(८.२२) | १०७ | ८२.३१% | १७.६९% |
| विमानसेवा | १७(०.२५) | १५(०.२४) | ०२ | ८८.२३% | ११.७७% |
| रेल्वे | २०(०.३०) | २०(०.३५) | ०० | १००% | - |
| इतर | १३९९(२१.४०) | ११८३(१९.५४) | २१६ | ८४.५६% | १५.४४% |
| एकूण | ६५४२ | ६०५४ | ४८८ | ९२.५४% | १००% |

*टिप : कंसातील संख्या प्रतिशत दर्शवितात.*

वरील तक्त्यावरून निर्देशित होते की जिल्हा ग्राहक न्यायमंचांमध्ये गेल्या १६ वर्षात घरबांधणी व्यवसायाच्या सर्वाधिक म्हणजे ३५% तक्रारी दाखल झाल्या असून निकाली दाव्यांचे प्रमाण सर्वाधिक आहेत. घरबांधणीमध्ये विकसनाबाबत अधिकतम तक्रारी आहेत. त्याखालोखाल विमा क्षेत्राबाबत तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यामध्ये विमा हप्ता दंड, विमा रक्कम परतावा, वाहतुक साधनचा विमा, अपघाती विमा अशा तक्रारी दाखल झालेल्या होत्या. सर्वात न्यूनतम तक्रारी दावे हवाई सेवा बाबत दाखल झालेल्या आहेत.

**संदर्भ :**


१) तापकीर मुकुंद, साबळे आर.के. *ग्राहक संरक्षण आणि व्यावसायिक नितीमूल्ये*, निराली प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती सप्टें. २००४

२) कायंदे-पाटील गंगाधर वि., *भारतीय ग्राहक संरक्षण*, चैतन्य पब्लिकेशन्स नाशिक-१३, प्रथम आवृत्ती २००४

३) जोशी बिंदू माधव, *ग्राहक दर्शक-पुणे,* अखिल भारतीय ग्राहक पंचायत

४) पुणे जिल्हा ग्राहक न्यायमंच, पुणे, *प्रगती अहवाल*

५) *Ministry of consumer Govt. of India*

६) *स्मरणिका: ग्राहक दर्पण*, यशवंतराव चव्हाण कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिल्लोड.

७) कानेटकर मेघा, *भारतीय ग्राहक चळवळ*

# महाराष्ट्रातील स्त्रियांचे विवाह-वय, प्रसुती निर्देशक व साक्षरता

**दीपक एम. भारती, बीड**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई
(आजीव सभासद क्र. ११७७)
भ्रमणध्वनी: ९४२२३५३६११

**विजय एन. भोपाळे, परभणी**
अर्थशास्त्र विभागप्रमुख, स्वा.सै.सुर्यभानजी पवार महाविद्यालय, पूर्णा
(आजीव सभासद क्र. १४८०)
भ्रमणध्वनी: ९८२२४३१७७१

---

**प्रस्तावना :**

स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा अनेक लोकसंख्याशास्त्रीय चलांशी प्रत्यक्षरित्या संबंधित असतो. त्यामुळेच जणू लोकसंख्यावृध्दीच्या पार्श्वभूमीवर तो एक अभ्यासाचा महत्वाचा विषय राहिलेला आहे. त्याचबरोबर स्त्रियांचा आर्थिक दर्जादेखील लोकसंख्याशास्त्रीय संक्रमणात महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. त्यामुळे विवाह, विवाहावेळीचे वय (*Age at Marriage*), जननक्षमता, कुटुंब नियोजन पध्दतीचा वापर इ. घटकांच्या माध्यमातून स्त्रियांचा एकूण दर्जा हा साक्षरता, शैक्षणिक उंची, आर्थिक कार्यातील सहभाग याद्वारे लोकसांख्यिकीय संक्रमणात महत्वाची भूमिका बजावत असतो.

लोकसंख्याशास्त्रीय अध्ययनात १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह होणाऱ्या मुलींचे जास्त प्रमाण असलेले देश, राज्य, विभाग व जिल्हे हे १८ वर्षापेक्षा कमी वयात विवाह होणाऱ्या मुलींचे कमी प्रमाण असलेल्या देश, राज्य, विभाग व जिल्ह्यापेक्षा लोकसांख्यिकीयदृष्ट्या अधिक मागासलेले मानले जातात. या समस्येची कारणमिमांसा दोन बाजूने करता येते. एक बाजू म्हणजे १८ वर्षापेक्षा कमी वयात होणाऱ्या मुलींच्या विवाहामुळे मुलींवर परिपक्वता (प्रजोत्पादनाबाबत) येण्यापूर्वीच बाळंतपणाचा भार पडतो. त्यामधून बऱ्याचवेळा प्रसूतीवेळी मृत्यूचा धोका वाढून मृत्यूतील लिंग भिन्नता प्रभावीत होत असते. याबाबत २००८ च्या जागतिक मानव विकास अहवालाचा उल्लेख



# मराठी अर्थशास्त्र परिषद
## अर्थसंवाद वर्गणीचे नवे दर

नांदेड येथे ८ नोव्हेंबर २०११ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजूर झालेल्या ठरावानुसार अर्थसंवाद त्रैमासिक वर्गणीचे नवीन दर एप्रिल २०१२ पासून पुढीलप्रमाणे राहतील.

**शैक्षणिक संस्था, महाविद्यालये, ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु.१०००/-(रुपये एक हजार), पंचवार्षिक वर्गणी रु.१५००/-(रुपये एक हजार पाचशे)**

अर्थसंवाद साठी वार्षिक वर्गणी यापुढे स्विकारली जाणार नाही. केवळ त्रैवार्षिक व पंचवार्षिक वर्गणीच स्विकारली जाईल. एप्रिल २०१२ पासून फक्त नवीन दरानुसारच वर्गणी स्विकारली जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**डॉ. अविनाश निकम** — प्रमुख संपादक

**डॉ. अनिल सूर्यवंशी,** — कार्यवाह-खजिनदार



नांदेड एज्युकेशन सोसायटीचे,

# पीपल्स कॉलेज, नांदेड

(स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित व नॅक कडून B+ दर्जा प्राप्त)

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये:**

- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून College with Potential for Excellence दर्जा प्राप्त.
- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड कडून शहरी भागातील आदर्श महाविद्यालय पुरस्कार (२००९-१०)
- नुकताच महाविद्यालयाने आपला हिरक महोत्सव साजरा केला.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, वाणिज्य, समाजशास्त्र या विषयात संशोधनाची (पीएच्.डी.) सुविधा.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी व राज्यशास्त्र या विषयात एम.फील.ची सुविधा.
- मराठी, हिन्दी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, वाणिज्य या विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सुविधा.
- बी.बी.ए., पी.जी.डी.बी.एम. व डी.टी.एल. या व्यावसायिक अभ्यासक्रमाची सुविधा.
- बी.कॉम. व एम.कॉम साठी मराठी आणि इंग्रजी माध्यमाची सुविधा.
- मराठवाड्यातील सर्वात मोठे व सुसज्ज ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वातानुकूलीत अभ्यासिका.
- नेट-सेट तयारी वर्गाची सुविधा उपलब्ध.
- स्पर्धात्मक परीक्षा तयारी वर्गाची सुविधा.

**डॉ. व्यंकटेश काब्दे**
अध्यक्ष
नांदेड एज्युकेशन सोसायटी,
नांदेड

**डॉ. व्ही.एन. इंगोले**
प्राचार्य
पिपल्स कॉलेज, नांदेड

(जाहिरातीसाठी प्रयत्न: डॉ. विकास सुकाळे, नांदेड)